CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, ४ एप्रिल २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १४६ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## आजचा सामना

मुंबई इंडियन्स वि. लखनौ सुपर जाएंटस्

वेळ : रात्री ७.३० वाजता
ठिकाण : अटल बिहारी वाजपेयी मैदान, लखनौ

# सोलापूरसह सांगोला, पंढरपूर, मंगळवेढ्यात भूकंपाचे धक्के

**केंद्रबिंदू सांगोला; २.६ रिश्टरची नोंद; राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राची ट्विटद्वारे माहिती**


**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.३ एप्रिल-**

सोलापूर जिल्ह्यात गुरुवार दि.३ एप्रिल रोजी सोलापूर शहरासह सांगोला, पंढरपूर, मंगळवेढ्यात भूकंपाचे सौम्य धक्के बसले. सांगोला शहरापासून पाच किमी अंतरावर भूकंपाचा केंद्रबिंदू असल्याचे व हा भूकंप २.६ रिश्टर स्केल तीव्रतेचा होता, असे राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने ट्विटद्वारे जाहीर केले. ही बातमी कळताच नागरिकांमध्ये खळबळ उडाली.

> भूकंपाचा सौम्य धक्का : सोलापूर शहर व जिल्ह्यातील सांगोला, मंगळवेढा, पंढरपूर तालुक्यातील काही भागात सकाळी ११ वा. २२ मिनिटांनी भुकंपाचा सौम्य धक्का जाणवला.
> **- मनिषा कुंभार, निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर**

गुरुवारी सकाळी ११ वा.२२ मिनिटांनी सोलापूर शहरासह जिल्ह्यात सांगोला, पंढरपूर, मंगळवेढ्यात काही क्षणांसाठी भूकंपाचे धक्के जाणवले. या भूकंपामुळे कोणतीही जीवित अथवा वित्तहानी झाली नाही. भूकंपाच्या घटनेबाबत सांगोल्याचे तहसीलदार संतोष कणसे यांनी सदर भूकंपाचा केंद्रबिंदू हा सांगोला शहरापासून पाच किमी अंतरावर असून अक्षांश १७.४१ एन व रेखांश ७५.२१ ई आहे. भूकंपाची तीव्रता २.६ रिश्टर स्केल तीव्रतेचा होता. यात कोणतीही जीवित अथवा वित्तहानी झाली नाही, असे सांगितले. म्यानमार भूकंपानंतर हा प्रकार येथे घडल्याने सोलापूरकरांमध्ये भितीचे वातावरण आहे.

## विचारपुष्प



हिंदू कार्यकर्त्यांचे हे कर्तव्य आहे की, त्यांनी तत्त्वज्ञानाच्या मूळ विचाराला पुढे न्यावे, कोणतेही संघटन आपल्या कार्यकर्त्यांकडून शक्ती प्राप्त करते. संघटनेच्या सिद्धांतांची परीक्षा त्या संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या व्यवहारातून होते. आजच्या परिस्थितीत महिला शारीरिकदृष्ट्या स्वस्थ आणि सुदृढ असल्या पाहिजेत. स्वत:चे रक्षण त्यांना करता आले पाहिजे.
**- प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या, चतुर्थ सरसंघचालक**

## शिक्षक भरती रद्द

### ममता सरकारला ‘सुप्रीम’ झटका

**नवी दिल्ली** : २०१४ मध्ये राज्यस्तरीय चाचणी परीक्षेच्या माध्यमातून पश्चिम बंगालमध्ये २५ हजारांवर शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी नियुक्त करण्यात आले होते. पण, २०१६ मध्ये कोलकाता हायकोर्टाने ह्या नियुक्त्या रद्द केल्या. सुप्रीम कोर्टात यावर सुनावणी होऊन हायकोर्टाचा निर्णय कायम ठेवल्याने ममता सरकारला मोठा धक्का बसला आहे. तसेच हजारो शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

# धार्मिक भावना दुखावण्यासाठी विधेयक नाही : किरेन रिजिजू

## आता जमीन हडपण्यावर येणार निर्बंध, राज्यसभेतही वादळी चर्चा

**नवी दिल्ली, ३ एप्रिल**

कोणाच्याही धार्मिक भावना दुखावण्यासाठी नाही, तर वक्फ मंडळाचा कारभार अधिक उत्तरदायी, पारदर्शी तसेच दक्ष करण्यासाठी सरकारने हे विधेयक आणल्याचे अल्पसंख्यक कल्याण तसेच संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी आज राज्यसभेत स्पष्ट केले.

वक्फ दुरुस्ती विधेयक बुधवारी मध्यरात्रीनंतर लोकसभेने पारित केले. आज राज्यसभेत हे विधेयक मांडताना रिजिजू म्हणाले की, हे विधेयक देशात एक नवीन आशा घेऊन आले आहे, त्यामुळे या विधेयकाचे नावच उम्मीद ठेवण्यात आले आहे.

आतापर्यंत वक्फ मंडळाला मनमानीपणे जमीन हडपण्याचा अधिकार होता, तो रोखण्यासाठी सरकारने हे विधेयक आणले आहे, असे ते म्हणाले.

वक्फ मंडळाकडे असलेल्या सर्व संपत्तीची आता माहिती ठेवली जाणार आहे त्याचप्रमाणे सर्व वक्फ संपत्तीची नोंदणीही केली जाणार आहे. जगातील सर्वांत जास्त संपत्ती भारतातील



वक्फ मंडळांकडे आहे, मात्र, या संपत्तीचा मुस्लिम समाजातील गरजू लोकांना कोणताच फायदा मिळत नाही. हे विधेयक घटनाबाह्य आहे तसेच मुस्लिमांचा हक्क हिरावणारे आहे, या आरोपांचे ठामपणे खंडन करताना रिजिजू म्हणाले की, वक्फ मंडळाच्या कारभारात गैरमुस्लिमांचा कोणताही हस्तक्षेप राहणार नाही. याचे काम पाहणारा मुतवल्ली हा मुस्लिम समाजातीलच राहणार आहे. *(तभा वृत्तसेवा)*

### त्यांच्यासाठी संविधान म्हणजे फक्त कागदी पुस्तक : नड्डा

वक्फ मंडळाकडे असलेल्या संपत्तीचे योग्यप्रक़ारे व्यवस्थापन आणि देखभाल होणे, त्याचप्रमाणे या संपत्तीत होणाऱ्या घोटाळ्याची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. त्यामुळे आम्ही विधेयक आणल्याचे केंद्रीय मंत्री तसेच राज्यसभेचे नेते



जे.पी. नड्डा यांनी आज स्पष्ट केले. वक्फ दुरुस्ती विधेयकावरील राज्यसभेतील चर्चेत सहभागी होताना नड्डा यांनी, राजकीय फायद्यासाठी मुस्लिम समाजाचा वापर करण्याच्या काँग्रेसच्या धोरणावर जोरदार हल्ला चढवला. आम्ही संविधानाने चालतो, त्यांच्यासाठी संविधान म्हणजे फक्त कागदी पुस्तक आहे, जे फक्त दाखवण्यासाठी वापरले जाते, असा आरोप त्यांनी केला.



### पाच तासांत २०२ खासदारांनी मांडले मत

**नवी दिल्ली, ३ एप्रिल**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात गुरुवारी लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी शून्य प्रहाराचा कालावधी पाच तासाने वाढविल्याने २०२ सदस्यांनी सलग पाच तास विविध महत्त्वाचे विषय मांडले. संसदीय इतिहासातील हा नवा विक्रम आहे.

शून्य प्रहाराचा कालावधी वाढविण्याची ही दुसरी वेळ आहे. यापूर्वी १८ जुलै २०१९ रोजी शून्य प्रहाराचा कालावधी वाढविण्यात आला होता, त्यावेळी १६१ सदस्यांनी अधिवेशनात चर्चा केली होती. ओम बिर्ला यांनी कालावधी वाढवित गुरुवारी सदस्यांना आपले मुद्दे मांडण्यासाठी शून्य प्रहर पाच तासाने वाढवून दिला. यावेळी २०२ खासदारांनी विविध विषयांवर मत व्यक्त केले

Suyash

सुयश स्पेशल गाईडन्स
(व्हेकेशन बॅच)
(Sci., Maths, English)
❖ १३/२० एप्रिल ते ४ जुन पर्यंत
❖ ७० दिवसांचा कोर्स (उन्हाळी + दिवाळी सुट्टी)
❖ माफक शुल्क, वैयक्तिक लक्ष
❖ बस व मेसची सोय

सुयश ज्युनिअर कॉलेज
(STATE/CBSE BOARD)
NEET/JEE/CET
❖ ७ एप्रिल ते ३१ मे पर्यंत
❖ निवासी व अनिवासी
❖ ११वी कॉलेजची सुरूवात
❖ अकरावी/बारावी संपूर्ण उजळणीसहीत
❖ भरपूर Topicwise test, Full tests
❖ रोज ६ तास शिकवणी व ४ तास स्वअभ्यास
❖ तज्ञ व अनुभवी शिक्षक

सुयश गुरूकुल
एस.आर.पी कॅम्प समोर, विजापूर रोड, सोलापूर. मो.- ७६२०७०९२३७

सुयश विद्यालय
❖ ५वी व ७वी सेमी इंग्रजी प्रवेश चालू
❖ खेळ, कला, एन.सी.सी सर्वांसाठी
❖ ध्यान, प्राणायाम, योग प्रशिक्षण
❖ ८वी, ९वी, १०वी MTS/NTS
❖ IIT/JEE/NEET तयारीसाठी Foundation course शाळेतच होईल.
१६५-अ, रेल्वे लाईन्स, सोलापूर. मो.७३७८७३२५५९




| | 125 NEON | 125 CARBON FIBRE | NS 125 BASE | N160 TWIN DISC | N160 USD |
|---|---|---|---|---|---|
| खास किंमत | ₹85 594/- | ₹92 282/- | ₹99 994/- | ₹1 22 722/- | ₹1 36 992/- |
| बचत | ₹1 184/- | ₹2 000/- | | | ₹5 914/- |

*एक्स-शोरूम किंमत

72198 21111 | BAJAJ SECURE

*नियम आणि अटी लागू. *दाखवलेली एक्स-शोरुम किंमत पल्सर वेरिएंट्ससाठी आहे. किंमतीतील रिविजन विरुध्द पल्सर वेरिएंट्सची एक्स-शोरुम किंमत 31 मार्च 2025 नुसार. बजाज ऑटोने पूर्वसूचना न देता कोणतीही किंवा सर्व ऑफर्स काढून घेण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. साहसी दृश्ये तज्ञांकडून, व्यावसायिक निरिक्षणा अंतर्गत, नियंत्रित आणि राखीव वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यापासून दूर जागेवर केली आहेत. ह्या साहसी दृश्यांचं अनुकरण करू नका आणि नेहमी वाहतुकीचे व सुरक्षिततेचे नियम पाळा. एएमसी विशिष्ट मॉडेल्स आणि विशिष्ट राज्यात उपलब्ध. अधिक माहितीसाठी बजाज डीलरकडे चौकशी करा. रस्त्यावरील मदत तृतीय पक्षांकडून केली जाते आणि ती त्यांच्या नियम व अटींच्या अधीन आहे.

**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Solapur • Station Road** AHERKAR BAJAJ 9689899840 • **Hotgi Road** AHERKAR BAJAJ 8956 069 355 • **Akkalkot Road** AHERKAR BAJAJ 8956 320 060 • **Pandharpur** PANDURANG BAJAJ 8600024805 • **Jeur** SHIVRATNA BAJAJ 9922044676 • **Barshi** AHERKAR BAJAJ 8308004007. **Authorised Service Centre: Mangalwedha** 9890214155, **Marwade** 9028703555, **Akkalkot** 9011556800, **Karkamb** 7057447777, **Vairag** 8308006007, **Sangola** 8888109109, **Karmala** 8888984084, **Kandar** 9673005524, **Rashin** 9975704778, **Mirajgaon** 7774826060, **Akluj** 7756999799, **Natepute** 9850738876, **Mohol** 8830070701.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# नणंदेचं ते प्रकरण उघड केले म्हणून नवरा संतापला, बायकोच्या भुवयांवरून ट्रिमर फिरवला

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल -**

सोलापूर जिल्ह्यातल्या बार्शीमध्ये नात्याला काळिमा फासणारी एक घटना उघड झाली आहे. येथील एका विवाहित महिलेचा तिच्या पतीस तीन जणांनी छळ केला. त्यांनी या महिलेचं जबरदस्तीने मुंडण करत तिला शारीरिक आणि मानसिक त्रास देखील दिला. या प्रकरणात पीडित महिलेनं बार्शी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली आहे.

या तक्रारीनंतर पोलिसांनी त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.या प्रकरणात पीडित महिलेनं दिलेल्या माहितीनुसार, या महिलेचे २०१६ साली लग्न झाले. सुरुवातीला सर्व काही सुरळीत सुरु होतं. पण, नंतर तिला तिची नणंद आणि मेव्हण्याचं अफेयर असल्याची माहिती समजली. हा प्रकार तिनं तिच्या नवऱ्याला सांगितला. त्यांनी त्याकडं दुर्लक्ष केलं. घरातील वादाला कंटाळून आपण काही काळ पुण्यात राहायला गेले होते. नवऱ्यानं आपली समजूत घालून परत घरी आणलं. काही काळ सर्व सुरळीत सुरु होतं. पण, आपण केलेल्या तक्रारीचा राग नवरा, नणंद आणि मेव्हण्याच्या मनात होता, असा आरोप पीडित महिलेनं केला. ८ मार्च २०२५ रोजी पती, नणंद आणि मेव्हण्याने एकत्र येत तिला बेदम मारहाण केली. मेव्हण्याने गळा दाबण्याचा प्रयत्न केला. नणंदेने केस ओढले आणि पतीने लाथाबुक्यांनी मारहाण करत चारित्र्यावर संशय घेतला. त्यानंतर पतीने रागाच्या भरात तिच्या भुवयांवरून ट्रिमर फिरवत चेहरा विद्रुप केला आणि जबरदस्तीने मुंडण करण्यास भाग पाडले, असा गंभीर आरोप पीडित महिलेनं केला आहे. या प्रकरणाची कुठं तक्रार केली तर मला आणि कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी त्यांनी दिली होती. त्यामुळे आपण काही काळ गप्प होतं. पण, हा त्रास असह्य झाल्यानं बहिणीच्या घरी धाव घेतली. त्यानंतर बार्शी पोलीस स्टेशनमध्ये याबाबत तक्रार केली आहे, अशी माहिती पीडितेनं दिली आहे. पती, नणंद आणि मेव्हण्याविरोधात विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेने संपूर्ण बार्शी खळबळ उडाली आहे.

# भाजप कार्यकर्त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी खास वेळ देणार : पालकमंत्री जयकुमार गोरे

## सोलापूर भाजप पदाधिकाऱ्यांची बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

सोलापूर शहर जिल्ह्यातील भाजप कार्यकर्त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी तसेच पक्ष संघटन आणखीन मजबूत करण्यासाठी आपण महिन्यातील दोन दिवस आपण सोलापुरात आल्यावर काही वेळ राखून ठेवणार आहोत, अशी ग्वाही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापुरात दिली.



भारतीय जनता पार्टी सोलापूर जिल्ह्यातील ३ संघटनात्मक जिल्ह्याची संघटनपर्व अंतर्गत प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत सोलापुरातील लिंगशेट्टी मंगल कार्यालयात झाली झाली, याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पश्चिम महाराष्ट्र संघटनमंत्री मकरंद देशपांडे, आमदार सुभाषबापू देशमुख, आमदार समाधान आवताडे, आमदार देवेंद्र कोठे, पश्चिम जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार, शहराध्यक्ष नरेंद्र काळे,संघटन प्रभारी माजी खासदार अमर साबळे, दीपक नागपुरे, सरचिटणीस शशिकांत चव्हाण, नारायण बनसोडे सर, संजय कोळी, यांच्यासह माजी नगरसेवक,भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्तविकात शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी पालकमंत्र्यांनी महिन्यातून किमान १५ दिवसातून एकदा कार्यकर्त्यांसाठी वेळ द्यावा अशी विनंती केली. हा धागा पकडून पालकमंत्रीन म्हणाले, ही मागणी रास्त आहे. आपण महिन्यातून दोन दिवस सोलापुरात येणार आहोत. यावेळी आपण पक्षाच्या कार्यालयात येऊन कार्यकर्त्यांसाठी खास वेळ देणार आहोत. कार्यकर्त्यांच्या अडीअडचणी सोडवण्याबरोबरच त्यांच्या पाठीशी ठामपणे राहण्याची माझी भूमिका राहीले, असे ते म्हणाले. मी तळागाळातून पुढे आल्याने कार्यकर्त्यांच्या अडचणी मला माहित आहेत. एखाद्या मंत्र्याला भेटण्यासाठी कार्यकर्त्यांना किती धडपड करावी लागते, याचीदेखील मला जाणीव आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांच्या कामाला प्राधान्य राहणार.

**आ. विजयकुमार देशमुख यांची बैठकीला दांडी**

भाजप पदाधिकाऱ्यांची ही महत्त्वाची बैठक शहर उत्तर मतदारसंघातील लिंगशेट्टी मंगल कार्यालयात झाली. यावेळी शहर उत्तरचे आमदार विजयकुमार देशमुख यांची अनुपस्थिती होती, हे विशेष. आमदार विजयकुमार देशमुख सोलापुरात असून देखील या बैठकीला आले नाहीत, यावरून बैठकीदरम्यान पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उलटसुलट चर्चेला उधाण आले होते.

## महत्वाचे...

### आत्महत्या करण्याचा प्रयत्न करुन बदनामी केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

स्वत:हून कसल्यातरी गोळ्याचे सेवन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला, पैशाच्या कारणावरून समाज माध्यमांवर अश्लील स्वरूपाचे मेसेज करून बदनामी केल्याप्रकरणी एकावर फौजदार चावडी पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. सिद्धेश्वर चंद्रकांत हायगुंडे (रा. सी.३० न्यू संतोष नगर, विजापूर रोड) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत अरुण रामचंद्र डिगोळे (वय ६५,रा. २४४ दमानी नगर) यांनी फिर्याद दिली आहे. ही घटना २१ ते २३ मार्च दरम्यान दमानी नगर सोलापूर या ठिकाणी घडली आहे. आरोपी हा अरुण डिगोळे यांच्या भावाचा जावाई आहे. तरी त्याने फिर्यादीच्या घरी येवून फिर्यादीची बायको, मुलं कुठे गेली आहेत. ती घर सोडून का गेली, जुगार खेळल्यामुळे मला ७० लाखाचे कर्ज झाले आहे. तुम्ही सर्वजण मिळून मला पैसे द्या, नाहीतर मी माझी बायको, मुलाला मारून टाकीन, तुम्हाला बघून घेईल अशी धमकी देत शिवीगाळ केली. नंतर पोलिसांत जावून तक्रार दिली होती.स्वत:हून कसल्यातरी ६ गोळ्या खाल्ल्या व सिव्हिल रुग्णालयात दाखल झाला. त्याचे फोटो फिर्यादीस व नातेवाईकांना पाठवले. मी आत्महत्या करून तुमचे नाव घेतो असे म्हणून धमकी दिली,दुसऱ्या दिवशी त्याला पैसे न दिल्याच्या कारणावरून समाज माध्यमांवर अश्लील स्वरूपाचे संदेश पाठवून बदनामी केल्याचे पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत म्हटलं आहे. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार बाचावार पुढील तपास करीत आहेत.

### झोपलेल्या महिलेला सर्पदंश

**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

राहते घरी झोपलेल्या महिलेला सापाने दंश केला. हा प्रकार गुरुवारी दुपारी ३ वाजता कुंभारी येथे घडला. संगिता बनसिध्द गुंडे (वय ४०) असे सर्पदंश झालेल्या महिलेचे नाव आहे. गुरुवारी दुपारी तीनच्या सुमारास संगिता या राहत्या घरी झोपल्या होत्या. त्यावेळी अचानक त्यांच्या डाव्या पायाला सापाने दंश केला. दुपारी चार वाजता मुलगा भुताळसिध्द याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. रुग्ण शुध्दीवर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले असून या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



### स्व. महेश अण्णा कोठे यांच्या ६१व्या जयंतीनिमित्त मोफत आरोग्य शिबिर

**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांच्या स्व. विष्णुपंत कोठे मेमोरियल हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरच्यावतीने स्व. महेश अण्णा कोठे यांच्या ६१व्या जयंती निमित्त मोफत आरोग्य शिबिर झाले. संभाजीराव शिंदे विद्यामंदिर विडी घरकुल येथे कोठेज गॅस्ट्रोलॉजी सेंटर यांच्यावतीने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन केले. या शिबिराचे उद्घाटन डॉ जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, डॉ वंशपायन वैद्यकीय महाविद्यालय अधिष्ठातामा डॉ. संजीव ठाकूर, आमदार देवेंद्र कोठे, डॉ. नितीन तोष्णीवाल, डॉ. अभिजित चिंचोळी, डॉ. अमजद सय्यद, डॉ. मोहनीश बोल्ली, डॉ. महेश आरकल, डॉ. दिनेश पगडीमल, डॉ. लता पाटील डॉ. वेदिका पगडीमल, डॉ संजय मंठाळे, संतोष चिवडशेट्टी, माजी नगरसेवक प्रथमेश कोठे, विनायक कोंड्याल, श्रीनिवास चिलका, श्रुती कोठे, धनश्रीताई कोंड्याल, सुहासिनीताई कोठे, व्यंकटेश चिलका, अजिंक्य घोडके, माजी नगरसेविका कुमुदताई अंकाराम, सुरेश पाटील, बिज्जू प्रधाने, गुरुशांत धुत्तरगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. आभार प्रदर्शन डॉ.राधिका चिलका यांनी केले.



### स्वामी समर्थ प्रकटदिनानिमित्त वृक्षारोपण व मिठाई वाटप

**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

श्री समर्थ प्रतीष्ठान सामाजिक संस्थेच्यावतीने श्री स्वामी समर्थ प्रकटदिनामित्त श्री समर्थ प्रतीष्ठान सामाजिक संस्थेचे अध्यक्ष विजय पंगुडवाले व बापू अडसूळ यांच्या हस्ते वृक्षारोपण व मिठाई वाटप करण्यात आले. वृक्षारोपण पोलिस मुख्यालयात तर मिठाई वाटप दत्त चौक येथे करण्यात आले. यावेळी आकाश गायकवाड, अविनाश गायकवाड, रवी कुंभार, हरी पोबत्ती, गोपी गंजी, सचीन हुच्चे व संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.



# पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी घेतले ग्रामदैवत सिद्धरामेश्वरांचे दर्शन

**आमदार देवेंद्र कोठे आणि पंचकमिटीच्या विश्वस्तांकडून जाणून घेतली विस्तृत माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी गुरुवारी ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर मंदिरास भेट देऊन दर्शन घेतले. यावेळी आमदार देवेंद्र कोठे आणि श्री सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांच्याकडून पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी मंदिराविषयी विस्तृत माहिती जाणून घेतली.

प्रारंभी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते सिद्धरामेश्वरांची आरती करण्यात आली. यावेळी श्री सिद्धेश्वर देवस्थान कमिटीकडून पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आमदार देवेंद्र कोठे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पालकमंत्री श्री. गोरे यांनी मंदिराची तसेच मंदिर परिसरात सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी केली. याप्रसंगी श्री सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांनी शिवयोगी सिद्धरामेश्वर यांचा इतिहास, पंच कमिटीच्या आजवरच्या धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील कार्याची माहिती दिली. पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर मंदिर, मंदिराभोवतालचा तलाव, भुईकोट किल्ला यामुळे हा परिसर निसर्गरम्य आणि अतिशय सुंदर भासतो. सिद्धरामेश्वर मंदिरासाठी शासनाकडून जी सेवा देता येईल ती करण्यासाठी तत्पर राहीन, असेही गोरे याप्रसंगी म्हणाले.

यावेळी आमदार देवेंद्र कोठे, श्री सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी, माजी नगरसेवक विनायक कोंड्याल, गुरुशांत धुत्तरगांवकर, मेघनाथ येमुल, राजकुमार हंचाटे, सुरेश तमशेट्टी, संतोष पाटील, भाजपा सरचिटणीस नागेश सरगम, भाजपा युवा मोर्चाचे अक्षय अंजिखाने, भाजपा ओबीसी सेलचे सिध्दाराम खजुरगी, सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटीचे गुरु माळगे, प्रभूराज मैंदर्गीकर, रतन रिक्के, अॅड. आर. एस. पाटील, परिवहनचे माजी सभापती आनंद मुस्तारे, विजय कुलथे, भाजपा सोशल मीडियाचे अभिषेक चिंता, अंबादास सकिनाल, संकेत विभुते, कुमार पायाणी आदी उपस्थित होते.



# जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांना आल्या नव्या कोऱ्या ३ गाड्या

## पालकमंत्र्यांच्या हस्ते केले पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ०३ मार्च-**

जिल्हा प्रशासनात अधिकाऱ्यांना नवीन ६ गाड्या येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली होती. त्या अनुषंगाने नव्या कोऱ्या हुंडाईच्या ३ गाड्या जिल्हा प्रशासनाच्या ताफ्यात दाखल झाल्या असून, या गाड्यांचे पूजन नियोजन भवनच्या आवारात पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते करण्यात आले.

यातील एक गाडी आरडीसी मनिषा कुंभार यांच्यासाठी असून, इतर २ गाड्या प्रांतांसाठी असल्याचे सांगण्यात आले. २४-२५ च्या आर्थिक नियोजन अंदाज पत्रकात जिल्हा प्रशासन व महसुल विभागाच्या गाड्यांची वारंवार दुरुस्ती निघत असल्याने नवीन ६ गाड्या मिळाव्या म्हणून मागणी करण्यात आली होती. त्यानुसार पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी त्वरित मान्यता देण्यात दिली होती. यावेळी अप्पर जिल्हा अधिकारी मोनिका सिंह, निवासी उपजिल्हा अधिकारी मनीषा कुंभार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपजिल्हाधिकारी सदाशिव पडदुणे, उपजिल्हाधिकारी सुमित शिंदे, तहसीलदार श्रीकांत पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, रमेश जाधव,सुनील पांचाळ यांच्यासह विविध विभाग प्रमुख, अधिकारी उपस्थित होते.

**इतरही वाहनांचा लोकार्पण सोहळा :** जिल्हा वार्षिक योजना सन २०२४- २०२५ सर्वसाधारण अंतर्गत सोलापूर शहर पोलीस आयुक्त कार्यालयाला अकरा वाहने उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत, त्या वाहनांना पोलीस आयुक्त कार्यालय येथे हिरवा झेंडा दाखवून पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी लोकार्पण केले. तर महसूल विभागाला देण्यात आलेल्या शासकीय वाहनांचे लोकार्पणही नियोजन समिती परिसरात पालकमंत्री यांच्या हस्ते करण्यात आले.



# ए.जी. पाटील महाविद्यालयात ए.जी.टेकफेस्ट २के२५ उत्साहात

**सोलापूर, दि.३ एप्रिल**

ए. जी. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात ए. जी.टेकफेस्ट २के२५ हा टेकनिकल कार्यक्रम संगणक विभागाने आयोजित केला होता.या कार्यक्रमात जवळपास १००० विद्यार्थ्यांनी आपल्या तांत्रिक कौशल्यांचा आणि सृजनशीलतेचा उत्कृष्ट आविष्कार सादर केला.

कार्यक्रमाचे उदघाटन संस्थेचे कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार तसेच कॉर्पोरेट ट्रेनर श्री रॉबर्ट गौडर यांचे हस्ते उद्‌घाटन झाले. महाविद्यालयाचे अध्यक्ष श्री सिद्धेश्वर पाटील व ट्रस्टी शिवानंद पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे कौतुक केले. कार्यक्रमाचा उद्देश संगणक विभागाचे विभागप्रमुख प्रा. एस. व्ही. कुलकर्णी यांनी सांगितला.

या टेकफेस्टमध्ये मेकॅनिकल, सिव्हिल, इलेक्ट्रॉनिकस अँड टेलीकम्युनिकेशन, कॉम्प्युटर व ट्रैनिंग अँड प्लेसमेंट सेल या विभागानीं तांत्रिक स्पर्धा, प्रकल्प प्रदर्शन, पोस्टर प्रदर्शन, पिक अँड स्पीक, पेपर सादरीकरण आणि पॅनेल चर्चासत्रांचे आयोजन केले होते. पेपर सादरीकरण आणि पोस्टर प्रदर्शन यांसारख्या स्पर्धांनी विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक भावना निर्माण केली.

को कनव्हेनर प्रा. असमा हन्नूरे, टेक्निकल हेड प्रा. ए. पी. होसले, प्रा. एस. एस. मेटगार, प्रा. के. आर. मामड्याल, प्रा. डी. ए .जव्हेरी, प्रा. एन. पी. पाटील यांनी परिश्रम घेतले.

# सोलापुरात पक्ष्यांसाठी उद्या वाटली जाणार १ हजार जलपात्रे

**लिटिल फ्लॉवर्स स्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा अनोखा पाणपोई उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

सोलापुरात पक्ष्यांसाठी शनिवार दि. ५ एप्रिल रोजी चार हुतात्मा पुतळा चौक येथे सकाळी ७ वाजल्यापासून पक्षांना पाणी ठेवण्यासाठी शहरवासीयांना एक हजार जलपात्र मोफत वाटली जाणार आहेत. सोलापुरातील लिटल फ्लावर कॉन्व्हेंट हायस्कूलच्या १९८८ च्या दहावीच्या बॅचमधील माजी विद्यार्थ्यांनी अनोखा असा हा पक्ष्यांसाठी पाणपोई उपक्रम सुरू केला आहे, अशी माहिती जितेंद्र व्होरा यांनी पत्रकार परिषदेत दिली.






अहमदाबाद मधील अंकुर इंडस्ट्रीज च्या पुढाकाराने सोलापूरकरांना ही पक्षांसाठी मातीची भांडी दिली जाणार आहेत. शनिवारी सकाळी सात वाजता या उपक्रमाचा शुभारंभ सोलापुरातील लोकप्रतिनिधी, तसेच विविध शासकीय अधिकारी आणि उद्योजक यांच्या हस्ते केला जाणार आहे. आ. विजयकुमार देशमुख, आ. देवेंद्र कोठे, आ. सुभाष देशमुख, खासदार प्रणिती शिंदे, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, पोलीस आयुक्त एम राजकुमार, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने यांनाही कार्यक्रमात सहभागी होण्याबाबत निमंत्रण देण्यात आले आहे.

सोलापूर जिल्ह्यात महाकाय असे उजनी धरण आहे. या ठिकाणी हजारो पक्षी शेकडो मैल प्रवास करून येतात. सोलापूर शहरातील हिप्परगा तलाव, छत्रपती संभाजी महाराज तलाव, सिद्धेश्वर तलाव तसेच होटगी तलाव या ठिकाणी विविध प्रजातीचे पक्षी आढळतात. सोलापूरच्या आजूबाजूचे वातावरण पक्षांसाठी पोषक असल्यामुळे पक्षांचे सोलापूर हे माहेरघर आहे. सोलापूरचे तापमान उन्हाळ्यामध्ये सरासरी ४० अंशाच्या वरच राहते. त्यामुळे पक्षांना पाणी शोधण्यासाठी मोठी कसरत करावी लागते म्हणून पक्षांसाठी सर्वांनी पाणी ठेवावे म्हणून खास अहमदाबाद मध्ये बनवलेली ही मातीची भांडी शहरवासीयांना दिली जाणार आहेत. एकूण ५ हजार जलपात्रे देण्याचा निर्णय घेण्यात आला असून शनिवारी यातील एक हजार जलपत्रांचे वितरण करण्यात येणार आहे.

शहरवासीयांनी शनिवारी सकाळी सात वाजल्यापासून चार पुतळ्याजवळ येऊन पक्षांसाठीची ही जलपात्रे घेऊन जावीत. तसेच या भांड्यामध्ये पाणी पितानाचे पक्षांचे फोटो आम्हाला पाठवावेत त्यातील उत्कृष्ट अशा तीन छायाचित्रांना आम्ही बक्षीस देऊन त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे, असे जितेंद्र व्होरा यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेस द्वारका उपलप, रमेश रापेल्ली हे उपस्थित होते.

# सोलापूर बाजार समिती 'अ' पंचतारांकित गटात

- **मुंबई, पुणे, नागपूर, लातुरनंतर सोलापूरचा समावेश**
- **उत्पन्नाची अट २५ कोटी असताना सोलापूर बाजार समितीचे उत्पन्न ३५ कोटी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ एप्रिल-**

राज्य शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्रालयाने राज्यातील ३०५ कृषी उत्पन्न बाजार समिती समित्यांचे उत्पन्नानुसार वर्गीकरण केले आहे. यापूर्वी २००१ मध्ये झालेल्या वर्गीकरणानंतर आता २४ वर्षांनी वर्गीकरण झाले आहे. २५ कोटी रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या राज्यातील पाच बाजार समित्यांना अ पंचतारांकितचा (फाइव्ह स्टार) दर्जा दिला आहे. या पाच बाजार समित्यांमध्ये मुंबई, पुणे, नागपूर, लातूर या बाजार समित्यांच्या यादीत आता सोलापूर बाजार समितीचाही समावेश आहे.

एकीकडे बाजार समितीच्या संचालक मंडळाची निवडणूक सुरू असताना राष्ट्रीय बाजारची भीती इच्छुकांना आहे. राष्ट्रीय बाजार होण्यासाठी आवश्यक असलेल्या उत्पन्नाच्या महत्त्वाच्या निकषात सोलापूर आल्याने राष्ट्रीय बाजारच्या पहिल्याच यादीत सोलापूरचेही नाव येऊ शकते, अशी शक्यता निर्माण झाली आहे. राज्यातील १५ कृषी उत्पन्न बाजार समितीचे उत्पन्न दहा ते पंचवीस कोटींपर्यंत असल्याने त्यांना चार तारांकितचा अ वर्गाचा दर्जा दिला आहे. त्यामध्ये जिल्ह्यातील बार्शी ही एकमेव कृषी उत्पन्न बाजार समितीचा समावेश आहे.



पाच ते दहा कोटीपर्यंत उत्पन्न असणाऱ्या राज्यातील २३ बाजार समित्यांना तीन तारांकितचा अ वर्गाचा दर्जा दिला असून त्यामध्ये जिल्ह्यातील एकाही बाजार समितीचा समावेश नाही. अडीच ते पाच कोटी रुपयांपर्यंत उत्पन्न असणाऱ्या राज्यातील ६० बाजार समित्यांना दोन तारांकितचा अ दर्जा दिला असून त्यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर व अकलूज या दोन बाजार समित्यांचा समावेश आहे. एक कोटी ते अडीच कोटी रुपयांपर्यंत उत्पन्न असणाऱ्या राज्यातील ९१ बाजार समित्यांना एक तारांकितचा अ वर्गाचा दर्जा दिला असून त्यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील कुर्डूवाडी, दुधनी, करमाळा व सांगोला या बाजार समित्यांचा समावेश आहे. ५० लाख ते एक कोटीपर्यंत उत्पन्न असणाऱ्या राज्यातील ५४ बाजार समित्यांना शासनाने ब वर्ग दिला आहे. त्यामध्ये अक्कलकोट, मंगळवेढा व मोहोळ या बाजार समितीचा समावेश आहे. २५ लाख ते पन्नास लाखांपर्यंत उत्पन्न असणाऱ्या २७ बाजार समित्यांना क वर्गाचा दर्जा दिला असून त्यामध्ये जिल्ह्यातील एकाही बाजार समितीचा समावेश नाही. २५ लाखांपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या ३० बाजार समित्यांना ड वर्गाचा दर्जा दिला आहे. त्यामध्येही जिल्ह्यातील एकाही बाजार समितीचा समावेश नाही.

**बाजार समित्यांची आर्थिक परिस्थिती पाहून निर्णय घेणार**

बाजार समितीच्या आस्थापना खर्च मर्यादेबाबत वर्गीकरणाचा थेट संबंध आहे. राज्यातील अ वर्ग बाजार समित्यांसाठी ४५ टक्के आस्थापना खर्चाची मर्यादा आहे. ब वर्ग बाजार समित्यांच्या आस्थापना खर्चासाठी ५० टक्के मर्यादा आहे. क व ड वर्गीय बाजार समित्यांच्या आस्थापना खर्चामध्ये दहा टक्के वाढ करण्याबाबत पणन मंडळ बाजार समित्यांची आर्थिक परिस्थिती पाहून निर्णय घेणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# वाळू माफियांनो, सावधान..!

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा इशारा

### ● ५ वाळू माफियांवर एमपीडी अंतर्गत राज्यातील झाली पहिली कारवाई; राजकीय हस्तक्षेप खपवून घेणार नाही!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. 0३ एप्रिल-**

जिल्ह्यातील शासकीय वाळू ठेक्यांवर डल्ला मारणाऱ्या ५ वाळू माफियांवर एमपीडी अंतर्गत जिल्हा पोलिस दलाने एम पीडी अंतर्गत राज्यातील पहिली कारवाई केली आहे. यामुळे वाळू माफियांनो... सावधान! आता कोणाचीही गय केली जाणार नाही; भविष्यातही वाळू तस्करी करणाऱ्यांवर कडक कारवाईचा बडगा उचलण्यात येईल, असा इशारा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पत्रकारांशी संवाद साधताना आज (दि.३) दिला.

आता कोणीही, कोणतेही राजकीय वजन वापरले तरी या वाळू माफियांची सुटका करणार नाही...असाही सज्जड दम पालकमंत्री गोरे यांनी भरला. दरम्यान, अजून दुसरी वाळू तस्करांची यादी आमच्याकडे तयार आहे; यामुळे बेकायदेशीर वाळू उपसा कोणीही करू नये, असेही आवाहन गोरे यांनी केले. जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित विविध विभागाच्या आढावा बैठकीनंतर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पत्रकारांशी बोलताना वरील माहिती दिली. पालकमंत्री गोरे यांच्या २ दिवसांच्या दौऱ्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. या दौऱ्याबाबत विस्ताराने बोलताना पालकमंत्री गोरे म्हणाले की, नियोजन भवनमध्ये विविध विभाग प्रमुख, अधिकारी यांची मी बैठक घेवून त्यांना शासन स्तरावरील



विविध विकास कामे त्वरित पूर्ण करा, चूक झाल्यास माफी नाही, असा इशारा देखील दिल्याचे त्यांनी सांगितले.

पालकमंत्री गोरे यांनी अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत पंढरपूर तीर्थक्षेत्र विकासाची चालू असलेली कामे, अरण येथील संत सावता माळी तीर्थक्षेत्र विकास, श्री बसवेश्वर महाराज स्मारक, मंगळवेढा, चोखामेळा स्मारक, सोलापूर शहरातील उड्डाणपुलाच्या कामाची माहिती घेतली. तर जिल्हा वार्षिक योजना निधीचा आढावाही घेतला. इतकेच नाहीतर जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या १00 दिवशीय सात सुत्री कार्यक्रम ातून झालेल्या कामांवरही त्यांनी धावती नजर टाकली आणि हे काम बारमाही चालू ठेवण्याच्या त्यांनी जिल्हा प्रशासनास सुचना दिल्या आहेत. जिल्ह्यातील प्रत्येक शासकीय कार्यालयात महिलांसाठी शौचालय उभारणी करावी, जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांतील प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यास सांगितले असून, याचे सर्व नियंत्रण जिल्हा परिषद शिक्षण विभागातून होणार आहे. महावितरणकडून घरगुती आणि शेतकऱ्यांना पुरविण्यात येणारी वीज, जिल्ह्यातील उजनी व अन्य प्रकल्पातील पाणीसाठ्याचा अंदाज घेवून ते आगामी उन्हाळ्यासाठी पाणी नियोजन करण्याच्या सुचनाही त्यांनी दिल्या आहेत. दरम्यान, टंचाईच्या काळात ज्या गावकऱ्यांनी पाण्याचे टँकर मागितले तर त्यांना गतीने पाणी टँकर पुरविण्यास सांगितले आहे. जिल्हा परिषदेतील उमेद मॉल जागा निश्चितीबाबतचाही विषय आणि जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचाही विषयावर विस्ताराने चर्चा केल्याचे पालकमंत्री म्हणाले.

**'त्या' अधिकाऱ्यांवर कारवाई अटळ :** दरम्यान, गत डिपीसीच्या बैठकीत पालकमंत्री गोरे यांनी आरोग्य विभाग आणि क्रीडाविभागासह इतर काही विभागप्रमुखांची चांगलीच झडती घेतली होती. मात्र त्यांच्यावरील कारवाईचे पुढे काय झाले? या प्रश्नाला उत्तर देताना पालकमंत्री म्हणाले, त्या संबंधित अधिकाऱ्यांवरील कारवाईचे प्रस्ताव शासनाच्या वरिष्ठ स्तरावर जिल्हा प्रशासनाकडून गेले आहेत. त्यांच्यावरील कारवाई अटळ असल्याचीही स्पष्टोक्ती पालकमंत्री गोरे यांनी यावेळी दिली.


**विमानसेवेबाबत मी लवकरच गोड बातमी देईन! :** यावेळी पत्रकारांनी सोलापुरातील विमानसेवेच्या रखडलेल्या सेवेबाबत प्रश्न विचारल्यावर पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, मी येत्या आठवड्यात दिल्ली येथे जाणार आहे. यानंतर मी सोलापुरातील विमानसेवेबाबत गोड बातमी देणार असल्याचा निर्वाळा दिला. तर सोलापुरातील दुहेरी पाईललाईनचा वनविभागाच्या जागेवरून रखडलेला विषयही लवकरच मार्गी लावणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**उड्डाणपुलाबाबत सुवर्णमध्य काढणार :** सोलापूर शहर विकासाचा दोन्ही बाजूने विचार करता वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी उड्डाण पूल अत्यंत आवश्यक आहे मात्र येथील काही व्यापाऱ्यांना व्यवहार करण्यासाठी पुन्हा अडचणी निर्माण होणार असल्याची त्यांची खंत आहे. या दोन्ही बाजूंचा विचार करून व स्थानिक लोकप्रतिनिधींशी चर्चा करून सुवर्णमध्य काढण्यात येणार आहे. दरम्यान, या निर्णयामुळे जनता व व्यापारी दुखावला जाणार नाही, याचीही काळजी घेणार असल्याचे पालकमंत्री गोरे यांनी सांगितले.

## महत्त्वाचे

### ट्रम्प टॅरिफमुळे बाजारात घसरण

**मुंबई :** अमेरिकी राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी जगातील बहुतांश देशांवर टॅरिफ हल्ला चढवल्याने देशांतर्गत शेअर बाजारात घसरणीचा कल दिसून आला. मात्र, ही घसरण अपेक्षेपेक्षा कमी राहिली.



निर्देशांक ३२२ अंकांनी घसरून ७६,२९५ वर बंद झाला तर निफ्टी ८२ अंकांनी खाली येत २३, २५० वर स्थिरावला. ट्रम्प यांनी भारतावर २७ टक्के शुल्काची घोषणा केली आहे. त्यामुळे आयटी, ऑटो, धातू आणि तेल कंपन्यांच्या शेअर्समध्ये जोरदार विक्री दिसून आली. दुसरीकडे, या विक्रीच्या दबावातही फार्मा, युटिलिटी, ऊर्जा आणि टेलिकॉम क्षेत्रातील शेअर्स वधारले होते. अमेरिकेने सध्या फार्मा क्षेत्राला टॅरिफच्या रिंगणाबाहेर ठेवले आहे.

### फटाक्यांवरील बंदी उठविण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

**नवी दिल्ली :** दिल्ली एनसीआरमध्ये फटाक्यांच्या निर्मिती, साठवणूक आणि विक्रीवरील बंदी उठविण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. वायू प्रदूषण बऱ्याच काळापासून धोकादायक पातळीवर असल्याने बंदी उठवणे योग्य नसल्याचे न्यायालाने म्हटले आहे. रस्त्यावर काम करणाऱ्या लोकांना प्रदुषणाचा सर्वाधिक त्रास होतो. प्रत्येकालाच घरात किंवा कामाच्या ठिकाणी हवा शुद्धीकरण यंत्र बसविणे शक्य नसते, असे या प्रकरणी सुनावणी करताना न्यायमूर्ती अभय एस ओका आणि उज्जल भुईया यांच्या खंडपीठाने सांगितले. जोपर्यंत हे सिद्ध होत नाही की, हिरव्या फटाक्यांमुळे प्रदूषण खूप कमी होत, तोपर्यंत या बंदीचा पुनर्विचार करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. दिल्लीतील विलक्षण परिस्थितीमुळे, फटाक्यांवर बंदी घालणे अत्यंत आवश्यक आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले. दिल्लीतील वायू प्रदूषणाची परिस्थिती खूपच वाईट आहे. राज्यघटनेच्या कलमानुसार उत्तम आरोग्य हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार आहे. यामध्ये स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त वातावरणात जगण्याचा अधिकार देखील समाविष्ट आहे. मागील सहा महिन्यात या न्यायालयाने अनेकदा असे आदेश दिले आहेत.

# ट्रम्प यांचा भारताला धक्का

### भारतीय वस्तूंवर २७ टक्के आयात कर; उद्योग क्षेत्रात खळबळ

वॉशिंग्टन, ३ एप्रिल

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतासह जगभरातील ६0 देशांवर परस्पर आयात कर लागू करण्याची घोषणा केली. यात भारतीय वस्तूंवर २७ टक्के, बांगलादेश व चीनवर ३४, श्रीलंका व म्यानमार ४४ तर व्हिएतनामवर ४६ टक्के कर आकारला जाणार असून याची अंमलबजावणी ९ एप्रिलपासून होणार आहे. ट्रम्प यांनी लादलेले कर शुल्क १९७७ च्या इंटर्नॅशनल इमर्जेंसी इकॉनॉमिक पॉवर्स ॲक्ट च्या अंतर्गत लागू राहणार आहे.



मुक्तिदिनानिमित्त केलेल्या भाषणात ट्रम्प म्हणाले, अमेरिकेची व्यापारी तूट भरून काढण्यासाठी आणि रोजगारनिर्मिती तसेच उत्पादन क्षेत्राला चालना देण्यासाठी सर्व देशांवर सरसकट १0 टक्के, तर ६0 देशांवर परस्पर कर लावण्यात येणार आहे. ज्यांना करासंदर्भात आक्षेप असेल त्यांनी वस्तूंची निर्मिती आमच्या देशात करावी. त्यांच्यावर आम्ही कुठलाही कर आकारणार नाही. भारताचे पंतप्रधान मोदी माझे मित्र आहे, परंतु भारत अमेरिकेच्या वस्तूंवर ५२ टक्के कर वसूल करतो. त्यामुळे अमेरिकाही भारताकडून २७ टक्के कर वसूल करणार आहे.

## वक्फ विरोधात द्रमुक न्यायालयात

**चेन्नई, ३ एप्रिल**

तब्बल बारा तासांच्या वादळी चर्चेनंतर लोकसभेत बुधवारी वक्फ दुरुस्ती विधेयकाला बहुमताने मंजुरी देण्यात आली. विधेयकाच्या समर्थनार्थ २८८ सदस्यांनी मतदान केले, तर २३२ सदस्यांनी विरोध केला. तसेच, २३ जणांनी मतदानात भाग घेतला नाही. विधेयकावरील चर्चे दरम्यान सत्ताधारी आणि विरोधी पक्षांनी आपली ताकद दाखवून दिली. तामिळनाडूचे मुख्यमंत्री आणि द्रमुकचे अध्यक्ष एम के स्टॅलिन यांनी या विधेयकाला तीव्र विरोध केला आहे. आपला पक्ष या विधेयकाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार असल्याचे त्यांनी विधानसभेत बोलताना सांगितले.



थायलंडच्या दौऱ्यावर असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी गुरुवारी बँकॉक येथे दाखल झाले. यावेळी तेथील भारतीय वंशाच्या नागरिकांनी त्यांचे भव्य स्वागत केले. एक महिला मोदी यांना पाहून अक्षरश: गहिवरून गेली होती

# ब्रेकअपनंतर बलात्काराचा गुन्हा दाखल व्हायला नको

### सुप्रीम कोर्टाने व्यक्त केली चिंता

**◆ नवी दिल्ली, ३ एप्रिल**

अलीकडच्या काळात लग्नाचं आमिष दाखवून बलात्कार केलेल्या वाढत्या प्रकरणांवर सुप्रीम कोर्टानं चिंता व्यक्त केली आहे. जे नाते लग्नापर्यंत पोहचत नाही, त्यात अशाप्रकारे गुन्हे दाखल केले जात आहेत. हे चुकीचे आहे. नातेसंबंधात राहणे हे गुन्ह्यासारखे झाले आहे. एखाद्याशी ब्रेकअप झालं त्याचा अर्थ बलात्कार झाला असं होत नाही. प्रेम संबंध बिघडणे, वेगळे राहणे त्यानंतर बलात्काराचा गुन्हा करायला नको असं सुप्रीम कोर्टाच्या न्या.एमएम सुंदरेश आणि न्या. राजेश बिंदल यांच्या खंडपीठाने म्हटलं आहे.

कोर्टात एका व्यक्तीने त्याच्यावरील बलात्काराचे गुन्हे रद्द करण्याची मागणी केली होती.

त्याच्या जोडीदार महिलेने आरोप केला होता की, लग्नाचे आमिष दाखवून त्याने मला शारीरिक संबंध ठेवण्यास मजबूर केले. वरिष्ठ वकील माधवी दीवान यांनी पीडितेची बाजू कोर्टात मांडली. त्यावर कोर्टानं म्हटलं की, पीडितेने इतकी सीनिअर वकील नियुक्त केली आहे त्यामुळे ती निष्पाप आहे असं



मानलं नाही जाऊ शकत. तुम्ही वयस्क आहात. त्यामुळे तुम्हाला फसवून लग्नाचं वचन देऊन विश्वास संपादन केला गेला असं सांगू शकत नाही असं त्यांनी म्हटलं. तसेच रोमान्स संपला अथवा ब्रेकअप झाला याचा अर्थ बलात्काराचा गुन्हा झाला असं नाही.

समाज ज्यारितीने बदलत चालला आहे त्यातून आपल्याला समजायला हवं रिलेशनशिप तुटणे म्हणजे रेपचा गुन्हा बनायला नको. आज नैतिकता आणि मूल्ये बदलली आहेत. विशेषत: युवा पिढी बदलत आहे. जर आम्ही हे मान्य केले तर कॉलेजमध्ये मुला-मुलींमधील नातेसंबंध दंडनीय होतील. समजा, कॉलेजमधील २ विद्यार्थ्यांचे प्रेम असेल. मुलाने मुलीला मी तुझ्याशी लग्न करतो असं म्हटलं,त्यानंतर त्याने केले नाही तर तेदेखील गुन्हा मानला जाईल का असं मत सुप्रीम कोर्टाने व्यक्त केले.

दरम्यान, हे प्रकरण अँरेंज मॅरेजचं आहे. युवतीला वाटले जर तिने साथीदाराला खुश केले नाही तर तो तिच्याशी लग्न करणार नाही. या दोघांचा साखरपुडा झाला होता. युवकासाठी हे कॅज्युअल सेक्स असेल परंतु मुलीसाठी ते तसे नव्हते, असा पीडितेच्या वकिलाने कोर्टात युक्तिवाद केला. (वृत्तसंस्था)

### तरीही महिलेने संबंध ठेवले

पीडितेच्या वकिलाच्या त्यावर सुप्रीम कोर्ट सहमत झाले नाही. केवळ लग्न न होणे म्हणजे बलात्कार मानला जाईल का, असा सवाल कोर्टाने विचारला. आम्ही एकाच दृष्टीकोनातून हे पाहू शकत नाही. आमचीही मुलगी आहे. जर तीदेखील या परिस्थितीत असती तरीही व्यापकदृष्टीने आम्ही याकडे पाहिले असते. तक्रारदार महिलेला हे नाते संपू शकते हे माहिती असतानाही तिने संबंध ठेवले असे कोर्टाने म्हटलं. त्यानंतर या प्रकरणावर पुढील तारीख दिली.

# १०० दिवसांच्या कृती कार्यक्रमाची माहिती संकेतस्थळांवर उपलब्ध करा

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आदेश

**◆ मुंबई, ३ एप्रिल**

राज्यात शंभर दिवसांसाठीचा कृती आराखडा ही संकल्पना व्यापक प्रमाणात यशस्वी ठरली असून, या अंतर्गत विविध विभागांमार्फत आतापर्यंत ४११ कामांसंदर्भातील कार्यवाही पूर्ण झाली आहे. तर कार्यवाही सुरू असलेली ३७२ कामे लवकरच पूर्ण होणार आहेत. शंभर दिवस कार्यक्रमांतर्गत ८५ टक्के कामे पूर्ण करण्याची कौतुकास्पद कामगिरी विविध विभागांनी केली आहे. सर्व विभागांनी येत्या १ मेपर्यंत सर्व कामे पूर्ण करावीत तसेच प्रत्येक विभागाने शंभर दिवसांच्या कार्यक्रमाची माहिती आपल्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावी, असा निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला.

सह्याद्री अतिथिगृह येथे शंभर दिवस कृती कार्यक्रमासंदर्भात आढावा बैठक मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्य सचिव सुजाता सौनिक, विभागांचे मंत्री संबंधित अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, शंभर दिवसांसाठीचा कृती आराखडा कार्यक्रम विभागांनी गांभीर्याने यशस्वी केला आहे. अनेक विभागांनी यामध्ये उत्तम काम केले आहे. नागरिकांना या माध्यमातून उपयुक्त आणि तत्पर सेवा-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या पृष्ठभूमीवर शंभर दिवसांसाठी कार्यक्रमाचा कालावधी १५ दिवस वाढविण्यात आला आहे. येत्या १ मे रोजी सर्व विभागांनी आपल्या संकेतस्थळावर विभागांनी संकल्पित केलेली कामे व पूर्ण झालेली कामे याची माहिती उपलब्ध करुन द्यावी. त्यासोबतच काही कार्यवाही अपूर्ण राहिली असतील, तर त्याची कारणे संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही फडणवीस यांनी यावेळी दिल्या.

विभागांनी लोकोपयोगी कामे गुणवत्तेसह वेगाने तसेच कालमर्यादित पूर्ण करावीत. लोकप्रतिनिधींच्या पत्रांवर तत्परतेने कार्यवाही करण्यासाठी विभागांनी आपल्या स्तरावर यंत्रणा कार्यान्वित करावी. उद्दिष्टांच्या पूर्ततेच्या यशस्वी अमलबजावणीसाठी तांत्रिक, प्रशासकीय आणि इतर अनुषंगिक बाबींची तातडीने पूर्तता करावी. विभागांनी उपलब्ध निधीचा सुयोग्य वापर करण्यास प्राधान्य द्यावे, असा निर्देश फडणवीस यांनी यावेळी दिले. (वृत्तसंस्था)



# हैदराबादचा सलग तिसरा पराभव

### ● कोलकाताचा ८० धावांनी विजय

**कोलकाता, दि. ३ एप्रिल-**

आयपीएल २०२५ मध्ये सनरायझर्स हैदराबादला सलग तिसरा पराभव पत्करावा लागला. गुरुवारी झालेल्या सामन्यात त्यांना गतविजेत्या कोलकाता नाईट रायडर्सने ८० धावांनी हरविले.

ईडन गार्डन्स स्टेडियमवर २०१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना हैदराबादचा संघ १६.३ षटकांत १२० धावांवरच संपुष्टात आला. वरुण चक्रवर्ती आणि वैभव अरोरा यांनी प्रत्येकी ३ बळी घेतले. हैदराबादकडून हेनरिक क्लासेनने ३३ आणि कामिंदू मेंडिसने २७ धावा केल्या.

नाणेफेक गमावल्यानंतर फलंदाजी करणाऱ्या कोलकाताने २० षटकांत ६ गडी गमावून २०० धावा केल्या. हेनरिक क्लासेन ३३, कामिंदू मेंडिस २७, नितीश रेड्डी १९, ट्रॅव्हिस हेड ४, इशान किशन २ आणि अभिषेक शर्मा २ धावा काढून बाद झाले. अरोराने ३, नारायण, राणा, रसेल यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.




# जनसुरक्षा कायद्याविरोधात पत्रकार संघटनांची तीव्र निदर्शने

**तभा वृत्तसेव । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.३ एप्रिल**

राज्य सरकारच्या नव्या प्रस्तावित अभिव्यक्ती स्वातंत्र्य कायद्याविरोधात राज्यातील पत्रकार संघटनांनी तीव्र विरोध दर्शवत मुंबई मराठी पत्रकार संघ येथे पत्रकार अभिव्यक्ती संरक्षण मंचाच्या माध्यमातून निदर्शने केली. हा कायदा माध्यमांच्या स्वातंत्र्यावर गदा आणणारा असल्याचा आरोप यावेळी सर्व पत्रकारांनी केला असून, त्वरित तो मागे घेण्याची मागणी केली आहे. अन्यथा यापुढील आंदोलन तीव्र करू असा इशारा दिला.

आझाद मैदान जवळ असलेल्या पत्रकार संघाच्या आवारातून रॅली काढत पत्रकारांनी निषेध व्यक्त करत आपली भूमिका मांडली. मुंबई मराठी पत्रकार संघ, मराठी पत्रकार परिषद, मुंबई प्रेस क्लब , मंत्रालय आणि विधीमंडळ वार्ताहर संघ, टीव्ही जर्नालिस्ट असोसिएशन, पुणे श्रमिक पत्रकार संघ, बृहन्मुंबई युनियन ऑफ जर्नालिस्ट, बृहन्मुंबई महानगरपालिका वार्ताहर संघ , मुंबई क्राईम रिपोर्टर असोसिएशन, मुंबई हिंदी पत्रकार संघ याचे अध्यक्ष पदाधिकारी पत्रकार उपस्थित होते.''पत्रकारांच्या स्वातंत्र्याची मुस्कटदाबी आम्हाला मान्य नाही!'' असे सांगत मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण म्हणाले, सरकारने अशी मनमानी करू नये. तर एस एम देशमुख म्हणाले, पत्रकार संरक्षण कायदा व्हावा म्हणून जशी आम्ही आंदोलन केली तशी पुन्हा होऊ नये यासाठी आम्हाला भाग पाडू नका, तर जेष्ठ पत्रकार महेश म्हात्रे म्हणाले, सरकार विरोधास पडलेली ही आंदोलनाची ठिणगी भडका होण्याअगोदर सरकारने गांभीर्याने विचार करावा, जेष्ठ पत्रकार किरण नाईक म्हणाले, आता आम्ही मागे हटणार नाही, तर जेष्ठ पत्रकार दिलीप सपाटे म्हणाले, हे विधेयक पत्रकार विरोधी असल्याने तीव्र विरोध करावा लागेल.

# नागरी सहकारी बँकिंगचे सशक्तीकरण करणारे धोरण

### सहकार भारतीकडून निर्णयाचे स्वागत!

**नागपूर, ३ एप्रिल**

भारतीय रिझर्व्ह बँकेने प्राधान्य क्षेत्राला कर्जपुरवठा करण्याच्या धोरणात केलेल्या प्रगतिशील बदलांचे सहकार भारतीने स्वागत केले आहे. रिझर्व्ह बँकेचे हे धोरण नागरी सहकारी बँकांना मोठा दिलासा देणारे आहे. या धोरणान्वये प्राधान्य क्षेत्राला कर्जपुरवठा (प्रायॉरिटी सेक्टर लेंडिंग अर्थात पीएसएल) करण्याची मर्यादा ७५ टक्क्यांवरून ६0 टक्के करण्यात आली आहे. या निर्णयामुळे नागरी सहकारी बँका अधिक सक्षम होणार असून व्यापक आर्थिक सहभागीतासुद्धा वाढणार आहे, असे मत सहकार भारतीने व्यक्त केले आहे.

पीएसएल मर्यादेत घट करून रिझर्व्ह बँकेने नागरी सहकारी बँकांना दैनंदिन कामकाजात येणाऱ्या अडचणी लक्षात घेतल्या असून या बँकांना कर्जवितरणात अधिक लवचिक कारभाराचे स्वातंत्र्य दिले आहे. या निर्णयामुळे नागरी सहकारी बँकांना प्राधान्य क्षेत्रांना कर्जपुरवठा करण्याबरोबरच स्थायी प्रगतीवरही लक्ष केंद्रित करता येणार आहे. त्याचप्रमाणे विविध क्षेत्रनिहाय अंतर्गत अर्हता निकषांमध्येही सुधारणा करण्यात आल्याने प्राधान्य क्षेत्रांतील कर्जवितरणाचे उद्दिष्ट गाठणेही नागरी सहकारी बँकांना सोपे होणार आहे. आपल्या निधीचा अधिक नेमका व प्रभावी उपयोग करणे त्यांना शक्य होणार आहे. प्राधान्य क्षेत्रातील कर्जवितरण धोरणांतील सुधारणांमध्ये गृहकर्ज धोरणातील सुधारणा महत्वपूर्ण ठरणार आहे. यासाठी आणलेल्या नवीन मार्गदर्शक तत्वामुळे नागरी सहकारी बँकांना गृहकर्ज देण्यावरील निर्बंध कमी होणार आहेत. यामुळे परवडणाऱ्या घरांचे प्रकल्प, वैयक्तिक गृहकर्ज यात नागरी सहकारी बँकांना आता अधिक पुढाकार घेता येणार आहे.

# महाराष्ट्र आणि केंद्राच्या बोर्ड ऑफ एप्रेंटीसशिप ट्रेनिंग यांच्यात सामंजस्य करार

**मुंबई, दि. ३ एप्रिल**

उच्च शिक्षण विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी रोजगाराभिमुख शिक्षण आणि प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध होण्यासाठी महाराष्ट्र राज्य आणि बोर्ड ऑफ एप्रेंटीसशिप ट्रेनिंग (पश्चिम विभाग), शिक्षा मंत्रालय, केंद्र सरकार आणि उच्च शिक्षण संचालनालय यांच्यात गुरुवारी सामंजस्य करार करण्यात आला आहे. यामुळे राज्यातील विद्यार्थ्यांसाठी कौशल्यवृद्धी, प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव आणि रोजगारक्षमतेच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरेल.असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले.

ना .पाटील यांच्या शासकीय निवासस्थान सिंहगड, येथे करार करण्यात आला. यावेळी उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, बोर्ड ऑफ एप्रेंटीसशिप ट्रेनिंगचे संचालक पी. एन. जुमले यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या.यावेळी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ संचालक डॉ प्रमोद नाईक, उच्च शिक्षण संचालक डॉ.शैलेंद्र देवळाणकर, महाराष्ट्र राज्यव बोर्ड ऑफ एप्रेंटीसशिप ट्रेनिंग पश्चिम विभागाचे संचालक पी.एन. जुमले,उपसंचालक एन.एन.वडोदे उपस्थित होते.

नॅशनल एप्रेंटीसशिप ट्रेनिंग स्कीम () अंतर्गत कोर्सेस समाविष्ट करण्यात आले असून, विद्यार्थ्यांना



एप्रेंटीसशिपसाठी अधिक संधी आणि विद्यावेतन मिळणार आहे. प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना दर महिन्याला किमान ८ हजार रुपये विद्यावेतन दिले जाणार असून, त्यातील ५0टक्के रक्कम केंद्र सरकारकडून थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाणार आहे.

संचालक जुमले म्हणाले की, पूर्वी केवळ अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठीच एप्रेंटीसशिप उपलब्ध होती. मात्र, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत सर्व पदवीधर आणि डिप्लोमा धारक विद्यार्थ्यांनाही एप्रेंटीसशिप संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. १0 विभागीय कार्यालयांच्या माध्यमातून विविध महाविद्यालयांसाठी मेळावे आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी दिली.

## अग्रलेख...

# सब का साथ, सब का विकास!

राजकारण आणि स्वार्थी कारभाराच्या पडद्याआडून वर्षानुवर्षे सुखैनैव सुरू असलेल्या लांगूलचालनाच्या प्रस्थापित राजकारणाला धक्का बसू लागला आणि अशा राजकारणाचे भविष्य संकटात आले की भयाने ग्रासलेल्या मनातील मळमळ कशी बाहेर पडते, याचे काही दाखले बुधवारी देशाने अनुभवले. धर्माच्या नावाखाली समुदायाच्या हिताची पत्रास न बाळगता सुरू असलेल्या मनमानीला चाप बसण्याच्या भयाने काही मूठभरांच्या मनात उमटणारी अस्वस्थतादेखील या निमित्ताने देशाला अनुभवता आली. वक्फ बोर्डाचे व्यवस्थापन आणि वक्फच्या व्यवस्थापनामागील धर्माधारित व्यवस्था यातील भेदावर या निमित्ताने जे काही विचारमंथन संसदेत झाले, त्यामुळे देशात व्यापक जनजागृती तर झालीच; पण वक्फचा बुरखा पांघरून व्यवस्थेलाच नख लावण्याच्या प्रवृत्तींचे असंख्य कारनामे संसदेच्या पटलावर नोंदविले गेले. मुस्लिम वक्फ (रद्द) विधेयकांवरील चर्चेच्या निमित्ताने काँग्रेसधार्जिण्या विचारसरणीचे पितळ उघडे पडले आणि समाजहिताच्या उद्देशाने धार्मिक भावनांच्या आधारावर सुरू असलेल्या एका सद्भावनेची कुचेष्टा थांबवून मुस्लिम समाजाच्या हिताच्या नव्या पर्वाची पायाभरणी लोकसभेत झाली. याआधी तीन तलाकसारख्या कुप्रथेला पायबंद घालण्यासाठी मोदी सरकारने घेतलेल्या धाडसी निर्णयातून या समाजाच्या परिवर्तनाचे पहिले पाऊल पडले होते. आता वक्फ मालमत्तांवरील स्वार्थी मक्तेदारीची पकड दूर करून या मालमत्तांचा वापर केवळ मुस्लिम समुदायाच्या हित व प्रगतीसाठीच व्हावा, याकरिता मोदी सरकारने पुढचे पाऊल टाकले आहे. हे विधेयक बहुमताने मंजूर करून घेण्याकरिता संसदेच्या सभागृहातील संख्याबळाचे कुशल व्यवस्थापन करीत प्रगतीच्या दिशेने सुरू झालेल्या प्रवाहात मुस्लिम समाजासही सामावून घेण्याचा ऐतिहासिक प्रयोग यशस्वी करून मोदी सरकारने सुरू केलेल्या या परिवर्तनशील पर्वाचे स्वागत करावयास हवे. समाजातील गरीब वर्गास शिक्षण, आरोग्य सेवा, निवारा आणि उपजीविकेचे अन्य आवश्यक आधार सहजपणे प्राप्त करून देता यावेत, यासाठी वक्फ नावाची धर्माधारित व्यवस्था मुस्लिम समाजात इतिहासकाळापासून अंमलात आहे. मात्र, मनमानी कारभार, ढिसाळ व स्वार्थी व्यवस्थापन, भ्रष्टाचार आणि अकार्यक्षमता, समाजहिताच्या जाणिवेचा अभाव आणि सामाजिक प्रगतीबाबतची उदासीनता अशा अनेक कारणांच्या विळख्याने वक्फ व्यवस्थेस वर्षानुवर्षे ग्रासले होते. समाजाच्या हितासाठी विनियोग करण्याच्या हेतूने दान म्हणून प्राप्त झालेल्या लाखो-कोटी किमतीच्या मालमत्तेची मनमानी विल्हेवाट लावण्याच्या प्रवृत्तींना राजकारणाची साथ मिळाली की, समाजहिताच्या भावनेचे कसे वाटोळे होते, ते वक्फ व्यवस्थापनातील गैरप्रकारांच्या दाखल्यांवरून स्पष्ट झाले आहे. मुस्लिम समुदायातील असंख्य कुटुंबे आजही जगण्याच्या पुरेशा सुविधांपासून वंचित असताना व वक्फला दानरूपात प्राप्त झालेल्या संपत्तीच्या निर्विवाद लाभाचा हक्क असतानाही, अशी असंख्य कुटुंबे या लाभापासून वंचित राहिल्याने, वक्फसंबंधीच्या कायद्यात दुरुस्ती करून वक्फचे व्यवस्थापन अधिक पारदर्शक, प्रामाणिक आणि प्रभावी करण्याची गरज होती. मोदी सरकारने ती ओळखली आणि वक्फ कायद्यातील त्रुटी दूर करून प्रभावी अंमलबजावणीस उपयुक्त ठरणाऱ्या दुरुस्त्या करणारा कायदा संसदेत सादर केला. बहुप्रतीक्षित अशा या कायद्याची खरी गरज असतानाही, विरोधकांनी केलेल्या विरोधामागे केवळ राजकीय हेतू असल्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, रविशंकर प्रसाद आणि भाजपाप्रणीत रालोआच्या खासदारांनी सप्रमाण दाखवून दिल्याने वक्फच्या गैरवापरातून आपले उखळ पांढरे करणाऱ्या प्रवृत्ती उघड्या पडल्या आहेत. पारदर्शकतेचा अभाव ही वक्फच्या व्यवस्थापनातील सर्वात मोठी त्रुटी आहे. त्यातूनच भ्रष्टाचार बोकाळला आणि संपत्तीचा दुरुपयोग सुरू झाला. नव्या विधेयकामुळे वक्फच्या संपत्तीच्या व्यवस्थापनास शिस्त लागून संपत्तीचे व संपत्तीच्या विनियोगाची व्यवस्थित नोंद केली जाईल. ज्या हेतूने वक्फ मंडळांकडे ही संपत्ती दान केली गेली, त्याच हेतूसाठी विनियोग व्हावा व दुरुपयोग टळावा हा मुख्य हेतू नव्या विधेयकामुळे साध्य होईल, हा सरकारचा विश्वास हीच अमृतकाळातील एक आगळी घटना ठरणार आहे. वक्फच्या जमिनींवर धनदांडग्यांनी केलेला अनधिकृत कब्जा यापुढे दिसणार नाही, तर अशा जमिनी मोफत आरोग्य सुविधा पुरविण्याचा दवाखाने व इस्पितळांच्या उभारणीकरिता वापरता येतील, वक्फच्या ताब्यात असलेल्या पैशातून गरीब कुटुंबांतील मुलांसाठी शिक्षणाच्या सुविधा निर्माण केल्या जातील, रोजगाराभिमुख योजनांद्वारे युवकांच्या क्षमता वाढविणारे उपक्रम राबविले जातील, बेघरांच्या डोक्यावर छप्पर मिळेल, निराधारांना आश्वस्त आधार प्राप्त होईल आणि वक्फच्या ताब्यात असलेल्या प्रत्येक पैशाचा उपयोग केवळ समुदायातील गरजूंच्या गरजा पूर्ण करण्याकरिताच केला जाईल, अशी पारदर्शक व्यवस्था नव्या कायद्यातून प्रस्थापित झाली, तर गरिबी निर्मूलनाच्या मोहिमांना बळ मिळेल, यात शंका नाही. देशभरात वक्फच्या ताब्यात असलेल्या जवळपास ५८ हजार ८९८ मालमत्तांवर बेकायदा कब्जा केला गेल्याची बाब उघडकीस आली आहे. बेकायदेशीरपणे बळकावलेल्या अशा जमिनी पुन्हा ताब्यात घेऊन त्यावर समाजोपयोगी उपक्रम राबविण्याकरिता व वक्फच्या मालमत्तांच्या रक्षणाकरिता जिल्हाधिकाऱ्यांना विशेष अधिकार प्रदान करण्यात येणार आहेत. या अधिकारांचा निःपक्ष वापर झाला, तर वक्फ ही मुस्लिम समाजाच्या उत्कर्षाची नवी नांदी ठरणार आहे. बुधवारी लोकसभेत या विधेयकावरील चर्चेत सहभागी झालेले केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी वक्फच्या इतिहासाची पाने संवेदनशीलतेने उघडली आणि मुस्लिम समुदायातील सामाजिक जाणिवांचा एक हळवा कंगोरा देशास पाहावयास मिळाला. वक्फचा इतिहास आणि वर्तमान यातील विसंगतीवर नेमके बोट ठेवून शाह यांनी मांडलेल्या वास्तवातून जाणिवा जाग्या झालेल्या कोणाही समंजस व्यक्तीला या संकल्पनेच्या वर्तमानाचे वास्तव पाहून लाज वाटावी अशीच परिस्थिती आहे. वक्फच्या गैरवापराला काँग्रेसी संस्कृतीचा मोठा सहभाग असल्याची जाणीव या चर्चेचे साक्षीदार असलेल्यांना निश्चितच झाली असेल. एकगठ्ठा मतपेढ्या निर्माण करण्यासाठी धार्मिक भावनांशी असे खेळ करणाऱ्यांचे खरे चेहरे उघड झाल्यामुळे राजकारणाची अप्रिय बाजूदेखील समोर आली आहे.

धार्मिक संस्थांच्या व्यवस्थापनात बिगर-मुस्लिम व्यक्तींची नियुक्ती करण्याची कोणतीही तरतूद नाही आणि आम्हाला अशी तरतूद करायचीही नाही, अशी निःसंदिग्ध ग्वाही देऊन अमित शाह यांनी विरोधकांच्या बिनबुडाच्या असलेल्या आरोपांतील हवा अगोदरच काढून टाकली आहे. हे विधेयक मुस्लिमांच्या धार्मिक कार्यात आणि त्यांनी दान केलेल्या मालमत्तेत हस्तक्षेप करण्यासाठी आणले जात असल्याचा अपप्रचार करून अल्पसंख्यक समुदायाला धमकावून मतपेढी उभारण्याच्या राजकारणास या विधेयकाने वेसण घातली आहे. वक्फ बोर्ड किंवा त्याच्या परिसरात नियुक्त केलेले बिगर-मुस्लिम सदस्य केवळ वक्फचे व्यवस्थापन आणि संपत्तीचा विनियोगावर देखरेख ठेवतील, या त्यांच्या स्पष्टीकरणामुळे संशय पेरण्याच्या प्रयत्नांची बिळे बुजविली गेली आहेत. वक्फ ही धार्मिक बाब आहे, परंतु वक्फ बोर्ड किंवा वक्फ परिसर या धार्मिक बाबी नाहीत. त्यामुळे वक्फ मंडळाचा कारभार कायद्यानुसार चालावा, याची खात्री करण्याचे काम या मंडळाचे असेल. संसदेने संमत केलेल्या या कायद्याचे पालन प्रत्येक संबंधितास करावेच लागेल, हेदेखील शाह यांनी ठणकावून सांगितले. त्यामुळेच मतांच्या राजकारणासाठी वक्फच्या वापर करणारे असोत किंवा वक्फच्या मालमत्ता मनमानीपणे विकून खाणारे असोत, त्यांची हकालपट्टी आता निश्चित झाली आहे. या कायद्यास विरोध करणाऱ्यांपैकी काहींना भविष्याच्या या भयाने ग्रासले असण्याची शक्यता असावी. कागदावरचा कोणताही कायदा अंमलबजावणीच्या रूपाने कृतीत उतरल्याखेरीज त्याचे गांभीर्य स्पष्ट होत नाही. वक्फ बोर्डाच्या कारभारास वेसण घालण्याच्या या कायद्यावर संमतीची मोहोर स्पष्टपणे उमटल्यानंतर आता कायद्याने दाखविलेल्या दिशेने कृती सुरू झाली की, संभ्रम पेरणाऱ्या आणि संभ्रमाच्या प्रभावामुळे गैरसमजात वावरणाऱ्या सर्वांना सरळमार्गी व्हावेच लागेल. अमृतकाळातच हा सरळ मार्ग सोपा करण्याच्या या प्रयत्नाचे स्वागत व्हायलाच हवे!

## जीवन जिज्ञासा

# महाभारत ते भारत (१६)

**प्राचार्य प्र. श्री. डोरले**

संपूर्ण जगात विविध देशांत सृष्टीचे, विश्वब्रह्मांडाचे स्वरूप उत्पत्ती रचना, प्रकार, विविध प्रकारचे स्तर, सृष्टीचे वय, तिचा विनाश या सर्व महत्त्वाच्या विषयांबाबत प्रचंड संशोधने चालू आहेत. त्यामुळे दर क्षणाला ज्ञानाचा विस्फोट होतो आहे. काही वर्षांपूर्वी ताजे वाटणारे ज्ञान आज शिळे, टाकाऊ स्वरूपाचे वाटू लागले आहे. आजच्या परिभाषेत 'बॅक-डेटेड' हे होणे स्वाभाविक आहे. याचा अर्थ आधी संपादन केलेले ज्ञान व्यर्थ गेले, असे समजण्याचे कारण नाही. मागील प्राप्त झालेले ज्ञान हे पुढील ज्ञान प्राप्तीचे साधन ठरले आहे. त्या ज्ञानाची, साधनेची किंमत आहेच. कोणत्याही शास्त्रीय ज्ञानाचा प्रवास असाच होत आला आहे. भारतीय ज्ञानपरंपरेत म्हणूनच ज्ञानाला महासागराची उपमा दिली आहे किंवा अनंत आकाशाचा जसा शोध लागत नाही, विविध प्रकारचे शक्तिशाली अग्निबाणांच्या साह्याने पाठविलेल्या अवकाश यानांना (स्पेस क्राफ्ट) सुदूर अंतरिक्षात पाठवूनही अवकाशयात्रीसमोर पसरलेले अफाट क्षितिज कायमच राहते - म्हणजे विश्व हे अनंतच (इनफिनिट) आहे, याची जाणीव होते. ज्ञानाच्या या मर्यादा वेदकाळापासून भारतीयांनी अगदी स्पष्टपणे ओळखल्या होत्या. भारतीय संस्कृतीच्या प्रदीर्घ वाटचालीत जे 'ज्ञानसूर्य' ज्ञानाचे दीपस्तंभ म्हणून ओळखले जातात, अशा अनेकांनी ज्ञानाची महती मुक्त कंठाने सांगितली आहे. गोष्ट वा प्रसंग आद्य शंकराचार्यांच्या जीवनातला आहे. शंकराचार्यांचा भारताचा हा दुसरा प्रवास चालू होता. त्यांच्या जीवनातील या टप्प्याला त्यांची 'दिग्विजयी यात्रा' असे त्यांच्या चरित्रकारांनी म्हटले आहे. कारण कुमारील भट्टाच्या सूचनेप्रमाणे अवैदिक आणि जडस्वरूपी तत्त्वज्ञानाचा प्रसार-प्रचार करणारे जे विविध संप्रदाय आहेत. ज्यांच्यामुळे सनातन धर्माचे अधिष्ठान म्हणजे अस्तित्व डळमळीत होऊन राहिले, वैदिक संस्कृतीचा विनाश होऊ घातला आहे, अशा बौद्ध, जैन, मीमांसक, जड कणादवादी, तांत्रिक, अवघडपंथी अशा सर्व सांप्रदायांचार्यांशी वाद करून त्यांना वैदिक तत्त्वज्ञानाचे महत्त्व पटवून ते हिमालयाकडे आपल्या प्रमुख शिष्यांसह प्रवास करीत असताना हृषीकेश येथे त्यांचा मुक्काम होता. या संपूर्ण प्रवासात मेधावी असलेले त्यांचे शिष्य सुरेश्वराचार्य, पद्मपादाचार्यादि शिष्यांनी त्या वादचर्चा स्वतः उपस्थित राहून ऐकल्याच होत्या. त्यामुळे त्यांना आपल्या गुरुठायी असलेल्या ज्ञानाचे दर्शन झाले होते. त्याने ते भारावून गेले होते. त्याच भावनेने त्यांनी गंगा किनारी स्नान, आन्हिक होऊन वाळत घातलेल्या आपल्या वस्त्राची वाट पाहतानाच्या वेळेत सहजपणे त्यांच्या या अगाध ज्ञानसामर्थ्याबद्दल त्यांच्याशी विचारणा केली. त्यावेळी शंकराचार्यांनी त्यांचा दीक्षा दण्ड घेतला. तो गंगेच्या पाण्यात बुडविला आणि काढला. वर धरला आणि शिष्यांना म्हणाले, पहा.! त्या भिजलेल्या दण्डाचे पाणी ओसरून गेले होते आणि टोकावर शेवटचा 'थेंब' लटकलेला, पडण्याच्या बेतात असलेला त्यांनी पाहिला. शंकराचार्य म्हणाले- 'समोर गंगोत्रीपासून समुद्राला मिळणाऱ्या व हजारो मैलांचा प्रवास करणाऱ्या गंगामातेच्या प्रवाहात असलेल्या अथांगपणाच्या तुलनेत एका बिंदूसारखे माझे ज्ञान आहे.' शिष्य काय समजायचे ते समजले. आजच्या परिस्थितीच्या संदर्भात याचे चिंतन होणे जरूर आहे. त्यासाठी हा प्रसंग सविस्तरपणे वर्णिला आहे.

रामायण, महाभारत या महाकाव्यांमध्ये व्यक्तिजीवनापासून तो सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि राष्ट्रजीवनापर्यंत जो एक प्रचंड कर्मशक्तीचा ओघ वाहताना आपण पाहतो त्या तुलनेत आज भारताचे वारसदारांची अवस्था काय? कुटुंबातील ज्येष्ठ पुत्र; मग ते राम असो वा युधिष्ठिर, त्यासाठी आवश्यक असलेल्या पुत्रधर्मापासून तो पुढे राज्याचे प्रमुख झाल्यानंतरच्या राजधर्मापर्यंत जीवनात कर्तव्यबोध आहे. त्याग आहे. राजा म्हणजे प्रजेचा पिता असतो, याची जाण आहे. राजा म्हणजे राज्याचा उपभोगशून्य स्वामी, ही श्रेष्ठ, विरागी 'ट्रस्टिशिप' आहे. हिंदू जीवन पद्धतीला अनुसरून शाश्वत जीवनमूल्याधिष्ठित अनुशासित जीवनाची चौकट आहे. त्या चौकटीमुळे सर्व ज्ञान-विज्ञानाच्या क्षेत्रात आमची प्रगती होती. जीवन आणि राष्ट्रजीवनी समृद्ध, सुरक्षित आणि अकुतोभय करण्याची आकांक्षा होती. त्यासाठी वेळप्रसंगी स्वर्गात जाऊन दिव्यास्त्रे संपन्न करण्याचा दृढ संकल्प होता. तो साध्य करण्याच्या मार्गात उर्वशीसारख्या रंभा आणि मेनकेपेक्षाही अधिक मादक, शृंगारकुशल आणि मोहक असलेल्या अप्सरेच्या मोहजालाला झिडकारण्याचे नैतिक धैर्य होते. आजच्या परिभाषेत पाकिस्तानने 'डेप्यूट' केलेल्या स्त्री हेराच्या 'केमिस्ट्री'ला न जुमानता आपले अस्त्रसंपदेचे रहस्य तिला देऊन देशद्रोह करण्याचे पातक हातून होत नव्हते. त्याचाच परिणाम म्हणून भगवद्गीतेच्या आध्यात्मिक ज्ञानसंपदेपासून तो कुरुक्षेत्रावरील अणुविज्ञानाधिष्ठित अस्त्रसंपदेपर्यंत भारतीय प्रज्ञेचा अप्रतिहत संचार होता. त्यातून अनेक ज्ञान शाखा संपन्न झाल्या. तपश्चर्येतून प्राप्त झालेले हे ज्ञान त्यांनी ग्रंथरूपाने पुढील वारसदारांसाठी हे मागील मिटरीतील लिहून ठेवले. काळाच्या ओघात, नृशंस आक्रमणकारी धर्मांधांनी ते नष्ट केले. गो. प्र. भावे हे मागील पिढीतील व्यासंगी आणि सिद्धहस्त लेखक होते. पुरीच्या शंकराचार्यांचे ते अनुग्रहित होते. चांगले साधक होते. गायत्री मंत्राचे चोवीस लक्षांची अनेक पुरश्चरणे त्यांनी केली होती. प्राचीन मंत्र विज्ञान आणि त्यावर आधारित अस्त्र संपदा या विषयावर त्यांचा सखोल अभ्यास होता. माझ्या भाग्याने कारंजा येथील गुरुमंदिरात त्यांच्या सहवासाचा लाभ मला मिळाला. त्यांनी एक विलक्षण आठवण सांगितल्याचे स्मरते. ते म्हणाले- हिमालयाची यात्रा करताना मी पशुपतिनाथाच्या दर्शनाला गेलो असताना नेपाळच्या लायब्ररीला भेट दिली. तिथे मला जामदग्न्य धनुर्वेदाची पूर्ण संहिता आढळली. डाव्या पानावर विविध अस्त्रे, त्याचे श्लोक म्हणजे 'फॉर्म्युले', त्याचे विवरण, पुढील पानावर त्या अस्त्राची रेखाकृती, विविध पार्टस, त्याचे माप, संधान (टेक-ऑफ) होतेवेळी निर्माण होणारी उष्णता इत्यादीचा संपूर्ण तपशील होता. परत-परिक्रमा आटोपून मी ज्यावेळी आलो त्यावेळी कळले की, एका जर्मन परदेशी पर्यटकाने तो ग्रंथ काही लाख रुपयांच्या मोबदल्यात विकत घेतला. त्यावर त्यांनी अनेक प्रकारचे संशोधन केले.

महाभारतात गीता आहे. गीतेने म्हटले आहे, 'ज्ञानासारखे पवित्र दुसरे काहीही नाही.' त्या पवित्र ज्ञानग्रंथांचा 'व्यापार' करणारे भरताचे वारसदार आम्ही! ते ज्ञान ऋषिमुनी, महर्षी विश्वामित्र, ब्रह्मर्षी वशिष्ठ यांच्या आश्रमरूपी सरस्वती सदनातून सामान्य लोकांपर्यंत गेले म्हणून भिल्ल समाजातूनही विख्यात धनुर्धर आणि गुरुभक्तीचा आदर्श निर्माण करणारा 'एकलव्य' निर्माण झाला. त्याच भारतात शिक्षणाचा 'धंदा' करणारे अनेक 'शिक्षण महर्षी' आज उभे राहिले आहेत. भारताच्या पवित्र शैक्षणिक संस्कार, नीतिमूल्यांना बेधडक अंगठ' दाखवीत आहे. त्यांचा 'अंगठा' कापणारा 'द्रोणाचार्य' भारतात येईल?

९८६०२९६१३१

(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)

## दखल

# भरवसा नसलेले नेते

**मोरेश्वर बडगे**

एका चॅनेलवरील कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुलाखत नुकतीच झाली. या मुलाखतीचे विशेष म्हणजे शरद पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी ही मुलाखत घेतली. समारोपाच्या भागात जयंतरावांनी फडणवीसांना नेमके प्रश्न विचारले. त्याचे उत्तर दोन-दोन वाक्यात द्यायचे होते. 'शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्याबद्दल सांगा' असा एक प्रश्न होता. 'काही भरवसा नाही' या एका वाक्यात फडणवीसांनी उत्तर दिले. महाराष्ट्राच्या राजकारणात केंद्रस्थानी राहिलेल्या या दोन नेत्यांची इतकी नेमकी ओळख कोणाला करून देता आली नसेल. त्यावर उखडणार नाहीत तर ते उद्धव ठाकरे कसले? मीडियाने त्यांना छेडले असता उद्धव ठाकरे यांनी एका पांचट गाण्याची आठवण करून दिली... 'सोनू, तुझा माझ्यावर भरोसा नाय का?' हे ते गाणे होते. अलिकडे राजकारणाचा पोत बदलला आहे. विश्वासार्हता उरली नाही. शर्ट बदलावा तसे नेते भूमिका बदलतात. शरद पवारांनी वसंतदादांच्या पाठीत खंजीर खुपसला हे उदाहरण खूप जुने झाले. राजकीय खुपसा-खुपसीची ताजी उदाहरणेही आहेत. सोनिया गांधी इटालियन आहेत म्हणून राष्ट्रवादीची वेगळी चूल मांडणारे शरद पवार पुढे सोनियांच्या नेतृत्वातील सरकारमध्ये कृषिमंत्री म्हणून गेले. आयुष्यभर संभ्रमावस्थेत जगलेल्या या 'जाणत्या राजा'मध्ये उद्धव ठाकरेंना स्वतःचे मुख्यमंत्रिपद दिसले. २०१९ मध्ये युतीला टांग मारून उद्धव ठाकरे हे शरद पवारांच्या मांडीवर गेले. गद्दारीचा इतिहास नव्याने लिहिला गेला. पण त्या आधीही म्हणजे २०१४ च्या निवडणुकीत बरेच काही घडले होते. जागावाटपावरून युती तुटली. या निवडणुकीतले विशेष म्हणजे आघाडी आणि युतीतले चारही पक्ष स्वतंत्र लढले. निकालानंतर शिवसेनेने विरोधात बसायचं ठरवलं होतं. राष्ट्रवादीने बाहेरून पाठिंबा देण्याची गोष्ट सुरुवातीला केली होती. आवाजी मतदानाने सरकारवरील विश्वासदर्शक ठराव मंजूर झाला तेव्हा राष्ट्रवादीने सभात्याग केला होता. प्रत्यक्षात अल्पमतातले सरकार आले होते. त्यानंतर उद्धव ठाकरेंची शिवसेना गळाला लागायला तब्बल तीन महिने लागले होते. भाजपा आणि शिवसेना यांनी युतीने २०१९ ची निवडणूक लढवली होती. सरकार बनवण्याएवढे बहुमतही युतीला मिळाले. मात्र निकालानंतर उद्धव ठाकरे फिरले. शरद पवारांसोबत बसून त्यांनी महाविकास आघाडी बनवली आणि काँग्रेसच्या मदतीने सरकार बनवले. मुख्यमंत्रिपदाची हौस ठाकरेंनी भागवून घेतली. मात्र, हे सरकार अडीच वर्षांतच गडगडले. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात



४० आमदार शिवसेना फोडून बाहेर पडले. उद्धव ठाकरे आता एकनाथ शिंदे आणि त्यांच्यासोबत गेलेल्या आमदारांना गद्दार म्हणतात. पण मग त्यांनी युतीत निवडणूक लढवून शरद पवारांसोबत जे केले, ती गद्दारी नव्हती काय? भाजपालाच रोखायचे होते तर २०१४ मध्येही महाविकास आघाडी होऊ शकली असती. इकडून तिकडून जुगाड करून आघाडीचे सरकार आणता आले असते. भरवसा नाही, विश्वासार्हता नाही ती मंडळी काहीही करू शकते. नावाला महाआघाडीचे सरकार होते. मात्र, शरद पवारांना ती किती दिवस चालवायचे होते, हा प्रश्नच असावा. शरद पवार आणि पृथ्वीराज पाटील यांच्यात ३६ चा आकडा आहे. पृथ्वीराजबाबांना विधानसभा अध्यक्ष व्हायचे होते. पवारांनी ते होऊ दिले नाही. विधानसभा अध्यक्ष असता तर शिंदेंच्या बंडानंतरही एवढ्या सहजपणे सरकार पडले नसते. आता तर महायुतीच्या राज्यातही विरोधी नेता नाही. शरद पवारांनी खुटी मारली आहे.

उद्धव ठाकरे हे शरद पवारांच्या जाळ्यात अडकले तेव्हाच त्यांचा गेम झाला होता. पवारांसोबत गेले ते बुडाले, हा इतिहास आहे. उद्धव यांना कळत नसेल अशातला भाग नाही. कळते पण वळत नाही. आता तर ते एवढे अडकले आहेत की निसटूही शकत नाही. कारण निसटले तरी भवितव्य नाही. उद्धव यांच्याकडे आता उरले आहे तरी काय? पक्ष गेला, चिन्ह गेले. फक्त २० आमदार हाताशी आहेत. त्यांच्या जोरावर काहीही होऊ शकत नाही. उद्धव यांनी स्वतःहून हे संकट ओढवून घेतले आहे. शरद पवार आणि काँग्रेसच्या मदतीने आपण बाजी पलटवू अशा हवेत ते होते. त्या जोरावर ते देवेंद्र फडणवीस यांना नको नको ते बोलत गेले. 'फडतूस', 'कलंक' एवढेच नाही तर 'तू राहशील नाहीतर मी राहीन' अशी भाषाही त्यांनी केली. कोण राहिलं आणि कोण फिटलं ते जनता पाहते आहे. या टोमणेबाजीने त्यांनी स्वतःला हास्यास्पद करून ठेवले. आता सर्वस्व गमावूनही टोमणे मारण्याची त्यांची खोड जात नाही. पण परवा फडणवीस यांनी त्यांना जो टोमणा मारला तो त्यांच्या चांगलाच जिव्हारी लागला असेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी गुढीपाडव्याला संघ मुख्यालयात येऊन गेले. त्यावरून ठाकरे सेनेचा 'भोंगा' म्हणजे खासदार संजय राऊत यांनी फुकट अकलेचे तारे तोडले. राऊत यांचा दावा खोडताना फडणवीस जे बोलले त्याबद्दल त्यांना मानलं पाहिजे. अशीच घडामोड काँग्रेसमध्ये झाली असती तर काही वेगळ्या प्रतिक्रिया उमटल्या असत्या. पण फडणवीस जे बोलले त्याबद्दल महाराष्ट्रानेच नव्हे तर देशाने ऋणी राहिले पाहिजे. कारण अलिकडे असे बोल ऐकू येत नाहीत. 'वडील जिवंत असताना उत्तराधिकारी शोधणे ही आमची परंपरा नाही. ही मुगल संस्कृती आहे' असे फडणवीस म्हणाले. यातला 'मुघल संस्कृती' हा टोमणा उद्धव यांना आयुष्यभर टोचत राहील. सध्या औरंगजेबाची कबर चर्चेत आहे. सत्तेसाठी औरंगजेबाने शहाजहान या आपल्या वडिलांना तुरुंगात डांबले, भावांना संपवले. उद्धव आपल्या वडिलांशी कसे वागले ते महाराष्ट्र जाणतो. १९९९ च्या निवडणुकीनंतर वयोमानानुसार बाळासाहेब हळूहळू बाजूला झाले होते. मात्र, बाळासाहेबांचा वारसा घेण्यासाठी उद्धव यांना कमालीची घाई. कार्याध्यक्ष म्हणून त्यांनी अभिषेक करून घेतला. त्यासाठी राज ठाकरे यांना त्यांचे नाव सुचवावे लागले होते. 'ती माझी मोठी चूक होती' असे राज ठाकरेंनी पुढे एका जागी म्हटले आहे. राज ठाकरे, नारायण राणे हे बाळासाहेबांचे सोबती. मात्र उद्धव यांच्या वागण्यामुळे त्यांना वेगळा रस्ता पकडावा लागला. बाळासाहेबांच्या हयातीतच उद्धव शिवसेना चालवायला लागले होते. फडणवीस यांनी ज्या 'मुघल' संस्कृतीचा उल्लेख केला त्याचा रोख कोणाला उद्देशून होता, हे आता लक्षात येईल. फाजील महत्त्वाकांक्षेने उद्धव यांनी स्वतःचे काय हाल करून घेतले ते दिसते आहे. आज शरद पवार थकले, वय झालं. उद्धव यांना अजून वय आहे, पण विश्वासार्हता नाही. मग ते कुठल्या कामाचे? एका शिवसेनेच्या त्यांनी तीन शिवसेना केल्या. मराठी माणसांच्या मतांच्या तीन वाटण्या होत आहेत. मुंबई महापालिका जिंकणे तर सोडा; आता साधी ग्राम पंचायत घेतानाही उद्धव सेनेला घाम फुटेल. फडणवीसांशी पंगा घेऊन उद्धवांनी शेवटी काय मिळवले? आपले हिंदुत्व शेंडीजानव्याचे नाही असे उद्धव म्हणतात. मग वक्फ दुरुस्ती विधेयकावर त्यांचे कुठे हिंदुत्व आहे?

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वेध

# 'घिब्ली' वाळवंटातील गरम वाऱ्याची भुरळ

**प्रफुल्ल क. व्यास**

'दुनिया झुकती है झुकाने वाला चाहिये' असे म्हटले जाते. ते बरेचदा १०० टक्के खरे ठरते. मोबाईलने ज्यांना आपल्या मुठीत बंदिस्त केले, त्या नवीन पिढीसोबत वयस्कही मोबाईल वेडे झाले आहेत. त्या वेडेपणाचा फायदा घेत त्यांना पुन्हा पुन्हा गुंतवून ठेवण्यात व्यावसायिक यशस्वी ठरतात आणि आपल्याकडे त्याची क्रेझ ठरते! चांगले ते स्वीकारण्याची आपली परंपराच आहे. परंतु, वाईट ते दूर सारण्यात आपण थोडे दुबळे ठरतो. जेव्हा ते मानगुटीवर बसते, त्याला आपण बाहेर खेचण्याचा प्रयत्न करतो तोपर्यंत त्याने आपल्याला विळखा घातलेला असतो. चक्रव्यूहातून अभिमन्यू बाहेर पडू शकला. परंतु, या कृत्रिम बुद्धिमत्ता आपली मती मारण्यापर्यंत पोहोचल्याने त्यातून बाहेर निघण्यासाठी धडपड करावी लागणार आहे. 'एआय'ने सुविधा उपलब्ध करून दिल्या असल्या, तरी त्याचे दुरगामी परिणाम भोगण्याची तयारीही भविष्यात ठेवावीच लागणार आहे. शिक्षणाचे व्यवसायीकरण झाल्याने ते पावित्र्यच शिल्लक राहिले नाही. त्यामुळे आता स्वतःच्या मेंदूचा वापर जिथे एआयसाठी नेटवर्क नाही तेथेच करावा लागणार आहे. विद्यार्थ्यांच्या अभ्यासातील अनेक अडचणी शिक्षकाशिवाय एआय सोडवत असल्याने त्या समस्या सोडविण्यासाठीची माथापच्ची करण्याची सवय आता इतिहास जमा होणार आहे. इंटरनेट आपल्यासोबत ई-मेल, फेसबुक, व्हॉट्सॲप, ट्विटर, यू ट्युब, इन्स्टा घेऊन आले. त्यावरही थांबले नाही तर चॅट जीबीटी आले. जेमिनीने तर मनोरंजनच केले. आता गेल्या १५ दिवसांपासून स्वतःचीच प्रतिमा वेडीवाकडी पाहण्यासाठी आपण उत्सुक झालो आहोत. ओपन-एआयच्या चॅट जीपीटीने युजर्ससाठी 'घिब्ली' सेवा सुरू केली. आता त्याचा महापूर आला आहे. घिबली वगैरे म्हणून घिब्लीचे बारसे होऊ लागले. प्रत्येक जण घिब्ली स्टाईल स्वतःचे कार्टून तयार करून घेत आहे. ते एकप्रकारचे व्यंग्यचित्रच आहे. आजपर्यंत बड्या आसामींचे व्यंग्यचित्र काढले जात होते. त्यावर चर्चा होत होती. कधी कधी रागलोभही होत होते. आता घिब्लीने त्या कलेलाही सामान्य करून टाकले. कलाकार, राजकीय नेतेच नव्हे तर सामान्य नागरिकही घिब्लीच्या गळाला लागले आहेत. जगभरातील सर्वच सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर चॅट जीपीटीच्या घिब्ली जनरेटेड कलाकृतींचा पूर आला आहे. अनेक युजर्स याचा वापर करून त्यांच्या कुटुंबातील सदस्य, मित्रांचे घिब्ली स्टाईल छायाचित्र तयार करत आहेत. इतकेच नव्हे, तर बड्याबड्यांनादेखील या ट्रेंडची भुरळ पडली असून ते याचा वापर त्यांच्या जाहिरातीसाठी करीत आहेत. चॅट जीपीटीवरील या नवीन वैशिष्ट्यांमुळे युजर्स मोठ्या प्रमाणात घिब्ली शैलीतील एआय जनरेटेड छायाचित्र तयार करत करून घिब्ली शैलीतील छायाचित्रे ते सोशल मीडियावरही शेअर करत आहेत. डोनाल्ड ट्रम्प, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शाहरूख खानपर्यंत अनेकांची घिब्ली छायाचित्रे फेसबुकवर आहेत. बॉलिवूड चित्रपटांमधील फिर हेराफेरी, बाहुबली, भुलभुलय्या आणि शाहरूख खानच्या जगप्रसिद्ध 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे' यातील काही दृश्यांच्या छायाचित्रांचाही समावेश आहे. १९८५ मध्ये हयाओ मियाझाकी इसाओ ताकाहाता आणि तोशियो सुझुकी यांनी स्थापन केलेला 'स्टुडिओ घिब्ली' हा एक प्रसिद्ध जपानी ॲनिमेशन स्टुडिओ आहे. 'घिब्ली' या इटालियन भाषेतील शब्दाचा मराठी अर्थ 'सहारा वाळवंटातून वाहणारा गरम वारा' असा आहे. उन्हाळ्यात थंड वाऱ्याची गरज भासत असताना घिब्लीच्या निमित्ताने वाहू लागलेल्या या गरम वाऱ्यावर आपण सारे स्वार झालो आहोत. सामान्य मानसिकतेप्रमाणे कोणालाही कार्टुन म्हटले तर राग येत होता. आता स्वतःचे कार्टुन स्वतः तयार करून ते समाज माध्यमांवर टाकले जात आहे. मोबाईलच्या अति आहारी गेल्याचे दुष्परिणाम आपण बघतो आहोत. विरंगुळा म्हणून आज आपण घिब्लीकडे बघतो आहोत. परंतु, कोणत्याही प्रसंगातील (तिरडीवर असलेला मृतदेहाचे फोटो सोडून) व्हॉट्सॲप स्टेटस टाकण्याची चढाओढ लागली आहे. त्या स्टेट्सने घरगुती वादही सुरू झाले आहेत. आज आनंद देणारा हा ॲप भविष्यात एखाद्याची खिल्ली उडवण्यासाठी वापरण्याचाही धोका ओळखला पाहिजे. घिब्लीचे कार्टुन समाजमाध्यमांवर टाकल्या जाते. परंतु, त्याच्या बाजूला तुमचा ओरिजनल फोटो असल्याशिवाय ते कार्टुन कोणाचे हे ओळखले जाऊ शकत नाही. समाजमाध्यमांवर प्रत्येक दुसरी पोस्ट घिब्लीची दिसून येत आहे. आपण फुकट मिळण्यावर तुटून पडतो, अशी टीका समाजमाध्यमांवर सुरू आहे. घिब्लीत काय म्हणून मागे राहायचे... तुम्हीच सांगा आपण आता रिअल वर्ल्डमध्ये जगत आहोत की ॲनिमेटेडमध्ये... वास्तवात जगलेले केव्हाही चांगलेच ना! 'आम्ही जातो आमच्या गावा' या चित्रपटातील 'देहाची तिजोरी' या भावगीतातील 'आपुलीच प्रतिमा होते आपुलीच वैरी'प्रमाणे अति होऊ नये म्हणजे मिळवले.

९८८१९०३७६५

## वाचक पत्रे

### नवीन पिढीच्या निर्णयांवर नेहमीच प्रश्न का?

अपत्य नको या विषयावरील निर्मला गांधी यांचे वाचक पत्र वाचले. पत्रात उपस्थित केलेले मुद्दे चुकीचे आहेत, असे नाही. पण त्यामागे बघण्याचा दृष्टिकोन एकतर्फी आहे. या निर्णयावर मुळात आजची पिढी का येते आहे, हे जाणून घ्यायचा प्रयत्न अनुभवी पिढीने करायला हवा. पहिले तर घराचे अगदी गोकुळ करणे, अनेक अपत्ये असणे ही बाब अतिशय खर्चिक झाली आहे. या समस्येचे निवारण मोठ्या पातळीवर करण्याचा विचार व्हायला हवा. आजची पिढी यावर विचार करते आहे. त्यानुसार पाल्याला शिक्षण कसे द्यावे इथपासून सगळा विचार केला जातो. त्या विचारात समतोल येईपर्यंत अपत्य होऊ द्यावी का नको, यावर वेगवेगळे निर्णय समोर येणारच. महागाईमुळे समोर येणारी दुसरी बाब म्हणजे दाम्पत्यातील दोघांनी नोकरी करणे आणि संसारातील कामे दोघांनी करणे. ही बाब बहुतांश अनुभवी पिढीने मान्य केली असली, तरी ती अंमलात आणू बघताना कुठेतरी गल्लत होते आहे. अजूनही गोष्टींना स्त्रीवादी आणि पुरुषवादी भेदाने बघितले जातेच. नोकरी केल्याने स्त्री सशक्त होते वगैरे हा मुद्दा वेगळाच, पण मुळात आज जोडप्यातील दोघांनीही कमावते असणे आणि संसार सोबत चालवणे ही गरज झाली आहे. हे सगळं सांभाळताना मूळ गावापासून, घरापासून, कित्येकदा देशापासून त्यांना दूर जावे लागते. या सगळ्यात समतोल साधताना होऊ घातलेल्या अपत्याची फरफट होऊ नये म्हणून जर नवी पिढी काही निर्णय घेत असतील, तर त्यांना सर्रास चूक ठरवणे हे कितपत योग्य आहे? जे तरुण आज २८-३८ या वयोगटात आहेत, ते येणाऱ्या अफाट बदलांमुळे अनेक मानसिक समस्यांसोबत झुंज देत आहेत. याकडे देखील अनुभवी पिढीने लक्ष द्यावे.

**रोहन बेनोडेकर**/९८६०९३४५१७

### कार्यकर्ता घडविणारा नेता हवा

राजकारणात यशस्वी होण्यासाठी केवळ नेतृत्वगुण असणे पुरेसे नाही, तर खऱ्या अर्थाने जनतेच्या मनात स्थान मिळविणारा नेता कार्यकर्त्यांची फळी उभी करू शकतो. आजच्या राजकीय परिस्थितीत अशी नेतृत्व शैली दुर्मिळ होत चालली आहे. निवडणुकीच्या तोंडावर मोठ्या प्रमाणावर पक्षांतर किंवा स्वार्थासाठी नेतेगिरी करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. त्यामुळे पक्षनिष्ठ कार्यकर्त्यांचे महत्त्व पुन्हा अधोरेखित होत आहे. कार्यकर्ता घडविणारा नेता हा केवळ प्रचारापुरता कार्यकर्त्यांवर प्रेम करीत नाही, तर त्यांना संघटनात्मक शिक्षण देतो, राजकीय मूल्ये रुजवतो आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवतो. अशा नेत्याकडे असलेले महत्त्वाचे गुण म्हणजे संघटन कौशल्य. कार्यकर्त्यांचे विचार आणि ऊर्जेला योग्य दिशा देणे. दूरदृष्टी राजकारण केवळ सत्तेसाठी नव्हे, तर समाजसेवेचे साधन आहे हे पटवून देणे. केवळ आपल्या मतदारसंघापुरते मर्यादित न राहता, व्यापक स्तरावर प्रभाव टाकणे. नवे कार्यकर्ते तयार करताना त्यांना योग्य विचार, ध्येय आणि नीतिमत्ता शिकवणे. आजच्या तरुणांना राजकारणात आकर्षण वाटत असले, तरी त्यांना योग्य मार्गदर्शन मिळत नाही. परिणामी अनेक जण राजकारणाकडे फक्त व्यक्तिगत फायद्याच्या दृष्टिकोनातून पाहतात. त्यामुळे कार्यकर्ता घडविणारा नेता असणे अत्यावश्यक आहे. तोच पुढच्या पिढीला समाजसेवेच्या माध्यमातून खरे नेतृत्व कसे करायचे हे शिकवू शकतो. राजकीय वातावरण कितीही बदलले तरी जनतेच्या मनात टिकणारा नेता तोच असतो जो कार्यकर्त्यांना घडवतो. राजकीय पक्षांनी निवडणुकीच्या तोंडावर मोठ्या फडतूस गर्दीवर अवलंबून राहण्याऐवजी, कार्यकर्ता घडविणाऱ्या नेत्यांना महत्त्व द्यायला हवे. कारण सशक्त नेतृत्व हीच राजकारणाची खरी ताकद असते.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

### आता न्याय कुठे मागायचा?

'समजुतीच्या वर्मावर बोट' हा अग्रलेख वाचला. आता सर्वसामान्य जनतेने न्यायदेवतेकडे कोणत्या नजरेने पाहायचे. जो विश्वास निर्माण केला होता तो आता धुळीस मिळाला आहे. दिल्ली उच्च न्यायालयातील वरिष्ठ न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या ल्युटेन्स बंगल्यात सापडलेल्या नोटा आगीच्या भक्ष्यस्थानी सापडल्या. या बेहिशेबी नोटांचा हिशेब कोण देणार? त्यानंतर या नोटा आमच्या नाहीत, कोणीतरी कुभांड रचले असा युक्तिवाद करीत बाजू सावरत आहेत. त्यांच्यावर कारवाई करायची सोडून केवळ बदली करण्यात आली. हे इतरांना काय न्याय देणार ? याआधीही विविध भानगडीत त्यांच्यावर आरोप करण्यात आले होते. त्यातून ते सहीसलामत बाहेर पडले. आता मात्र त्यांची केविलवाणी धडपड दिसून येत आहे. न्याय कुठे आहे? असाच सवाल सर्वसामान्य जनता करीत आहे. आता यापूर्वी त्यांनी दिलेले निकाल कोणत्या चौकटीत बसत आहेत. खरोखरच न्याय दिला की चालढकल केली, याचाही यानिमित्ताने अभ्यास करायला हवा. न्यायाधीश असे भ्रष्टाचारात अडकले तर सर्वसामान्य जनतेने न्याय कुठे मागायचा? शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये याचा प्रत्यय दिसून आला आहे.

**संतोष राऊत**/९९६०१०४३४५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## क्राईम वृत्त...

### कर्देहळ्ळीत तरुणाला पूर्ववैमनस्यातून मारहाण



**सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील कर्देहळ्ळी येथे पूर्ववैमनस्यातून तरुणाला मारहाण करण्यात आली. हा प्रकार २ एप्रिल रोजी सायंकाळी ६.३० वाजता गावातील जिल्हा परिषदशाळेजवळ घडला.सुरज राजेंद्र पोळ (वय ३२) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. हर्षल पवार, सदाशिव पवार व इतर दोघांसोबत सुरज याची यापूर्वी तक्रार झाली होती. या तक्रारीनंतर हर्षल व इतर लोक सुरजवर चिडून होते. दरम्यान दोन एप्रिल रोजी सायंकाळी ६.३० वाजता सुरज जिल्हा परिषद शाळेजवळ थांबला असता, त्याला हर्ष्जल व इतरांनी लोखंडी रॉडने मारल्याने डाव्या हाताला जखम झाली. तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केल्याने सर्वांगास मुकामार लागल्याने पुतण्या कृष्णानाथ पोळ याने उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### चारचाकी वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर :** येथील अश्विनी रुग्णालयासमोरील रस्त्यावर समोरून आलेल्या चारचाकी वाहनाने धडक दिल्याने रोहित रविंद्रनाथ शेवटे (वय २४, रा. जुना विजापूर नाका) हा तरुण जखमी झाला. हा अपघात गुरुवारी दुपारी १.३५ वाजता घडला.गुरुवारी दुपारी १.३० च्या सुमारास रोहित हा दुचाकी चालवित अश्विनी हॉस्पीटलसमोरील रस्त्यावरून शास्त्री नगरच्या दिशेने जात होता. तो चालवित असलेल्या दुचाकीला चार चाकी वाहनाची धडक बसली. यात त्याच्या डाव्या पायाला मुकामार लागल्याने दुपारी २.५५ वाजता स्वत: शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### दुचाकी घसरून सीएनएस हॉस्पीटलजवळ एकजण जखमी

**सोलापूर :** देगाव रोडवरून देशमुख पाटील वस्ती येथील घराकडे दुचाकीवर बसून जाताना सीएनएस हॉस्पीटल जवळ दुचाकी घसरल्याने अर्जुन अनिल जगताप (वय ३७) हा जखमी झाला.बुधवारी दुपारी ४.३० च्या सुमारास अर्जुन हा दुचाकी चालवित सीएनएस हॉस्पीटल जवळून देशमुख पाटील वस्ती येथील घराकडे जात होता. सीएनएस हॉस्पीटलजवळ असताना अचानक दुचाकी घसरल्याने पडून डोक्याला आणि डाव्या हाताला जखम झाली तसेच छातील मुकामार लागल्याने गुरुवारी दुपारी १२.१५ वाजता स्वत: शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### चिंचेच्या झाडावरून पडल्याने एकजण जखमी

**सोलापूर :** चिंचेच्या झाडावर चिंचा काढण्यासाठी चढला असता तोल जाऊन पडल्याने एकजण जखमी झाला. हा प्रकार गुरुवारी दुपारी ९.३० च्या सुमारास घडला.कैलास परलप्पा सावंत (वय ३५, रा. मल्लिकार्जुन नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. मोदी परिसरातील पंखाबावडी येथील चिंचेच्या झाडावर गुरुवारी दुपारी ३.३० वाजता कैलास चिंचा काढण्यासाठी चढला होता. चिंचा तोडताना अचानक त्याचा तोल गेल्याने तो झाडावरून खाली पडला. त्यात त्याच्या चेह-याला आणि डोक्याला जखम झाल्याने मित्र बिलाल बागवान याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### सारखा बोलतो का म्हणून मारहाण




**सोलापूर :** मंगळवेढ्यातील खुपसंगीत सारखा का बोलतो याकारणावरून चार जणांनी दगडाने तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. ही मारहाण बुधवारी झाली. ज्ञानेश्वर नामदेव पडवळे (वय ३५, रा. खुपसंगी ता. मंगळवेढा) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. बुधवारी ज्ञानेश्वर हा खुपसंगी गावातील एसटी स्टॅन्डजवळ थांबला होता. त्यावेळी तेथे आलेल्या प्रकाश बिरा सावंत, औंदुंबर दगडू सावंत व इतर दोन यांनी ज्ञानेश्वर यास सारखे का होऊन बोलतो असे म्हणून लाथाबुक्यांनी व दगडाने मारहाण केली. या मारहाणीत सर्वांगास मुकामार लागल्याने गुरुवारी दुपारी २ वाजता वडील नामदेव यांनी उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केले. या घटनेवी नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### चक्कर येऊन एकजण पडून जखमी

**सोलापूर :** बांधकाम करताना अचानक चक्कर येऊन पडल्याने पायाला मार लागून एकजण जखमी झाला. हा प्रकार बुधवारी सायंकाळी ५.३० वाजता घडला.नरसिंग नरसप्पा म्हेत्रे (वय ४८, रा. लष्कर सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. बुधवारी नरसिंग हा नवीन विडी घरकुल येथील मशिनच्या जवळ बांधकाम करत होता. सायंकाळी ५.३० च्या सुमारास नरसिंग यास अचानक चक्कर आल्याने तो खाली पडला. यात त्याच्या उजव्या पायाला मार लागल्याने रात्री ११.४० वाजता स्वत: उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## किमान वेतनासह पीएफ, ईएसआयसाठी
# घंटागाडी कामगारांचे काम बंद आंदोलन

### कामगारांनी एकत्र येऊन केली जोरदार निदर्शने

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल -**
सोलापूर शहरातील कचरा संकलनाचे काम करणाऱ्या घंटागाडी कामगारांनी आज किमान वेतनासह पीएफ, ईएसआय देण्याच्या मागणीसाठी काम बंद आंदोलन केले. एकत्र येऊन जोरदार निदर्शने केली. न्याय मिळाल्याशिवाय घंटागाड्या काढणार नाही तसेच इतरही घंटागाड्या शहरात फिरू देणार नसल्याचा इशारा संतप्त कामगारांनी दिला आहे.

घंटागाडी कामगारांनी काही दिवसापूर्वीच काही तास काम बंद आंदोलन केले होते. महापालिका अधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर या कामगारांनी त्यावेळी आंदोलन मागे घेतले होते. पुन्हा आज महापालिका झोन क्रमांक चार व आठ अंतर्गत असलेल्या घंटागाडी कामगारांनी काम बंद आंदोलन सुरू केले. एकत्र येऊन जोरदार निदर्शने केली. आपल्या संतप्त भावना व्यक्त केल्या. ''किमान वेतन मिळालेच पाहिजे'' यासह विविध घोषणांनी परिसर दणाणून सोडला. आज तीन झोनमधील घंटागाडी कामगारांनी काम बंदच ठेवले होते.

सोलापूर शहरात महापालिकेने घंटागाड्याद्वारे कचरा संकलन करण्याचा मक्ता नाशिकच्या वॉटर ग्रेस कंपनीला दिला आहे. या घंटागाडीवर चालक आणि मदतनीस असे कामगार कार्यरत आहेत. या कामगारांच्या माध्यमातून शहरातील कचरा संकलनाचे काम करण्यात येते. दरम्यान, संबंधित मक्तेदाराकडून या घंटागाडी कामगारांना किमान वेतनाप्रमाणे पगार दिला जात नाही. प्रत्येक महिन्याला कमी रक्कम दिली जाते. काही तक्रार अथवा नाराजी व्यक्त केल्यास कामावरून काढण्याची धमकी दिली जाते. भविष्य निर्वाह निधी (पीएफ) आणि ईएसआयची रक्कम कपात केली जाते मात्र ती संबंधित कार्यालयात जमा केली जात नाही. कमी वेतन दिल्याने कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे अडचणीचे ठरत आहे. त्यातच ईएसआयची सुविधा दिली नसल्याने आजार वगैरे उद्भवल्यास खाजगी दवाखान्यात खर्च करण्याचे ऐपत नाही. नाईलाजास्तव सिव्हिलमध्ये जावे लागते. घंटागाडी कर्मचाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक शोषण होत असल्याचा आरोप यावेळी संतप्त कामगारांनी केला आहे.



#### मित्रांनी वर्गणी काढून उपचारासाठी केली मदत

मुलगी व पत्नी आजारी असल्याने दवाखान्यात ॲडमिट केले होते मात्र उपचारासाठी पैसे नसल्याने मित्रांनी वर्गणी काढून पैशाची मदत केली. ईएसआयची सुविधा असती तर हे अडचण आली नसती. किमान वेतनाप्रमाणे पगार नसल्याने अनेक अडचणीला तोंड द्यावे लागत आहे. नियमाप्रमाणे किमान वेतन, इतर सर्व सुविधा द्याव्यात.

#### पगार कमी अन् शोषण जास्त मग काम कसे करायचे?

पीएफ नाही. ईएसआय नाही. किमान वेतनानुसार पगार नाही. तोही पगार कमी आणि शोषण जास्त अशा परिस्थितीत काम कसे करायचे असा प्रश्न या कामगारांनी उपस्थित केला आहे. बेकायदेशीरपणे कपात केलेला पगार परत द्यावा तसेच नियमाप्रमाणे किमान वेतनानुसार पगार द्यावा. ईएसआय, पीएफ जमा करावे अन्यथा कोणत्याही परिस्थितीत घंटागाड्या काढण्यात येणार नाहीत आणि इतरही घंटागाड्या शहरात फिरू देणार नसल्याचा इशारा कामगारांनी दिला आहे.

#### अन्यायाविरुद्ध उपोषण करण्याचा ईशारा

घंटागाडी कामगारांनी अन्यायाविरुद्ध पोलिस आयुक्तालयातही तक्रार दिली आहे. नाशिक येथील वॉटर ग्रेस कंपनी अंतर्गत शहरातील घंटागाडी कामगार काम करत आहेत. त्यांना किमान वेतन मिळत नाही. तेही वेळेमध्ये दिले जात नाही. पीएफ, ईएसआयपगारातून कपात होते मात्र जमा होत नाही. अन्याय केला जात आहे. आम्हाला न्याय द्यावा अन्यथा सोलापुरातील भारतरत्न डॉ. आंबेडकर चौक येथे उपोषण करण्यात येईल, असे तक्रार अर्जात म्हटले आहे.

#### मक्तेदारास २५ हजाराचा दंड ?

कचरा संकलनाचा मुक्ता मक्ता संबंधित मक्तेदारांना दिला आहे. नियमितपणे हे कचरा संकलनाचे काम करणे आवश्यक आहे. एक दिवस कचरा संकलन पूर्णपणे बंद राहिल्यास मक्तेदारास साधारणतः २५ हजार रुपये दंड केला जाऊ शकतो. यामुळे घंटागाडी कामगारांनी केलेल्या काम बंद आंदोलनामुळे एक दिवस संकलन झाले नाही. यामुळे आता किती दंड आकारण्यात येणार? हे पहावे लागतील

#### आर्थिक शोषण थांबवा

घंटागाडी कामगारांनी आपल्या न्याय मागण्यासाठी यापूर्वीही अनेक वेळा तक्रारी केल्या आहेत. त्यांना किमान वेतन प्रमाणे वेतन मिळत नाही. पीएफ, ईएसआयची रक्कम कपात करूनही जमा केली जात नाही. या कामगारांना न्याय मिळाला पाहिजे. महापालिका प्रशासनाने तत्काळ गांभीर्याने याची दखल घेऊन त्यांचे आर्थिक शोषण थांबवावे, असे कामगार नेते अशोक जानराव यांनी स्पष्ट केले.

**दोन दिवसांपूर्वीच नोटीस**

संबंधित मक्तेदाराला दोन दिवसांपूर्वीच नोटीस दिली आहे. कामगार जितके तास काम करतात तेवढेच वेतन त्यांना दिले जाते. या महिन्यात दीड-दोन हजार रुपये काही कर्मचाऱ्यांना अकाउंटंटच्या चुकीमुळे कमी गेले आहेत. ते टाकले आहेत असे मक्तेदाराचे म्हणणे आहे. कामगारांचेही म्हणणे ऐकून घेऊन कार्यवाही करण्यात येईल, असे पालिका अ.आयुक्त रवी पवार यांनी स्पष्ट केले.

## सराईत गुन्हेगार बालाजी पवार येरवडा कारागृहामध्ये स्थानबद्ध

**सोलापूर, दि. ३ एप्रिल -**
दोन वेळा तडीपार करूनही व जामिनावर असताना अनेक गुन्हे करणारा खेड भोसे (ता. पंढरपूर) येथील बालाजी हनमंत पवार यास करकंब पोलिसांनी कडक प्रतिबंधात्मक कारवाई करून एमपीडीए कायद्यातील तरतुदीनुसार स्थानबद्ध करून येरवडा जेलमध्ये रवानगी केली आहे. सराईत गुन्हेगार बालाजी हनुमंत पवार (रा. खेडभोसे, ता. पंढरपूर) यांच्यावर करकंब व इतर पोलिस ठाण्यांतर्गत वाळू चोरी, विनयभंग, जबरी चोरी, मारामारी असे विविध गुन्हे आहेत. त्यास दोनवेळा तडीपार करूनही तो वारंवार गुन्हे करीत होता. तसेच यापुढे रेकॉर्डवरील सर्व गुन्हेगारी टोळीवर हद्दपार व स्थानबध्द करून प्रभावी स्वरूपाची कारवाई करणार असल्याचे सोलापूर ग्रामीण जिल्हा पोलिसांकडून सांगण्यात आले.



## ४२ अंश तापमानामध्ये झाडे जगविण्याची धडपड

### श्री सिद्धेश्वर फाउंडेशनने टँकर मागवून दिले पाणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल -**
श्री सिद्धेश्वर फाउंडेशनने साई मंदिर, होटगी तलावाजवळ १००८ झाडे लावली आहेत. पाटबंधारे विभागाच्या जागेत त्यांच्याच सहकार्याने लोकसहभागातून ही झाडे लावली आहेत. सध्या सोलापूरचे तापमान महाराष्ट्रात सर्वाधिक आहे. अशा तापमानामध्ये ही झाडे जगावीत म्हणून श्री सिद्धेश्वर फाउंडेशनचे अध्यक्ष सिद्धार्थ सर्जे यांनी २६००० लिटरचे टँकर मागवले. कार्यकर्त्यांच्या मदतीने या सर्व झाडांना पाणी दिले.



सोलापूर शहरातील नामवंत, मान्यवर आणि संस्थांचे मोलाचे योगदान या कार्यासाठी लाभले आहे. फाउंडेशनचे कार्यकर्ते सुट्टीच्या दिवशी जाऊन झाडांची देखभाल करतात. गेल्या काही दिवसात उन वाढले आहे म्हणून खाजगी टँकर मागवून ही झाडे जगवण्याचा प्रयत्न सुरू आहे. फाउंडेशनने आजपर्यंत सोलापूर परिसरात साडेतीन हजार झाडे लावून जगविली आहेत. झाडे लावून जगविण्याकडे विशेष लक्ष फाउंडेशनचे कार्यकर्ते देतात.

आजच्या कार्यात सिद्धाराम आलुरे, सचिन व्हनमाने, शरणप्पा बरमदे, रमेश गुरव यांचे अनमोल सहकार्य लागले. सोलापूरचे तापमान कमी करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. या कार्यामध्ये तमाम सोलापूरकरांनी सहभाग घ्यावा असे आवाहन श्री सिद्धेश्वर फाउंडेशनचे अध्यक्ष सिद्धार्थ सर्जे यांनी केले आहे.

## विवाहितेला पतीकडून मारहाण

**सोलापूर -** घरगुती कारणातून आरती अजय पेद्दी (वय ३०, रा. बापूजी नगर) या विवाहितेला पतीने मारहाण केली. हा प्रकार गुरुवारी दुपारी १ वाजता घडला. जखमी आरती यांचा पती अजयबरोबर घरगुती कारणातून वाद झालयने अजयने लाथाबुक्यांनी मारहाण केल्याने आरती यांच्या सर्वांगास मुकामार लागला. सासरे मल्लेश यांनी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले आहे.

**CHANGE OF NAME**

I hereby declare that my old name **MISTRI RAJESHKUMAR TULSIDASH** in changed to my new name **RAJESHKUMAR TULASHIDAS IRKAL**
Affidavit No. 15411
Date - 03/04/2025

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे प्रदेश पुणे**
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, रा.प.प्रादेशिक कार्यालय,
पुणे स्टेशन रा.प.बसस्थानक, पुणे-४११००१,
फोन नं. ०२०-२६१२१६२०, E-mail - deelectcpune@gmail.com

**विद्युत विभाग - जाहीर निविदा सुचना क्र.०१/२०२४-२०२५**

रा.प. सोलापूर विभागातील नुतनीकरण करण्यात आलेल्या सांगोला बसस्थानकाचे विद्युतीकरणाचे काम करणे. कामाचे ई-निविदा **www.msrtc.gov.in** या संकेतस्थळावर **दिनांक ०४/०४/२०२५** पासुन उपलब्ध होईल. त्यानुसार ई-निविदेच्या अटी व शर्तींचे पालन करणाऱ्या उमेदवाराकडुन निविदा मागविण्यात येत आहेत.

**विभागीय अभियंता (विद्युत)**
रा.प.पुणे प्रदेश

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM Re-Tender 2nd call Notice**

Digitally signed online bids are invited through Re-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000035788 RE-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender: 19/2024-2025,** (Re-Tender 2nd call notice) **Particulars: -** Work of height extension of 132kV Kurkumbh-Daund & 132 kV Kurkumbh-Janai EHV lines at one location due to crossing of NH Pune Hydrabad near 220 kV Kurkumbh substation **Estimated cost: Rs.** 73,85,650/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost): Rs** 73,856/- **Tender cost in Rs.** 500.00+ GST, **Sale period:** 02.04.2025 to 13.04.2025 **Last Date of Submission:** 13.04.2025 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 15.04.2025 at 12:00 Hrs. (If possible). **Contact person:** Superintending Engineer - 7447440608 For further details please visit to https://srmetender.mahatransco.in.

**PRE-BID Meeting:** 07.04.2025 @ 12:00 pm at EHV O&M Circle Solapur.

**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Superintending Engineer, EHV O&M Circle Solapur.**

**सोलापूर जनता सहकारी बँक लि.**
मल्टी स्टेट शेड्युल्ड को.ऑप बँक
'गगनभरारी' शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, सोलापूर - 413007
फोन क्र.: 0217- 274 1101 ते 05 ई-मेल : info@sjsbbank.com वेबसाईट : www.sjsbbank.com

**जाहीर ताबा नोटीस**
नियम 8(1) (2)
**(दि सेक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस अँन्ड इन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 अन्वये)**

तमाम लोकांस, कर्जदार, गहाणकार व जामीनदार यांना सदर जाहीर ताबा नोटीसीने कळविण्यात येते की, ज्या अर्थी सोलापूर जनता सहकारी बँक लि. मुख्य कार्यालय, सोलापूर या संस्थेचे अधिकारी यांना उक्त अध्यादेशाच्या कलम 13(12) अन्वये प्राप्त झालेल्या प्राधिकृत अधिकारी या अधिकारानुसार मी उपरोक्त कायद्याचे कलम 13(2) अन्वये खालील नमूद कर्जदार, जामीनदार व गहाणकार -

| शाखा, कर्जदार व जामीनदार | 13(2) नोटीस व येणेबाकी | प्रत्यक्ष ताबा दिनांक |
| --- | --- | --- |
| **शाखा - मोहोळ**<br>**कर्जदार - श्री. अविनाश विद्याधर होमकर,**<br>रा. मु. पो. कामती बुद्रुक, मंगळवेढा, रोड, ता. मोहोळ, जि. सोलापूर<br>**जामीनदार - 1) श्री.रमेश गणपती बोराळे**<br>**2) श्री. भैरवनाथ निवृत्ती अंकुशराव**<br>**3) श्री. धनंजय प्रकाश होमकर** | 13 (2) दि. 8/09/2023<br>रु.7,90,211 +<br>दि. 01/09/2023<br>पासूनचे व्याज व इतर खर्च<br><br>प्रतिकात्मक ताबा<br>दि. 11/12/2024 | मा.मुख्य न्यायदंडाधिकारी सोलापूर केस नं.CRI.M.A.N.O.137/2025 दि.01/03/2025 च्या आदेशान्वये कोर्ट कमिशनर श्रीमती ॲड. सुमय्या रफिक शेख यांनी दि.29/03/2025 रोजी प्रत्यक्ष ताबा घेऊन बँकेकडे हस्तांतर केलेला आहे. |
| **तारण स्थावर मालमत्ता तपशील -** श्री. अविनाश विद्याधर होमकर यांच्या मालकीचे मु. पो. कामती बुद्रुक, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथील सि.स.नं.282, घर नं.136 याचे क्षेत्र 68.5 चौ. मी. यावर सध्या असलेले व भविष्यात होणाऱ्या बांधकामासह याची चतुःसीमा पुढील प्रमाणे - पूर्वेस - रस्ता व खुली जागा पश्चिमेस - सि.स.नं. 284 दक्षिणेस - सि.स.नं. 284 उत्तरेस - सि.स.नं. 281 | | |

यांना मागणी नोटीस पाठवून संपूर्ण रक्कम नोटीस मिळाल्या पासून 60 (साठ) दिवसाच्या आत भरणा करण्याचे कळविले होते. परंतु नोटीसीनंतर आलेला भरणा वजा जाता उपरोक्त कर्जदार / गहाणकार व जामीनदार यांनी उर्वरित रक्कम आमच्याकडे भरण्यास कसूर केलेली होती. त्या अर्थी सदर कर्जदार, गहाणकार व जामीनदार यांना कळविण्यात येते की, मा. मुख्य न्यायदंडाधिकारी सोलापूर यांचे आदेशान्वये कोर्ट कमिशनर श्रीमती ॲड. सुमय्या रफिक शेख यांनी वरील परिशिष्ठात नमूद केलेल्या स्थावर मिळकतीचा दि. 29/03/2025 रोजी दि सेक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस अँन्ड इन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 चे कलम 14 अन्वये प्रत्यक्ष **ताबा घेऊन बँकेकडे हस्तांतर केलेला आहे. सदर तारण स्थावर मालमत्ता बँकेच्या प्रत्यक्ष ताब्यात आहे.**

सबब उपरोक्त कर्जदार / गहाणकार / जामीनदार आणि तमाम लोकांना कळविण्यात येते की, वरील परिशिष्ठात नमूद केलेल्या मिळकती बाबत कोणीही कोणाशीही कोणत्याही प्रकारे हस्तांतर, विल्हेवाट, गहाण, विक्री, बोजा, तारण वाटणी, वहिवाट, बक्षिस अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतर करार करू नये. या उपरही तसा व्यवहार अथवा करार केल्यास तो बेकायदेशीर आहे, असे ठरवून आमच्या बँकेवर अथवा सदर मिळकतीवर सदर व्यवहार अथवा करार कायद्याने बंधनकारक राहणार नाही. याची नोंद उपरोक्त कर्जदार / गहाणकार / जामीनदार व तमाम लोकांनी घ्यावी.

**दिनांक : 03/04/2025**
**ठिकाण : सोलापूर**
शिक्का
**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**सोलापूर जनता सहकारी बँक लि.**
**(मल्टी स्टेट शेड्युल्ड को. ऑप. बँक)**

**Classifieds**

**पाहिजेत**
**जुनी मील कंपाऊंड परिसरात बंगल्यात सकाळी काम करण्यासाठी २५ ते ३० वयोगटातील मुलगा पाहिजे.**
**संपर्क: ९४२३५९००३६/ ९४२०८८५६०७**

**घर भाड्याने देणे आहे**
**सुसज्ज आणि प्रशस्त 2 BHK 2 फ्लॅट शाकाहारी कुटुंबास भाड्याने देणे आहे. आयएमएस पासून जवळ श्री राम चौक, कासार सोसायटी, जुळे सोलापूर. २४ तास पाणी, शांत आणि सुसज्ज परिसर, सीसीटीव्ही आणि पार्किंगची सोय.**
**- संपर्क नंबर -**
**9860139889 / 9822162454**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

**अर्ज वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी प्रसिध्दीकरण**
दिवाणी कि. अर्ज नं.४५/२०२५

**(मा.जी.एस. पाटील मॅडम यांचे कोर्ट)**
**३ रे सह दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर साहेब, बार्शी**

**१) सौ. सावित्री मोहन गुंड,**
वय-६२ वर्षे, धंदा-घरकाम,
रा. वायकुळे प्लॉट, उपळाई मार्ग, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
**२) श्रीमती पल्लवी मनोज गुंड,**
वय-४० वर्षे, धंदा-घरकाम,
रा. वायकुळे प्लॉट, उपळाई मार्ग, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर,
**३) चि. यश मनोज गुंड,**
वय-२१ वर्षे, धंदा-शिक्षण,
रा. वायकुळे प्लॉट, उपळाई मार्ग, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
**४) कु. गायत्री मनोज गुंड,**
वय-१९ वर्षे, धंदा-शिक्षण,
रा. वायकुळे प्लॉट, उपळाई मार्ग, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
— **अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** - **सामनेवाला**

ज्याअर्थी, मनोज मोहन गुंड हे दि.२६/०२/२०२० रोजी, जगदाळे मामा हॉस्पीटल बार्शी, ता. बार्शी येथे मयत झालेले आहेत. त्यांचे वारसदार म्हणून अर्जदार नं. १ ते ४ यांनी या मे. कोर्टात सदरहू मयत मनोज मोहन गुंड यांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळावे असा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार सदर मयताचे वारसदार नाहीत किंवा मयत मनोज मोहन गुंड यांचे रहिवासाचे व मयताचे ठिकाणाबाबत कोणास काही समजविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत अथवा नेमलेली ता.०६/०५/२०२५ चे आत या मे. कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदर मे. कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेवून अर्जदाराचा हक्क शाबीत झालेस अर्जदारांना सदरहू मयत मनोज मोहन गुंड यांचे वारस प्रमाणपत्र (Succession Certificate) देईल. हा जाहीरनामा दिला असे. ता.०३/०४/२०२५

**सही/-**
**क. लिपीक**
कोर्टाचा शिक्का
**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**(दिवाणी न्या. कनिष्ठ स्तर साहेब, बार्शी)**

**जाहीर प्रसिध्दीकरण**
दि. कि. अर्ज क्र. ३०/२०२५
पुढील नेमलेली तारीख :-०७/०५/२०२५
निशान क्र. ५

**बार्शी येथील मा. जिल्हा व सत्र न्यायाधिश साहेब, यांचे कोर्टात**

**१) श्री. शिवाजी दादा गणगे,**
वय- ४१ वर्षे, धंदा- शेती,
रा. मु. वंजारवाडी, पो. रावगांव, ता. करमाळा, जि. सोलापूर.
**२) कु. ओंकार शिवाजी गणगे,**
वय- १६ वर्षे, धंदा- शिक्षण,
रा. मु. वंजारवाडी, पो. रावगांव, ता. करमाळा, जि. सोलापूर
**तर्फे अज्ञान पालनकर्ता वडील अर्जदार क्र. १**
— **अर्जदार**

**विरुध्द**

**महाराष्ट्र शासन** - **सामनेवाला**

ज्याअर्थी डि. सोलापूर सब. डि. व ता. करमाळा पैकी मौजे- वंजारवाडी येथील जमीन गट नं. १०९ पैकी सामाईकातील न विभागलेले हिश्श्याचे क्षेत्र ०० हे. ६८ आर. ही मिळकत अर्जदार शिवाजी दादा गणगे व त्यांचा मुलगा ओंकार शिवाजी गणगे यांचे नावे असून, सदर मिळकत त्यांनी त्यांचे अज्ञान मुलास योग्य चांगले शिक्षण व संस्कार देण्याकरीता व भविष्याचे योग्य संगोपनाकरीता विक्री करण्याचे ठरविल्याने कु. ओंकार हा अज्ञान असल्याने अर्जदार शिवाजी दादा गणगे हे कु. ओंकार याचे नैसर्गीक पालक असल्याचे जाहीर होऊन मिळणेकरीता व कु. ओंकार याचा गट नं. १०९ या सदर मिळकतीतील अविभक्त हिस्सा विक्री करण्याकरीता मे. न्यायालयाची परवानगी मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाबाबत कोणाची कसलीही हरकत, तक्रार असल्यास त्यांनी सदर प्रकरणात प्रसिध्दीपासून ३० दिवसाच्या आत किंवा पुढील नेमलेल्या ०७/०५/२०२५ या तारखेस न्यायालयात हजर राहुन कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा कोणाची कसलीही हरकत नाही असे समजुन सदर प्रकरणी न्यायालय पुढील योग्य ते निर्णय पारीत करतील. हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले असे. दि. ०१/०४/२०२५.

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
कोर्टाचा शिक्का
**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी**

MACP No. 162/2021

**IN THE COURT OF HONBLE MOTOR ACCIDENT CLAIM Ex.19 TRIBUNAL, SOLAPUR**

MSRTC Solapur --- Petitoner
**V/S**
Mohmad Ajij Shaikh etc. --- Respondent

To.
Respondent No. 1) Mohmad Ajij Shaikh
age Adult, Occu.Driver
R/O Mursangvi Post Ravankola,
Tal. Jalkot, Dist. Latur.

Whereas the above named petitioner has filed a M.A.C.P. No.u/Sec 166 of Motor vehicle Act.1988 against you are bearing M.A.C.P. No.162 of 2021 in the court of Hon'ble District judge, Solapur but inspire multiple summons issue in your name you have failded to appear before the hon'bie court to answer the claim of the petitioner. Hence this paper publication notice Hence the notice kindly be published in daily Tarun Bharat at Latur news paper.

You are hereby directed to appear before the Hon'ble court on 29/04/25 11.00 a.m. personal to answer the claim of the petition, failing at which the case will be heard decided in your absence accordance with law.

Given under my hand and seal of the Hon'ble court on this 24 day of sept 2024

**Sign/-**
**Junior Clerk**
**Hon'ble District Court, Solapur**

**Sign/-**
**By order**
**Superintendent**
**Hon'ble District Court,Solapur**

www.tarunbharat.net
तरुण भारत

# धूम आयपीएलची...





### पंचकुलात २४ मे रोजी होणार ‘नीरज चोप्रा क्लासिक’



**पंचकुला** : हरयाणाच्या पंचकुला येथे या वर्षी २४ मे रोजी आंतरराष्ट्रीय भालाफेकीच्या स्पर्धेत ‘नीरज चोप्रा क्लासिक’ (एनसी क्लासिक) पहिल्या आवृत्तीचे आयोजन करण्यात येणार आहे, अशी पुष्टी जागतिक ॲथ्लेटिक्स महासंघाने केली आहे. एनसी क्लासिक हा जागतिक ॲथ्लेटिक्स सुवर्ण श्रेणीतील स्पर्धा असेल, त्यामुळे जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी एक महत्त्वाचा पात्रता स्पर्धा ठरेल. या स्पर्धेत अव्वल आंतरराष्ट्रीय भालाफेकीचे स्टार खेळाडू सहभागी होण्याची अपेक्षा आहे. या आंतरराष्ट्रीय भालाफेकीच्या स्पर्धेला जागतिक ॲथ्लेटिक्स महासंघाने पुष्टी दिली आहे.

### फिफा फुटबॉल क्रमवारीत भारताची आणखी घसरण

**नवी दिल्ली** : गुरुवारी जागतिक फुटबॉल प्रशासकीय संस्था फिफाने प्रकाशित केलेल्या ताज्या पुरुषांच्या फुटबॉल संघाच्या क्रमवारीत भारतीय संघ एका स्थानाने घसरून १२७ व्या स्थानावर आला. बांगलादेशने दोन स्थानांनी प्रगती केली आहे. मार्च २०२५ मध्ये एएफसी आशियाई चषक पात्रता सामन्यात बांगलादेशने भारताला गोलशून्यने बरोबरीत रोखले होते. या निकालामुळे बांगलादेशला दोन स्थानांनी प्रगती करत १८३ स्थानांवर पोहोचण्यास मदत झाली. २०२४ च्या सुरुवातीपासून गत १३ सामन्यांमध्ये मॅनोलो मार्केझच्या मार्गदर्शनाखालील भारतीय संघाला केवळ एकच विजय मिळाला आहे. संघ सलग तिसऱ्यांदा आशियाई चषक पात्रता फेरीत प्रवेश करण्याचे ध्येय ठेवत आहे. बांगलादेश, सिंगापूर आणि हाँगकाँगसह त्यांचा गट आहे. गतविजेता अर्जेंटिना अव्वल स्थानावर आहे, युरोपियन विजेता स्पेन व फ्रान्सने अव्वल तीन क्रमांकावर स्थान मिळवले आहे.

### जोबर्ग ओपन गोल्फचे विजेतेपद दीक्षा डागरला



**जोबर्ग** : भारतीय महिला गोल्फपटू दीक्षा डागरने जोबर्ग ओपन गोल्फ स्पर्धेचे विजेतेपद पटकावले आहे. हे तिचे पहिले लेडीज युरोपियन टूर जेतेपद ठरले. या आठवड्यात मैदानावर असलेल्या चार भारतीयांपैकी एक असलेल्या दीक्षा हिने २०१९ मध्ये दक्षिण आफ्रिकन ओपन जिंकून आपला पहिला विजय मिळवला. जोबर्ग ओपन नंतर दक्षिण आफ्रिकन महिला ओपन गोल्फ स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. आतापर्यंत चांगला हंगाम खेळणारी दीक्षा लल्ला मेरीम चषक स्पर्धेत उपविजेती होती आणि त्यानंतर न्यू साऊथ वेल्स ओपनमध्ये अकरावे स्थान मिळविले होते. मायभूमीवरील हिरो वुमेन्स प्रो गोल्फ स्पर्धेत अनेक वेळा विजेती राहिलेली दीक्षा सध्या ऑर्डर ऑफ मेरिटमध्ये पाचव्या स्थानावर आहे. इतर भारतीय खेळाडूंमध्ये प्रणवी उर्सने १४ वे स्थान, मोराक्कोमधील लल्ला मेरीम चषकांत १६ वे स्थान, ऑस्ट्रेलियातील महिला क्लासिकमध्ये १३ वे स्थान आणि एनएसडब्ल्यू स्पर्धेत ३६ वे स्थान मिळविले. या स्पर्धेत नवोदित अवनी प्रशांत आणि त्वेसा मलिकनेही भाग घेतला होता.

### संथ गतीने षटके टाकल्याबद्दल पाकिस्तानला पाच टक्के दंड

**नवी दिल्ली** : हॅमिल्टनमधील सेडन पार्क येथे झालेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात न्यूझीलंडविरुद्ध संथ गतीने षटके टाकल्याबद्दल पाकिस्तान संघाला त्यांच्या सामना शुल्काच्या पाच टक्के दंड ठोठावण्यात आला आहे. नेपियरमधील मॅकलीन पार्क येथे झालेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यातही संथ गतीने षटके टाकल्याच्या गुन्ह्यासाठी पाहुण्या संघाला त्यांच्या सामना शुल्काच्या दहा टक्के दंड ठोठावण्यात आला होता. या सामन्यात त्यांना न्यूझीलंडकडून ७३ धावांनी पराभव पत्करावा लागला होता. दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात वेळेचे भत्ते विचारात घेतल्यानंतर पाकिस्तानला लक्ष्यापेक्षा एक षटक कमी पडल्याचे आढळल्यानंतर आयसीसी एलिट पॅनेल ऑफ मॅच रेफ्रीजचे जेफ क्रो यांनी हा दंड ठोठावला. या सामन्यात पाकिस्तान संघाने ८४ धावांनी पराभव पत्करला होता.

# मुंबई लखनौविरुद्ध विजयी घोडदौड कायम राखणार

◆ **लखनौ, ३ एप्रिल**

अठराव्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात शुक्रवारी १६ व्या सामन्यात लखनौ सुपर जायण्ट्स मुंबई इंडियन्सविरुद्ध सलग दुसऱ्यांदा घरच्या मैदानावर सामना खेळणार आहेत.

दोन्ही संघ सध्या गुणतालिकेत अव्वल चारच्या बाहेर आहेत आणि या सामन्यात त्यांच्या मागील सामन्यांपेक्षा वेगळे निकाल आहेत. लखनौला पंजाब किंग्जकडून ८ गड्यांनी पराभव स्वीकारावा लागला, तर मुंबई इंडियन्सने कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध ८ गड्यांनी विजय नोंदविला. लखनौने तीन सामन्यांपैकी एक विजय व दोन पराभव पत्करले, तर मुंबईने दोन पराभवानंतर आपला पहिला विज य नोंदविला. मुंबई व लखनौचे प्रत्येकी २ गुण असून ते अनुक्रमे पाचव्या व सहाव्या स्थानावर आहे.

गत सामन्यातील विजयामुळे हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखालील मुंबई इंडियन्सचा आत्मविश्वास बळावलेला असेल व ते या विजयाची लय कायम राखण्यास उत्सुक असतील. तिकडे गत सामन्यातील पराभवानंतर ऋषभ पंतच्या नेतृत्वाखालील लखनौचा संघ पुन्हा विजयाच्या मार्गावर परतण्यास उत्सुक असेल.





पहिल्या सहा षटकांमधील मिचेल मार्श आणि ट्रेंट बोल्ट यांच्यातील लढाई लखनौ विरुद्ध मुंबईदरम्यानचा सामना कोणत्या दिशेने जाईल हे ठरविण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल, कारण मिचेल मार्श गत काही सामन्यांमध्ये चांगल्या फॉर्ममध्ये आहे आणि त्याने पॉवरप्लेचा पुरेपूर वापर केला आहे. दुसरीकडे, बोल्टने केकेआर विरुद्धच्या शेवटच्या सामन्यात आपला सर्वोत्तम गोलंदाजी अनुभवली. त्याने स्कोअरिंग रेट मर्यादित करण्यासाठी नरेनचा महत्त्वाचा बळी विकेट घेतला. अनुभवी वेगवान गोलंदाज लखनौविरुद्धच्या कामगिरीची पुनरावृत्ती करण्याची आशा करेल

सध्याच्या आयपीएल हंगामात लखनौसाठी फलंदाजीने उत्तम फॉर्ममध्ये असलेला निकोलस पूरन मुंबई इंडियन्सविरुद्ध जबरदस्त फलंदाजी करण्यास उत्सुक असेल. पूरनचा सामना लेग स्पिनर विघ्नेश पुथूरशी होऊ शकतो व तो पूरनचा बळी घेण्याचा प्रयत्न करेल.

या हंगामात आतापर्यंत धावा कमी असलेला रोहित शर्मा लखनौ विरुद्ध मुंबई सामन्यात शार्दुल ठाकूरचा सामना करेल. आतापर्यंत हंगामातील आघाडीच्या बळी घेणाऱ्या गोलंदाजांपैकी एक असलेल्या ठाकूरला गोलंदाजी करण्याची सवय आहे.

पंजाब किंग्जने पॉवरप्लेमध्ये लखनौ संघाचा पराभव केला आणि त्यांना बचावासाठी ऑरेंज कॅप धारक निकोलस पूरनकडून मदतीची आशा होती, परंतु तो ३० चेंडूत ४४ धावा करू शकला. आयुष बदोनीने (३३ चेंडूत ४१) पुन्हा एकदा संघाची बाजू लावून धरण्याचा प्रयत्न केला व अब्दुल सामदने (१२ चेंडूत २७) शेवटी महत्त्वाचे फटके मारून एकूण धावसंख्येला काही सन्मान दिला. प्रभसिमरन सिंग (३४ चेंडूत ६९ धावा) आणि श्रेयस अय्यर (३० चेंडूत ५२* धावा) यांनी धमाकेदार अर्धशतके झळकावत लक्ष्य साध्य केले, तर नेहल वधेराने २५ चेंडूत नाबाद ४३ धावांची खेळी केली. पंजाबने १७२ धावांचे लक्ष्य आठ गडी राखून गाठले. दिग्वेश राठीने पंजाबचे दोन गडी बाद केले.

मुंबई इंडियन्सचा गत सामना सोपा होता, त्यांनी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर केकेआरचा आठ गड्यांनी आरामात पराभव केला. ट्रेंट बोल्ट व दीपक चहरने पॉवरप्लेमध्ये पाहुण्यांना धुव्वा उडवला. मुंबई इंडियन्सच्या पदार्पण करणाऱ्या अश्वनी कुमारने ४ ब ळी टिपण्याची किमया केली. केकेआरचा डाव ११६ धावांवरच आटोपला. रायन रिकेल्टन (नाबाद ६१) व सूर्यकुमार यादवच्या खेळीमुळे यजमान मुंबई इंडियन्स संघाने अवघ्या १२.५ षटकांतच विजयाचे लक्ष्य गाठले. (वृत्तसंस्था)

> **आजचा सामना**
>
> **लखनौ सुपर जायण्ट्स वि. मुंबई इंडियन्स**
>
> **स्थळ** : एकाना क्रिकेट स्टेडियम, लखनौ
>
> **वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
>
> **थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# रबाडा वैयक्तिक कारणांमुळे आयपीएलमधून मायदेशी परतला

◆ **नवी दिल्ली, ३ एप्रिल**

दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज कॅगिसो रबाडा वैयक्तिक कारणांमुळे आयपीएलमधून मायदेशी परतला आहे, अशी घोषणा त्याची फ्रॅन्चायझी गुजरात टायटन्सने गुरुवारी केली.

टायटन्सने मात्र आयपीएल २०२५ मधून रबाडाच्या अनुपस्थितीचा कालावधी स्पष्ट केलेला नाही. तो आतापर्यंत गुजरातकडून दोन सामने खेळला आहे.

कॅगिसो रबाडा एका महत्त्वाच्या वैयक्तिक प्रकरणाशी निगडित दक्षिण आफ्रिकेत परतला आहे, असे गुजरात संघाने एका निवेदनात म्हटले आहे.



रबाडा पंजाब किंग्ज व मुंबई इंडियन्स विरुद्ध खेळला, त्या सामन्यांमध्ये अनुक्रमे ४१ धावांत १ आणि ४२ धावांत १ बळी घेतला. बुधवारी एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध गुजरात टायटन्सच्या सामन्यासाठी २९ वर्षीय रबाडाची निवड करण्यात आली नाही.

रबाडाच्या जागी अर्शद खानला अकरा जणांमध्ये स्थान देण्यात आले आणि डावाच्या सुरुवातीलाच विराट कोहलीची महत्त्वाची विकेट घेतली.

रबाडाच्या अनुपस्थितीत, जीटीला त्याचा दक्षिण आफ्रिकेचा सहकारी गेराल्ड कोएत्झी किंवा अफगाणिस्तानचा अष्टपैलू खेळाडू करीम जनतवर अवलंबून राहावे लागू शकते. (वृत्तसंस्था)

# मनीष, हितेश, अविनाश उपांत्य फेरीत

**जागतिक मुष्टियुद्ध चषक**

◆ **नवी दिल्ली, ३ एप्रिल**

ब्राझीलमध्ये सुरु असलेल्या जागतिक मुष्टियुद्ध चषक ब्राझील २०२५ स्पर्धेत भारताच्या मनीष राठोड, हितेश आणि अविनाश जामवालने आपापल्या वजनी गटात आकर्षक विजय नोंदवून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

६५ किलो गटात जामवालने जर्मनीच्या डेनिस ब्रिलला एकमताने पराभूत केले, तर ७० किलो गटात हितेशने इटलीच्या गॅब्रिएल गुइडी रोन्टानीला अशाच प्रकारे पराभूत केले. ५५ किलो गटात राठोड ऑस्ट्रेलियाच्या पॅरिस आलिम्पियन युसूफ चोथियाविरुद्ध होता व भारतीय राष्ट्रीय विजेता आव्हानासाठी तयार होता. दोन्ही खेळाडूंनी तिन्ही फेऱ्यांमध्ये चुरशीची लढत दिली व दोघांनीही समान गुण घेतले. सरतेशेवटी तीन पंचांनी एकमताने युसूफ चोथियाच्या बाजूने निकाल दिला.



उपांत्य फेरीत राठोडचा सामना कझाकस्तानच्या नुरसुल्तान अल्टिनबेकशी होईल, हितेशची लढत माकन त्राओरशी होईल तर जामवाल इटलीच्या जियानलुइगी मलंगाविरुद्ध लढेल. (वृत्तसंस्था)



# दिड्डी, वल्लाकाटी व जेएमडी संघाची विजयी सलामी

**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

टी-१० क्रिकेट स्पर्धेत दिड्डी, वल्लाकाटी व जेएमडी संघाने विजयी सलामी दिली. येथील पार्क मैदानावर सुरु झालेल्या या स्पर्धेत आठ संघानी सहभाग नोंदवला. सलामीच्या सामन्यात श्री गणेश वल्लाकाटी संघाने फायटर संघाचा ३९ धावांनी पराभव केला. दुसऱ्या सामन्यात दिड्डी काका इलेवन संघाने अप्पा गणपती मास्टर संघास ८ गडी राखून हरविले. तिसऱ्या सामन्यात जेएमडी वॉरियर्स संघाने मैनवी स्टायकरवर ३९ धावांनी विजय मिळविला. या स्पर्धेचे उद्घाटन पांडुरंग दिड्डी, ॲड. मनोज पामुल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रमेश नल्ला, जगदीप भिमरथी, वासु दोरनाल, महेश आरकाल, सुशील कन्ना, शितल सब्बन, दत्ता बडगू, राजेश येमुल आदी उपस्थित होते.

**संक्षिप्त धावफलक : श्री गणेश वल्लाकाटी :** १० षटकात १३२ विजयी विरुद्ध **फायटर :** १० षटकात १०४.

**अप्पा गणपती मास्टर्स :**१० षटकात ८९ पराभूत विरुद्ध **पांडुरंग दिड्डी काका एलेव्हन :** ९ षटकात ९०.

**जेएमडी वॉरीयर्स :** १० षटकात ११५ वि. वि. **मैनवी स्टायकर :** १० षटकात ७६.

**सामनवीर :** राजवर्धन जिल्ला, प्रमोद मंगलपल्ली, राजेश येमूल.

# महाराष्ट्राचे पुरुष व महिला संघ उपांत्य फेरीत

## ५७ वी पुरुष व महिला राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा ● रेल्वे कोल्हापूरचे पुरुष संघही पुढील फेरीत

◆ **पुरी, ३ एप्रिल**

महाराष्ट्राच्या पुरुष आणि महिला संघांनी आपल्या विजयाची लय कायम ठेवत ५७व्या राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक मारली आहे. रेल्वे आणि कोल्हापूरच्या पुरुष संघांनीही प्रभावी कामगिरी करत उपांत्य फेरीत प्रवेश मिळवला आहे.

पुरी येथील जिल्हा क्रीडा संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धेत पुरुषांच्या उपांत्यपूर्व सामन्यात महाराष्ट्राने पश्चिम बंगालचा ३१-२४ असा पराभव केला. मध्यंतरानंतरच्या डावात पश्चिम बंगालने १६-१० अशी जोरदार लढत दिली होती. मात्र मध्यंतराची २१-८ अशी निर्णायक आघाडी महाराष्ट्राला विजय मिळवून देऊन गेली. यात महाराष्ट्राच्या पीयूष घोलम याने आपल्या धारदार आक्रमणात ६ गडी बाद केले. शुभम थोरातने २.३० मि. संरक्षण व नरेंद्र कातकडेने १.५० व १.१० मि. संरक्षणाची खेळी केली. कोलकत्ताच्या सुमन बर्मन (१.५० मि. संरक्षण व २ गुण) याची अष्टपैलू खेळी व सुमन डेबनाढ (१० गुण) याची आक्रमणाची खेळी अपुरी पडली. यापूर्वी झालेल्या सामन्यात महाराष्ट्रने महाराष्ट्र पोलिस संघाचा २८-१४ असा एक डाव राखून १४ गुणांनी पराभव केला. यात सुयश गरगटे (नाबाद २.३० मि. संरक्षण व ६ गुण ) व प्रतीक वाईकर (१.१० मि. संरक्षण व ६ गुण ) यांनी अष्टपैलू कामगिरी करत विजय सोपा केला. महाराष्ट्र पोलिसकडून मनोज घोटेकर (१.०० मि. ४ गुण ) याचा अष्टपैलू खेळ एकाकी होता.



प्रतिस्पर्धी संघाच्या खेळाडूला बाद करण्याचा प्रयत्नात महाराष्ट्राचा खेळाडू

**महिला गटात महाराष्ट्राची विजयी घोडदौड**

महिला गटात उपांत्यपूर्व फेरीत महाराष्ट्राने कोल्हापूरवर २०-१४ असा एक डाव राखून सहा गुणांनी दणदणीत विजय मिळवला. प्रियंका इंगळेने कोल्हापूरचे आक्रमण खिळखिळीत करत तब्बल ५.१८ मिनिटे संरक्षण केले व आक्रमणात चार गुण वसूल करून विजय निश्चित केला. पायल पवार (२.२२ मि. संरक्षण ) व संध्या सुरवसे (नाबाद १.२० मि. संरक्षण) यांनीही दिलेली साथ विजयात भर घालणारी ठरली. कोल्हापूरच्या श्रावणी पाटीलची (१.४५ मि. संरक्षण व २ गुण) खेळी व्यर्थ ठरली.तत्पूर्वी महाराष्ट्राने केरळचा ४४-१० असा ३४ गुणांनी धुव्वा उडवला होता. यातही प्रियांका इंगळेने (३.३२ मि. १२ गुण ) अष्टपैलू कामगिरी बजावली.

**इतर उपांत्यपूर्व निकाल असे-**

पुरुष : ओडिशा विजयी विरुद्ध आंध्र प्रदेश २९-२६, कोल्हापूर वि. वि. कर्नाटक ३२-२५, रेल्वे वि. वि. केरळ ३७-२४. महिला : दिल्ली वि. वि. कर्नाटक २६-२२, एअरपोर्ट ऑथोरिटी वि. वि. गुजरात २१-१३, आंध्र प्रदेश वि. वि. उत्तर प्रदेश २४-१९.

**-असे होणार उपांत्य सामने-**

**पुरुष** : महाराष्ट्र विरुद्ध ओडिशा, रेल्वे विरुद्ध कोल्हापूर.

**महिला** : महाराष्ट्र विरुद्ध दिल्ली, एअरपोर्ट ऑथोरिटी विरुद्ध आंध्र प्रदेश. (तभा वृत्तसेवा)

# सिटी टायटन्स व उस्मानाबादचे शानदार विजय





सोलापूर : सामानवीर पुरस्कार योगेश खलाटे यास अमजद पठाण यांच्या हस्ते देण्यात आला. दुसऱ्या सामन्यात अत्तार यांच्याकडून सामानवीर पुरस्कार स्वीकारताना सैफन बागवान.

## रेल्वेची ७८वी स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा

## योगेश खलाटे, सैफन बागवान सामनावीर

**तभा वृत्तसेवा**

**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

मध्य रेल्वे सोलापूर इन्स्टिट्युटच्या ७८व्या स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत सिटी टायटन्सने गॅरी कर्स्टन क्रिकेट अकॅडमीचा ४ गडी राखून पराभव केला. २ बळी टिपणारा योगेश खलाटे सामनावीर ठरला.

रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धेतील दुसऱ्या सामन्यात सैफन बागवानच्या ६ बळीच्या जोरावर उस्मानाबाद क्रिकेट क्लबने विजापूर क्रिकेट क्लबवर ९ धावांनी मात केली. सैफन बागवान साम न्याचा मानकरी ठरला. पंच म्हणून सचिन गायकवाड व दयानंद नवले, नंदकुमार टेळे व अतीक शेख तर गुणलेखक म्हणून गेनबा सुरवसे यांनी काम पाहिले. प्रत्येक सामन्याचे सामनावीर पुरस्कार सुदेश मालप व सुनील मालप यांच्याकडून देण्यात आले.

> **संक्षिप्त धावफलक**
>
> **गॅरी कर्स्टन क्रिकेट अकॅडमी :** २० षटकांत ९ बाद ११९ (रोहित वीर २९, अप्पू स्वामी १७, रामहरी चोपटे १५, योगेश खलाटे २ बळी, चेतन पवार, इस्माईल पिरजादे, सर्फराज शेख प्रत्येकी १ बळी) पराभूत विरुद्ध **सिटी टायटन्स :** ११.२ षटकांत ६ बाद १२० (सर्फराज शेख ३१, इस्माईल करजगी २०, इस्माईल पिर्जादे १६, यश पवार ३ बळी, ओम साई २ बळी.)

> **उस्मानाबाद क्रिकेट क्लब :** १७ षटकांत ९ बाद १३३ (सुमित राठोड २७, वीरेंद्र जाधव २१, तारेख अहमदी २१, डी. सुमित ४ बळी, गिरीश यादव ३ बळी, एम डी अत्तार २ बळी) वि. वि. **बिजापूर क्रिकेट क्लब :** ९ षटकांत ८ बाद ६१ (सुमित निंबर्गी १९, ओंकार भंडारी १२, सैफन बागवान ६ बळी, बाबा शेख व वीरेंद्र जाधव प्रत्येकी एक बळी).

# कधीही हार मानू नका : श्रीजेश

## प्रो-कबड्डी खेळाडूंना मार्गदर्शन

◆ **नवी दिल्ली, ३ एप्रिल**

जेव्हा तुम्ही जिंकता तेव्हा लोक तुम्हाला डोक्यावर घेतात, तुमची आठवण काढतात, परंतु खरी प्रगती आपण जिंकत नसलेल्या सामन्यांमधून होते. पुढच्या वेळी काय वेगळे करायचे ते आपण तिथेच शिकतो. खेळातील अंतिम सत्य सोपे आहे- कधीही हार मानू नका. प्रत्येक अपयशानंतर पश्चात्ताप होतो, परंतु जो अधिक टिकून राहतो, जो सुधारणा करण्यासाठी अधिक मेहनत करतो, तोच शेवटी यशस्वी होतो, असे ऑलिम्पिक कांस्यपदक विजेता स्टार हॉकीपटू पी. आर. श्रीजेश म्हणाला.



हॉकीपटू पी. आर. श्रीजेशचा गौरव करताना प्रो-कबड्डीपटू

प्रो-कबड्डी लीगने कबड्डी खेळाडूंना मॅटवरील कामगिरीपेक्षाही उंचावण्यासाठी डिझाइन केलेली पीकेएल लेव्हल अप खेळाडू विकास कार्यशाळा यशस्वीरित्या आयोजित केली. त्याप्रसंगी पी. आर. श्रीजेश मार्गदर्शन करत होता.

आयुष्य हे केवळ सामन्यांदरम्यान काय घडते यावर अवलंबून नाही - मैदानाबाहेरील तुमचे वर्तनसुद्धा महत्त्वाचे आहेत. तुम्ही कुटुंबासोबत कसे वागता, तुम्ही स्वतःला समाज माध्यमावर कसे सादर करता आणि दैनंदिन जीवनात तुम्ही कोणती मूल्ये दाखवता - हे सर्व एक खेळाडू म्हणून तुमची ओळख निर्माण करते,‘‘ असेही तो आपल्या सत्रादरम्यान म्हणाला.

हा नाविन्यपूर्ण उपक्रम व्यावसायिक कबड्डीमध्ये एक महत्त्वाचा टप्पा होता, ज्यामध्ये उद्योगातील तज्ज्ञांना एकत्र आणून खेळाडूंना महत्त्वाचे जीवन कौशल्य, वैयक्तिक ब्रॅण्डिंग व व्यावसायिक वाढीच्या संधी प्रदान करण्यात आल्या. ही कार्यशाळा लीगच्या खेळाडूंचे संगोपन करण्याच्या व त्यांना व्यावसायिक व वैयक्तिकरित्या उत्कृष्ट कामगिरी करण्याची खात्री करण्याच्या वचनबद्धतेचा पुरावा होती.

सांघिक कार्य आवश्यक आहे. एका खेळाडूची चूक संपूर्ण संघावर परिणाम करते, म्हणूनच परस्पर समजूतदारपणा महत्त्वाचा ठरतो. मैदानावर जे घडते ते सामना संपल्यावर तिथेच संपते. आम्ही पुन्हा मित्र आहोत कारण आदर हा खिलाडूवृत्तीचा पाया आह, असेही पी. आर. श्रीजेश म्हणाला.

या कार्यक्रमात ऑलिम्पिक कांस्यपदक विजेता हॉकीपटू पी. आर. श्रीजेश, मेटा इंडियाचे अल्पी चौधरी, प्रख्यात कंटेंट क्रिएटर दीपक पारीख, भारतातील स्पोर्ट्स मीडिया रिलेशन्ससाठी एक आघाडीची कंपनी वर्ड्सवर्क कम्युनिकेशन्स कन्सल्टिंगच्या सीईओ आणि संस्थापक नेहा माथुर रस्तोगी व इन्स्पायर इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्सचे प्रसिद्ध स्पोर्ट्स ॲण्ड डेप्थ सायकॉलॉजिस्ट डॉ. चैतन्य श्रीधर यांच्यासह वक्त्यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचा उद्देश खेळाडूंना समग्र विकासासाठी अंतर्दृष्टी व साधनांनी सुसज्ज करणे हा होता.

या कार्यशाळेत खेळाडूंना समाज माध्यमावर प्रभावीपणे नेव्हिगेट करण्यास आणि मीडिया मुलाखती आणि पत्रकार परिषदांसाठी तयारी करण्यास मदत करण्यासाठी विशेष सत्र आयोजित करण्यात आले होते. (वृत्तसंस्था)

## महत्वाचे..

### पिडीतेवर वारंवार अत्याचार केल्याप्रकरणी सासूचा जामीन अर्ज मंजूर

**बार्शी, दि.३ एप्रिल -**

येथील पीडित महिलेवर वारंवार अत्याचार असल्याने दीर, सासरा व सासू यांचेविरुद्ध टेंभुर्णी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी सासूला दि. ८ जानेवारी २०२५ रोजी पोलिसांनी ताब्यात घेऊन अटक केली होती. आरोपी सासूचा जामीन अर्ज बार्शी येथील मे. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी मंजूर केला आहे. फिर्यादी महिलेचा पती मयत झाल्यानंतर तिचा दीर सतत दमदाटी करुन फिर्यादीशी लग्न करतो, असे म्हणून वारंवार शारीरिक संबंध ठेवत होता व सासरा हा देखील घरात कोणी नसताना शेतात काम ला गेल्यानंतर फिर्यादीस दमदाटी करुन वेळोवेळी शारीरिक संबंध ठेवत होता. पीडित महिला ही मारुन टाकतील या भीतीने गप्प बसत होती व तिने हा सर्व प्रकार सासूला बऱ्याच वेळा सांगण्याचा प्रयत्न केला, परंतु सासू काहीच बोलत नव्हती व पिडीत महिलेस शिव्या देऊन मारहाण करत होती. हा सर्व प्रकार मागील एक वर्षापासून म्हणजेच दि. २९ जानेवारी २०२४ पासून सुरु होता. याबाबत टेंभुर्णी पोलीस ठाण्यात दि. २ फेब्रुवारी २०२१ रोजी भारतीय न्यायसंहितेचे कलम ३७६(२)(एन), ३७६(२)(एफ), ३२३, ५०४, ५०६ व ३४ या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. यात अर्जदार आरोपी विमल काळे हिने बार्शी येथील मे. जिल्हा व सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता. सदर प्रकरणी अर्जदार हिचे वतीने वकिलांनी केलेला युक्तिवाद ऐकून मे. जिल्हा व सत्र न्यायाधीश एल. एस. चव्हाण यांनी सदरचा जामीन अर्ज मंजूर केला. यात अर्जदार महिलेतर्फे ॲड. प्रशांत एडके, ॲड. समाधान सुरवसे, ॲड. आकाश तावडे व ॲड. सुहास कांबळे यांनी काम पाहिले.



### अवैध वाळू वाहतूकीवर महसूल व पोलिस प्रशासनाची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि.३ एप्रिल-**

अवैध वाळू उपसा व वाहतूकी विरोधात पंढरपूरच्या महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. महसूल व पोलीस प्रशासनाच्या पथकाने माण व भीमा नदीपात्रात अवैध वाळू वाहतूकीसाठी वापरण्यात येणारे तीन अशोक लेलँडचे पिकअप व ट्रॅक्टर अशी एकूण चार वाहने जप्त करण्यात आल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली. पंढरपूर तालुक्यातील अवैध वाळू उपसा रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार सचिन लंगुटे यांनी विविध पथकांची नेमणूक केली आहे. दिनांक ०३ एप्रिल २०२५ रोजी पहाटे ३.०० वाजता महसूल व पोलीस पथकाने माण नदी पात्रामध्ये अवैध वाळू वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या अशोक लेलँड कंपनीचे वाहन क्रमांक एमएच ०९ एफ एल, एमएच ०९ एफएल -६३८४ व बिगर नंबर वाहन तसेच मौजे गोपाळपूर येथील भीमा नदी पात्रात स्वराज्य कंपनीचा ट्रॅक्टर पकडून जप्त करण्यात आला आहे. ही सदर वाहने शासकीय धान्य गोदाम पंढरपूर येथे लावण्यात आली आहेत. या कारवाईमध्ये मंडळ अधिकारी पंकज राठोड, ग्राम महसूल अधिकारी साईनाथ अडगटाळे, नवनाथ मोरे, सरताज मुजावर, पोलीस पाटील दत्तात्रय जाधव, महसूल सेवक साहेबराव भोपळे व तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस हेडकॉन्स्टेबल सुधीर शिंदे पोलीस कॉन्स्टेबल राम खेडकर व होमगार्ड महेश कुंभार सहभागी होते.



### डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेची कार्यकारिणी जाहीर

**बार्शी, दि.३ एप्रिल**

डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना ही राज्यातील पहिली नोंदणीकृत संघटना असून आज रोजी संघटनेचे १२,००० पेक्षा जास्त सभासद नोंदणी झाली असून संघटनेचे तिसरे अधिवेशन लवकरच होणार असून संघटनेच्या पुढील दमदार वाटचालीसाठी स्वतः संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्री. राजा माने यांनी बार्शीमध्ये येऊन कार्यकारिणी जाहीर केली. कार्यकारिणी जाहीर करत असताना माने यांनी स्पष्ट निर्देश दिले की, आपण कोणाच्या विरोधात नाही व आपण कोणाच्या सोबत नाही. आपली संघटनाही सत्याचर काम करणारी संघटना आहे. संघटनेची नवीन कार्यकारणी खालीलप्रमाणे : तालुकाध्यक्ष गणेश शिंदे, तालुका शहर उपाध्यक्ष अभिजीत शिंदे, तालुका ग्रामीण उपाध्यक्ष भैरवनाथ चौधरी, सचिव गोविंद भिसे, खजिनदार किरण माने, कार्याध्यक्ष संतोष राजगुरु, प्रसिद्धी प्रमुख राहुल भालशंकर, संघटक अक्षय बारंगुळे. तसेच तालुका कार्यकारिणी बरोबरच काही राज्याच्या व जिल्ह्याच्या देखील निवडी करण्यात आल्या. महाराष्ट्र राज्य प्रसिद्धीप्रमुख म्हणून धीरज शेळके, तसेच महिला आघाडी सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष वैशाली ढगे तर महिला आघाडी सोलापूर जिल्हा कार्यकारिणी सदस्य राजश्री गवळी यांची निवड करण्यात आली. संघटनेच्या नवीन पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा देत संघटनेत चांगल्या पद्धतीने काम करा व अधिवेशनाला देखील सर्वांनी मिळून हजेरी लावा, असे निर्देश राजा माने यांनी नवीन कार्यकारिणीसह सर्व पदाधिकाऱ्यांना दिले. यावेळी डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने, पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सतीश सावंत, राज्य संघटक मुरलीधर चव्हाण, संघटनेचे कोषाध्यक्ष अमित इंगोले, राज्य सदस्य संतोष सूर्यवंशी, पश्चिम महाराष्ट्र सहसचिव विजय कोरे, सोलापूर जिल्ह्याचे अध्यक्ष प्रवीण नागणे, पंढरपूर तालुकाध्यक्ष सचिन कुलकर्णी इत्यादी उपस्थित होते.

### केंद्रीय मार्ग निधीतून

# दोन रस्त्यांसाठी ३५ कोटी रुपये निधी मंजूर

## अक्कलकोटला तीन वर्षात मिळाले ७५ कोटी रुपये; आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि ३ एप्रिल**

अक्कलकोट विधानसभेतील सलगर भागातील एका रस्त्यांसाठी पंचवीस कोटी तर अक्कलकोट ते बासलेगावं रस्त्यास १० कोटी असा एकूण ३५ कोटी रुपयांचा निधी केंद्रीय मार्ग निधीतून मिळाल्याचे अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

मंजूर झालेला रस्ता हा अक्कलकोट ते निमगांव, चिक्केहळ्ळी सलगर मार्गे भोसगा या २० किमीच्या रस्त्याचा मजबुतीकरणांस २५ कोटी मंजूर झाले आहेत. याशिवाय अक्कलकोट ते बासलेगाव रस्त्याच्या ५.८ किमी लांबीच्या मजबुतीकरणास १० कोटी रुपये मंजूर झाले आहेत. सलगर भागातील रस्ते हे गेल्या पंधरा ते वीस वर्षापासून निधीअभावी खराब अवस्थेत



होते. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी सलगर भागातील मतदारांना दिलेला शब्द पूर्ण करण्यासाठी वारंवार पाठपुरावा करून निधी मंजूर करून घेतला आहे. यापूर्वी सुद्धा तीन टप्प्यात केंद्रीय मार्ग निधीतून वेगवेगळ्या रस्त्यांसाठी ४० कोटी रुपये निधी मंजूर झालेला आहे. यावेळच्या ३५ कोटींच्या निधीमुळे अक्कलकोट विधानसभा क्षेत्रासाठी केंद्रीय मार्ग निधीतून एकूण ७५ कोटी रुपये निधी चार वर्षात मंजूर झालेले आहेत. याबाबत अधिक माहिती

> सलगर व उडगी भागातील मागील १५ ते २० वर्षापासून खराब झालेले आणि दुर्लक्षित रस्ते आणि त्याच्या पूर्ततेसाठी मला निवडून देण्याचा मतदारांना मी घातलेली साद आणि त्याला त्यांनी दिलेला प्रतिसाद याची जबाबदारी म्हणून विधानसभा क्षेत्रातील सर्वच रस्ते हे अतिशय उत्कृष्ट दर्जाचे डांबरीकरणाने पूर्ण व्हावेत यासाठी माझा प्रामाणिक प्रयत्न सुरू आहे. त्यातून वरील रस्त्यांची कामे मार्गी लागलेली आहेत. आता आणखी जे काही रस्ते अपूर्ण आहेत ते पूर्ण करण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर आहे. यासाठी नामदार नितीन गडकरी, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.
>
> **- सचिन कल्याणशेट्टी आमदार, अक्कलकोट**

देताना कल्याणशेट्टी म्हणाले की, केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांच्या सहकार्याने आजपर्यंत अक्कलकोट्या रस्त्यांना केंद्रीय रस्ते विकास निधीतून भरघोस निधी मिळाला आहे. गेल्या वीस ते बावीस वर्षात अक्कलकोट विधानसभा क्षेत्रासाठी केंद्रीय रस्ते विकास निधीतून केवळ साडेतीन कोटी रुपये निधी उपलब्ध होऊ शकला होता. पण आता तीन वर्षात तब्बल ७५ कोटी रुपये एवढा निधी आणून रस्त्यांचा समतोल विकास साधण्याचा प्रयत्न केला आहे. आता महायुतीचे सरकार पुन्हा आल्यानंतर कल्याणशेट्टी यांनी अक्कलकोट विधानसभा क्षेत्रातील सर्वच भागातील रस्त्यांसाठी कोट्यावधी रुपयाचा निधी खेचून आणलेला आहे. कोणत्याही परिस्थितीत आपल्या मतदार बांधवांना निवडणुकीत दिलेला शब्द पूर्ण करणे हाच ध्यास समोर ठेवून केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध रस्ते विकासाच्या योजनेतून निधी मंजूर करून घेण्याचे आणि कामे वेगाने पूर्ण करण्याचा प्रयत्न सुरू असून उर्वरित रस्त्यांची कामे त्वरित मार्गी लागावी या दृष्टीने त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. त्याचाच भाग म्हणून वरील महाराष्ट्र व कर्नाटक राज्यांना जोडणारे रस्ते आता अधिक मजबूत आणि नवीन होत असल्याने या भागातील प्रवासी आणि मालवाहतुकीस चालना मिळणार आहे. रस्त्यासाठी पाठपुराव्याने निधी मिळाला असल्याने सलगर व उडगी भागातील मतदार समाधान व्यक्त करीत आहेत.

## पुरुष हक्क आयोगाची स्थापना करा

### भुमाता ब्रिगेडच्या तृप्ती देसाईंची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३ एप्रिल-**

राज्यात पुरुष अत्याचाराच्या वाढत्या घटना दुर्दैवी आहेत. अशा घटना थांबवण्यासाठी राज्य सरकारने महिला आयोगाच्या धर्तीवर पुरुष हक्क आयोगाची स्थापना करावी अशी मागणी भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी केली आहे.

तृप्ती देसाई गुरुवारी (ता.३) विठ्ठल रुक्मिणी दर्शनासाठी पंढरपुरात आल्या होत्या. दर्शना नंतर देसाई यांनी माध्यमांशी संवाद साधला. या वेळी बोलताना त्या म्हणाल्या की, अलीकडच्या काळात पुरुषांवरील अत्याचार आणि अन्यायाच्या घटना वाढल्या आहेत. त्यामुळे पुरुष हक्क आयोगाची मागणी केली आहे. राज्यातील महिला विविध क्षेत्रात प्रगती करत आहेत. परंतु आता पर्यंत महाराष्ट्रात महिलेला मुख्यमंत्री पद मिळाले नाही. पंकजा मुंडे या मुख्यमंत्री पदाचा आक्रमक चेहरा आहेत. भाजपने पंकजा मुंडे यांना मुख्यमंत्री पद दिले तर आम्ही म हिला म्हणून भाजपचे स्वागत करू असेही देसाई यांनी सांगितले. या बरोबरच राज्यात देशात जातीयवाद वाढत आहे. त्यामुळे जातीयवाद वाढू नये यासाठी केंद्र व राज्य सरकारने योग्य निर्णय घेणे अपेक्षीत आहे. वक्फ बोर्डा संदर्भात केंद्र सरकारने घेतलेला निर्णय हा योग्यच असल्याचे देखील तृप्ती देसाई यांनी सांगितले.

## वटवृक्ष मंदीरात दर्शनाची व्यवस्था उत्कृष्ट

### श्री.स्वामी समर्थांच्या दर्शनानंतर न्यायमुर्ती निवेदीता मेहता यांचे मनोगत

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.३ एप्रिल**

श्री स्वामी समर्थांचे मूळस्थान असलेले येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान हे स्वामींचे वास्तव्य असलेले जागृत स्थान आहे. स्वामी समर्थांच्या भक्तीतून अनेक भाविकांना विविध माध्यम ातून स्वामींच्या आशीर्वादाची प्रचिती येत आहे. स्वामींचे हे आशीर्वाद स्वामी दर्शनाच्या माध्यमातून भाविकांना तात्काळ पुरविण्याचे काम श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीचे प्रमुख महेश इंगळे हे अत्यंत सेवाभावी वृत्तीने सांभाळत आहेत, म्हणून भाविकांसाठी वटवृक्ष मंदीरात स्वामी दर्शनाची व्यवस्था उत्कृष्ट पध्दतीची असल्याचे मनोगत मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाचे माननीय न्यायमुर्ती निवेदीता मेहता यांनी व्यक्त केले. ते गुरुवारी येथील श्री.वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरास परिवार सदस्यांसह भेट देवून श्री.स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या म ार्गदर्शनाखाली त्यांचे सुपुत्र प्रथमेश इंगळे यांनी न्यायमुर्ती निवेदीता मेहता यांचा श्री.स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी न्यायमुर्ती निवेदीता मेहता बोलत होत्या. पुढे बोलताना मेहता यांनी श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीची ही निस्वार्थ सेवा म्हणजे उल्लेखनीय बाब असल्याचे मनोगतही व्यक्त केले. यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, प्रसाद सोनार, गिरीश पवार, श्रीकांत म लवे, विपुल जाधव, दर्शन घाटगे, धनराज स्वामी, तुषार मोरे आदींसह भाविक भक्त उपस्थित होते.



## वैराग येथे क्षमता वृद्धी प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा**
**वैराग दि ३ एप्रिल**

सर्जापुर (ता. बार्शी) येथील जय जगदंबा परिवार संचालित सर्व शैक्षणिक संकुलातील सर्व शिक्षकांना शिक्षक क्षमता वृद्धी संस्था अंतर्गत प्रशिक्षणाची सुरुवात करण्यात आली आहे.प्रशिक्षण वर्गाचे उदघाटन अध्यक्ष डॉ कपिल कोरके यांच्या हस्ते करण्यात आले .सदरचे प्रशिक्षण सलग सात दिवस चालणार आहे .

पहिल्या दिवशी दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे माजी प्राचार्य हनुमंत जगताप यांनी राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२५ तर प्रा डॉ गणेश मुडेगावकर यांनी शिक्षक प्रशिक्षण विषयस्तर प्रश्न निर्मिती याविषयी म ार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवशी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था वेळापूरचे अधिव्याख्याता डॉ प्रभाकर बुधाराम यांनी राज्य अभ्यासक्रम आराखडा तर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चपळगाववाडीचे शिक्षक तुकाराम जाधव यांनी अभ्यासक्रम , पाठ्यक्रम आणि अध्ययन - अध्यापन याविषयी मार्गदर्शन केले. या शिक्षक क्षमतावृध्दी प्रशिक्षणात जगदंबा बहुउद्देशीय संस्था, जय भवानी वैराग , जय कालिका माता पानगाव,श्री स्वामी समर्थ वैराग ,अमर ज्योती सोलापूर येथील दोनशे शिक्षक सहभागी झाले आहेत.

> शिक्षण विभागाच्या वतीने शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण २०२५ चे प्रशिक्षण परीक्षेच्या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आले होते त्यामुळे शिक्षकांना प्रशिक्षण कालावधीत योग्यरीत्या रसग्रहण करता आलेले नाही त्यामुळे जय जगदंबा परिवारातील सर्व शिक्षक बांधव हे विद्यार्थ्यांना उच्चतराचे शिक्षण मिळावे म्हणून सदर प्रशिक्षण वर्गाचे आयोजन संस्थेच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे
>
> **- डॉ कपिल कोरके, अध्यक्ष, जय जगदंबा परिवार**

> शिक्षण विभागाच्या वतीने शिक्षकांसाठी शिक्षक क्षमता बुद्धी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केलेले होते परंतु एखाद्या खाजगी शैक्षणिक संस्थेने आपल्या संस्थेतील शिक्षकांच्या बाबतीत सदर शिबिर आयोजित करण्याचा हा महाराष्ट्रातील पहिलाच प्रयोग आहे आणि हा अतिशय कौतुकास्पद आहे.
>
> **- डॉ प्रभाकर बुधाराम, अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वेळापूर**

## मंद्रूपमध्ये टाळ मृदंगाच्या गजरात दिंडी मिरवणूक

**मंद्रूप,दि.३ एप्रिल-**

मंद्रूप येथील जय हनुमान भजनी मंडळ आणि मंद्रूप ग्रामस्थांच्या वतीने पारंपरिक पायी दिंडी सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडला. विठ्ठल-रुक्मिणीच्या पालखीची मिरवणूक, टाळ-मृदंगाचा गजर आणि ज्ञानोबा-तुकाराम च्या जयघोषाने संपूर्ण परिसर भारावून गेला.

दिंडीत सहभागी वारकरी भगव्या पताका घेऊन पारंपरिक धोतर, उपरणे आणि पांढरी टोपी अशा वेशभूषेत सहभागी झाले होते. महिलांनी नऊवारी साडी नेसून, गळ्यात तुळशीम ाळ घालून आणि डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन पारंपरिक वेशभूषेची शोभा वाढवली. महिलांनी फुगड्या घालत आनंद व्यक्त केला, तर लहान मुलांनीही उत्साहाने सहभाग नोंदवला. यावेळी वारकऱ्यांनी हरी मुखे म्हणा आणि पुंडलिक वरदा हरी विठ्ठल अशा पारंपरिक भजनांचा गजर केला. ग्रामस्थांनी टाळ्या वाजवत आणि अभंग गात दिंडीत उत्साहाने सहभाग घेतला.ग्रामस्थांनी विविध ठिकाणी फुलांची उधळण करून दिंडीचे स्वागत केले. काही ठिकाणी वारकऱ्यांसाठी पाणी आणि प्रसाद वाटपाचीही व्यवस्था करण्यात आली होती.



# टोळी मुकादमांविरोधात आता कठोर कारवाई होणार

### उपमुख्यमंत्र्यांच्या बैठकीत निर्णय;आमदार अभिजीत पाटील यांनी अधिवेशनात मांडला होता प्रश्न

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.३ एप्रिल -**

साखर उद्योगातील ट्रॅक्टर मालकांची फसवणूक करणाऱ्या ऊस तोडणी टोळी मुकादमांविरोधात कठोर कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने ठोस पावले उचलली आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत या संदर्भात महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला.

मुंबईत पार पडलेल्या या बैठकीस सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आमदार अभिजीत पाटील, गृह, नियोजन, वित्त, सामाजिक न्याय, कामगार विभागांचे प्रधान सचिव, साखर आयुक्त, साखर संघाचे अध्यक्ष आणि इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते. या निर्णयामुळे ट्रॅक्टर मालकांना न्याय मिळेल आणि साखर उद्योग अधिक पारदर्शक होईल. टोळी मुकादमांच्या फसवणुकीला आळा घालण्यासाठी हा कायदा महत्त्वाचा ठरेल.



#### वाहन मालकांचे संरक्षण

टोळी मुकादमांच्या बोगस करारांम ुळे वाहन मालकांचे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी कायदेशीर संरक्षण देण्याच्या उपाययोजना केल्या जातील.

#### फसवणूक करणाऱ्या मुकादमांविरोधात गुन्हे दाखल करणे

ऊस वाहतूक मालकांची फसवणूक करणाऱ्या ऊसतोड मुकादमांविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करून कारवाई करण्याचे परिपत्रक काढण्यात येईल.

#### फसवणूक करणाऱ्या मुकादमांची यादी जाहीर करणे

फसवणूक करणाऱ्या टोळी मुकादमांची यादी जाहीर करून इतरांना सावध करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

#### कठोर कायद्याची निर्मिती

टोळी मुकादमांच्या फसवणुकीला आळा घालण्यासाठी नवीन कायदा तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अनेक वेळा फसवणुकीचे गुन्हे दाखल होऊनही आरोपी सुटतात आणि पुन्हा फसवणूक करतात. या पार्श्वभूमीवर, नवीन कायद्याद्वारे कठोर कारवाई केली जाईल.

#### समितीची स्थापना

साखर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीत कामगार, सामाजिक न्याय, गृह विभाग, गोपीनाथ मुंडे कामगार मंडळाचे वरिष्ठ अधिकारी, ट्रॅक्टर मालक, आमदार, साखर कारखान्यांचे चेअरमन यांचा समावेश आहे. ही समिती एक महिन्याच्या आत अंतिम निर्णय घेईल.

#### ऊसतोड कामगारांची नोंदणी

गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार मंडळाच्या माध्यमातून काम गारांची नोंदणी एक महिन्याच्या कालावधीत करण्यात येईल, ज्यामुळे कामगारांना ओळखपत्रे देण्यात येतील.

## संक्षिप्त वृत्त



### पोलिसांच्या नूतन वाहनांना पालकमंत्र्याच्या हस्ते हिरवा कंदील

**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत शासकीय निधीतून सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयाला देण्यात आलेल्या ११ वाहनांच्या लोकार्पण समारंभात पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते नुतन वाहनांचे पूजन करण्यात येऊन हिरवा ध्वज दाखवून रवाना करण्यात आले. यावेळी आ. देवेंद्र कोठे, पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त अजित बोऱ्हाडे, विजय कबाडे, नरेंद्र काळे, अमोल शिंदे, पोलिस अधिकारी उपस्थित होते.



### छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीला पालकमंत्री गोरे यांनी केले अभिवादन

**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या शिवमुर्तीस पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आ. देवेंद्र कोठे, पद्माकर काळे, सुशिल बंदपट्टे, शहाजी पवार, मतीन बागवान, सुभाष पवार, श्रीकांत घाडगे, दत्तात्रय मुळे, विजय भोईटे, विजय पुकाळे आदी उपस्थित होते.



### ह.दे. प्रशालेतील नृत्य स्पर्धेत कोंडीची जिजामाता प्रशाला तृतीय

**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

हरीभाई देवकरण प्रशाला आयोजित नृत्य स्पर्धेत महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ संचालित जिजामाता प्रशाला कोंडी येथील इयत्ता आठवी मधील विद्यार्थिनींनी तृतीय क्रमांक पटकावला. त्यांचे संस्थापक माजी आमदार निर्मलाताई ठोकळ व संस्थेचे अध्यक्ष सचिन भैय्या ठोकळ, सचिवा शिल्पाताई ठोकळ, मुख्याध्यापक उदय जाधव यांनी कौतुक केले. या नृत्यासाठी वर्ग प्रतिनिधी स्नेहल जगन्नाथ शिंदे बाह्य स्पर्धाप्रमुख सारंग पाटील व विजयकुमार लांडगे यांनी परिश्रम घेतले.

# शासकीय कार्यालयात महिलांसाठी शौचालय अन् शाळेच्या प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे लावा

## पालकमंत्री गोरे यांच्या जिल्हा प्रशासनाला सूचना

- १०० दिवसच नाहीतर लोकांना अविरतपणे सेवा द्या
- जिल्ह्यातील ग्रामसेवक व तलाठ्यांवर नियंत्रण ठेवावे
- खरेदी केलेल्या औषधींच्या विनियोगाची तपासणी करावी
- पाणी टँकर मागणी आल्यास तत्काळ मंजुरी द्यावी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

जिल्ह्यातील प्रत्येक शासकीय कार्यालयात महिलांसाठी शौचालयाची स्वतंत्र व्यवस्था तात्काळ करावी. तसेच जिल्हा परिषदेच्या प्रत्येक शाळेच्या वर्ग खोलीत सीसीटीव्ही कॅमेरे बसवून घ्यावेत. या दोन्ही कामांसाठी नियोजन समितीच्या माध्यमातून पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती ग्रामविकास तथा पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित विविध विभागाच्या आढावा बैठकीत पालकमंत्री जयकुमार गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी आमदार समाधान आवताडे, आमदार देवेंद्र कोठे, आमदार राजू खरे, प्रभारी जिल्हाधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलिस शहर आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, पोलीस शहर उपायुक्त दिपाली काळे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर,जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता धीरज साळे, महावितरणचे अधीक्षक अभियंता सुनील माने, मनपाचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख दादासाहेब घोडके, जिल्हा मृद व जलसंधारण अधिकारी दयासागर दामा यांच्यासह सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.



### मंजूर निधी मिळविण्यासाठी महिन्यात कामाच्या याद्या द्याव्यात

जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ अंतर्गत जिल्ह्याला ९३४ कोटी २८ लाखाचा निधी मंजूर आहे. तरी जिल्ह्यातील सर्व शासकीय यंत्रणांनी पुढील एका महिन्याच्या काळात मंजूर निधी अंतर्गत सर्व कामांच्या याद्या जिल्हा नियोजन समितीला सादर कराव्यात, त्यानंतर आलेल्या कामांच्या याद्यावर विचार केला जाणार नाही याची संबंधित यंत्रणा प्रमुखांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले. पंढरपूर देवस्थान विकास आराखडा अंतर्गत ७३ कोटी ४५ लाखाचा निधी मंजूर होता; त्यानुसार विठ्ठल मंदिराच्या जतन व संवर्धन कामे आषाढी वारी पूर्वी पुरातत्व विभागाने पूर्ण करून घ्यावीत, अशी सूचना त्यांनी केली. तर दर्शन मंडप व स्काय वॉक, श्री संत नामदेव महाराज स्मारक श्री महात्मा बसवेश्वर यांच्या स्मारकाच्या अनुषंगाने स्वतंत्र बैठक नियोजन विभागाने आयोजित करावी, असेही त्यांनी निर्देशित केले.

### टंचाईच्या काळात मागणी येताच पाणी टँकर द्या

टंचाईच्या परिस्थितीनुसार जिल्ह्याची सद्यस्थिती माहिती घेऊन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सर्व संबंधित यंत्रणांना टंचाईच्या काळात कोणालाही पाण्याची कमतरता पडणार नाही या अनुषंगाने कार्यवाही करावी, अशी सूचना करून एखाद्या गावातून पाण्याच्या टँकरची मागणी आल्यास संबंधित उपविभागीय अधिकारी यांनी मागणीप्रमाणे तात्काळ तपासणी करून आवश्यकतेप्रमाणे टँकरला मंजुरी द्यावी असेही त्यांनी सांगितले. मोहोळ तालुक्यातील ११ गावांना पाणीटंचाई जाणवत असून त्या ठिकाणी टँकरची मागणी केलेली आहे. त्याप्रमाणे संबंधित उपविभागीय अधिकाऱ्यांनी त्वरित तपासणी करून पुढील कार्यवाही करावी, असेही निर्देश त्यांनी दिले

पालकमंत्री गोरे पुढे म्हणाले की, शंभर दिवस कृती आराखड्या अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय तसेच तहसील कार्यालयात शौचालयाची स्वतंत्र व्यवस्था झालेली दिसून येते परंतु जिल्हा परिषद व अन्य राज्यस्तरीय शासकीय कार्यालय तसेच जिल्हा तालुका स्तरावरील तसेच गाव पातळीवरील प्रत्येक शासकीय कार्यालयात महिलांसाठी शौचालयाची स्वतंत्र व्यवस्था तात्काळ करून घ्यावी.

### शासनाकडून दिलेल्या निधीचा विनियोग व्हावा

जिल्हाधिकारी कार्यालयाप्रमाणे जिल्हा परिषद व पंचायत समिती २०२४-२५ मध्ये नियोजन समिती वरून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांना सहा कोटी तर जिल्हा शल्य चिकित्सक यांना सात कोटीचा निधी औषधी खरेदीसाठी उपलब्ध करून दिलेला होता. संबंधित आरोग्य यंत्रणेंनी औषधी खरेदी केल्यानंतर त्याचा वापर योग्य पद्धतीने झाला आहे की नाही? याबाबत जिल्हाधिकारी यांनी संबंधित उपजिल्हाधिकारी यांच्यामार्फत त्वरित तपासणी करावी, असेही त्यांनी निर्देश दिले. प्रत्येक ग्रामीण रुग्णालय तसेच जिल्हा प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांसाठी चांगल्या सुविधा आहेत का? व शौचालय आहेत का? याची तपासणी करावी, असेही त्यांनी सांगितले.

यासाठी संबंधित विभागांनी तात्काळ सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत नियोजन समितीला प्रस्ताव पाठवावेत. जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही प्रत्येक वर्ग खोलीमध्ये बसवण्याबाबत शिक्षण अधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा. शिक्षण अधिकाऱ्यांच्या दालनामध्ये जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांचे सीसीटीव्ही फुटेज पाहता येईल, अशी स्वतंत्र यंत्रणा तयार करावी. यासाठी आवश्यक तेवढा निधी नियोजन समितीकडून उपलब्ध करण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले.

# हरिभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालयाचे कार्य अभिमानास्पद

## उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल -**

अभ्यासात चिकाटी, सातत्य, सकारात्मक विचार केल्यास प्रत्येक क्षेत्रात यशाचे शिखर गाठू शकतो. हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाने दिलेली संस्काराची शिदोरी माझ्या आयुष्यात महत्वाची ठरली असून आजच्या विद्यार्थ्यांनी सुद्धा गुरुप्रती श्रद्धा ठेवून आयुष्यात यश संपादन करावे. विशेषतः आज स्पर्धा परीक्षेसह अन्य परीक्षेत विद्यार्थिनी बाजी मारत आहेत. एका दृष्टीने भारत उत्थानात त्यांची भूमिका महत्वाची आहे असे प्रतिपादन हरिभाई देवकरण क. महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त घेतलेल्या जिल्हास्तरीय विविध स्पर्धांच्या पारितोषिक वितरण प्रसंगी माजी विद्यार्थी व महाराष्ट्र राज्य उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केले.




सुरुवातीला शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन, प्राचार्या दीपा फाटक, प्रशालेचे उपमुख्याध्यापक रवींद्र पानसरे, प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक, कार्याध्यक्ष डॉ. दिलीप फुटाणे यांच्या उपस्थितीत प्रतिमा पूजन करण्यात आले. प्रास्ताविक भाषणात प्रशालेचे ज्येष्ठ पर्यवेक्षक हणमंत मोतीबने यांनी संस्थेच्या विकासाचा आढावा घेतला व उपस्थितांचे स्वागत केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी करून दिला. पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचे यादी वाचन क्रीडा विभाग प्रमुख प्रा. प्रमोद चुंगे यांनी केले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांनी आपल्या जीवनाचा प्रवास सांगत विद्यार्थ्यांना यशाचा कानमंत्र दिला. याप्रसंगी शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. प्राचार्या दीपा फाटक यांनी विद्यार्थ्यांना उत्तुंग ध्येय गाठण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. वैभव दुध्याल यांनी केले तर पर्यवेक्षक व एन. सी. सी. विभाग प्रमुख मेजर बनसोडे बी. डी. यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी पर्यवेक्षक एस. एस. कुंभार, ए. सी. राऊत, औदुंबर सर्वगोड, महेंद्र रणधीर, लकण्णा कमळे, मारुती शहाणे, गणेश नेवरे, माजी शिक्षक, पर्यवेक्षक सुहास शेडजाळे, उपप्राचार्य रेवणसिद्ध व्हनमराठे , बी. जी. पाटील, प्रा. ढाकणे यांच्या सह जिल्ह्यातील अनेक प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक, विद्यार्थी, पालक, हितचिंतक उपस्थित होते.

# जिल्ह्यात सायंकाळी विजांचा कडकडाट, आभाळाची दाटी

**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**



सोलापूर शहर आणि जिल्ह्याच्या काही भागात गुरूवारी सकाळी ११ वाजून २२ मिनिटांनी भुकंपाचा सौम्य धक्का जाणवला तर सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास अवकाळी पावसाच्या जोरदार सरी पडल्या. आभाळाचा कडकडाट, वादळी वारे आणि अवकाळी पावसामुळे वाहनधारक आणि शेतकरी बांधवांची चांगलीच पळापळ झाली.

गेल्या काही दिवसांपासून आभाळ येत असून, गुरूवारी ४ नंतर अचानक आभाळ भरून आले आणि विजांचा कडकडाट, वादळी वारे आले आणि पुन्हा अवकाळी पाऊस आला. शहरापेक्षा उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर तालुक्यासह इतर काही भागात या पावसाने जोरदार हजेरी लावल्याची माहिती आमच्या वार्ताहरांनी कळविली. या पावसामुळे रब्बी हंगामातील काढणीस आलेली पिके, आंबा आणि द्राक्ष पिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती जाणकार शेतकरी वर्तवित आहेत. आभाळी वातावरणामुळे सोलापूरचे तापमानही ३८.५ अंश सेल्सियस इतके होते. एकंदरीत, आज सोलापूरकरांनी भुकंप आणि अवकाळी पावसाचा अनुभव घेतला.



# गीतापाठाच्या नादमाधुर्याने सिध्देश्वर मंदीरात नवचैतन्य

## मुंबईच्या 300 साधकांनी केले पठण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.३ एप्रिल -**

कल्याण (मुंबई) येथील श्रीगुरुकुलम न्यास संस्थेतर्फे भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतपर्वानिमित्त हुतात्म्यांच्या जन्म किंवा कर्मस्थानी सामुदायिक श्रीभगवदगीतापाठ यज्ञ (सामुहिक संपूर्ण गीता पठण) करण्याच्या उपक्रमांतर्गत बुधवारी दि.२ एप्रिल रोजी हुतात्मा नगरी सोलापूर येथे देऋब्रा शिक्षणोत्तेजक संस्थेच्या सहकार्याने सोलापूरचे ग्रामदैवत सिध्देश्वर मंदीरात सामुहिक संपूर्ण गीता पठण कार्यक्रम घेण्यात आला. ३०० साधकांच्या गीतापठणातून मंदीरात नवचैतन्य निर्माण झाले होते.

या कार्यक्रमाची सुरवात श्रीगुरूकुलम न्यासाच्या अध्यक्षा मंजिरी फडके यांच्या हस्ते झाली. यावेळी मंदीर समितीचे ट्रस्टी ॲड.बाबूराव पाटील, श्रीगुरूकुलम न्यासाचे उपाध्यक्ष अनंत दातार, संध्या पटवर्धन, कोषाध्यक्ष स्मिता मिर्जी, सदस्या निलांबरी जोशी, अनघा सोमण, मंजूषा निवाटणे, देऋब्रा संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर, कार्यवाह श्याम जोशी, उपाध्यक्ष विजय कुलकर्णी, दत्तात्रय आराध्ये, खजिनदार सतीश पाटील, सहकार्यवाह डॉ. नभा काकडे, रंगनाथ जोशी, युवाध्यक्ष सुशांत कुलकर्णी, महिलाध्यक्षा हेमा चिंचोळकर, किशोर दुधगीकर, गिरीश कुलकर्णी आदीसह ३०० साधक उपस्थित होते. यावेळी श्रीगुरूकुलम न्यासाच्यावतीने सिध्दश्वर मंदीर समितीस पाच हजार रूपयांची देणगी देण्यात आली. श्री गुरूकुलम न्यास, मंदीर समिती व देऋब्रा संस्थेकडून सर्व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ॲड पाटील यांनी सिध्देश्वर मंदीर तसेच सिध्दरामेश्वर यात्रेबाबतची माहिती दिली. डॉ. येळेगावकर यांनी स्वातंत्र्यसंग्रामातील सोलापूरचे योगदान याबाबत सविस्तर माहिती दिली. कार्यवाह श्याम जोशी यांनी सूत्रसंचालन केले. त्यानंतर तीन तास श्रीमदभगवतगीता पठणाचा कार्यक्रम झाला.

या गीतापाठामुळे मंदीरातील वातावरण बहारदार होऊन नवचैतन्य पसरले होते. महाआरती तसेच प्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली. देऋब्रा संस्थेतर्फे सर्व साधकांना यावेळी केळी व राजगीरा लाडूच्या प्रसादाचे वाटप करण्यात आले. श्रीगुरूकुलम संस्थेच्या राजश्री देशपांडे (कल्याण) यांनी आभार मानले.

# बँकांनी ‘आरबीआय’च्या स्पीड ब्रेकरचे पालन केल्यास ॲक्सिडेंट टळतात!

## मनोरमा बँकेचे चेअरमन श्रीकांत मोरे यांची स्पष्टोक्ती

## रामनवमीनिमित्त गीत रामायण कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

सहकारामध्ये बँक आणि मल्टीस्टेट को-ऑफ क्रेडिट सोसायटी चालवत असताना रिझर्व्ह बँकेने ठरवून दिलेल्या स्पीड ब्रेकरचे जर पालन केले तर भविष्यात आर्थिक अडचणी (ॲक्सिडेंट) येत नाहीत. यामुळेच बँक आणि मल्टीस्टेट चा ०% एनपीए मध्ये येतो, अशी स्पष्टोक्ती मनोरमा को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन श्रीकांत मोरे यांनी आज (दि. ०३) आयोजित पत्रकार परिषदेत दिली. दरम्यान, ९ मे रोजी मनोरमा बँकेचा वर्धापन दिन असून, या वर्धापन दिनानिमित्त बँकेच्या वतीने प्रसिद्ध गायक अतुल बेले आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा 'गीत रामायण' या कार्यक्रमाचे आयोजन केल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

या पत्रकार परिषदेस मनोरमा मल्टीस्टेटच्या चेअरमन शोभा मोरे, कार्याध्यक्षा डॉ. मिताली मोरे, सीईओ कविता कुलकर्णी, व्हाईस चेअरमन संतोष सुरवसे, कार्याध्यक्षा अस्मिता गायकवाड, सीइओ शिल्पा कुलकर्णी आदिंसह इतरही अधिकारी उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना चेअरमन मोरे म्हणाले की, सलग सात वेळा मनोरमा को-ऑपरेटिव्ह बँकेने ० एनपीए ठेवत मार्च २०२५ मध्ये १०५९.१४ कोटी रुपयाचा मिश्र व्यवसाय केला. तर मनोरमा मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीने मार्च २०२५ पर्यंत ९२५.०४ कोटी रुपयाचा व्यवसाय केला आहे. तर थकबाकी १ टक्केच्या आत आहे. मनोरमा बँक परिवाराने सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक क्षेत्रात सातत्याने २८ वर्षाचे योगदान दिले असून, विशेषतः महिला लघुउद्योग, महिला बचत गट, ग्रामीण शेतकरी दुग्ध व कुटीर उद्योगांना अर्थसाहाय्य दिले असल्याचे मोरे यांनी स्पष्ट केले.

यावेळी बोलताना कार्याध्यक्षा अस्मिता गायकवाड म्हणाल्या की, मनोरमा बँक आणि मल्टीस्टेटच्या माध्यमातून कर्जपुरवठा करून शंभर टक्के एनपीए करण्यात सर्व संचालक, कर्मचारी वर्ग यांचा सिंहाचा वाटा आहे. आम्ही आरबीआयच्या सर्व सुचनांचे पालन करून बँकिंग व्यवसाय करतो. यामुळे लोकांचा आमच्या बँका, मल्टिस्टेटवर बसला आहे आणि त्यांच्या विश्वासार्हतेवरच आमची वाटचाल चालू आहे. तर यावेळी व्हाईस चेअरमन संतोष सुरवसे म्हणाले, ९ मे रोजी बार्शी तालुक्यातील वैराग येथे बँकेची नववी शाखा सुरू होणार असून, हळूहळू आमच्या बँकींग व्यवसायाच्या या रोपट्याचे वटवृक्षात लवकरच रूपांतर होणार आहे.



### महिलांना आर्थिक साक्षर करण्याचा प्रयत्न

मनोरमा क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या माध्यमातून ५०० महिलांना बचत गटाच्या माध्यमातून कर्ज पुरवठा करण्याचा मानस असल्याचे यावेळी चेअरमन शोभा मोरे यांनी सांगितले. इतकेच नाहीतर महिलांना गाई, शेळ्या, पिठगिरणी व इतर लघुउद्योगास मदतीचा हात देवून त्यांना आर्थिक साक्षर करण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत.

**- शोभाताई मोरे मल्टिस्टेट चेअरमन**

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## भीम प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदी वीरेंद्र हिंगमिरे यांची निवड



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल -**
भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त भीम प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदी मा. विरेंद्र विश्वनाथ हिंगमिरे यांची सलग सहा वेळा एकमताने निवड करण्यात आली.

याप्रसंगी संस्थापक अध्यक्ष बाबा बाबरे यांच्या उपस्थितीत निवड करण्यात आली. या बैठकीत सचिव अकबर शेख, उपाध्यक्ष ॲड. विशाल मस्के, कार्याध्यक्ष सिद्धांत बाबरे, विधी सल्लागार ॲड. स्वाती मस्के, अमित बाबरे,उषा चव्हाण तसेच भीमराव माने, वैभव लोखंडे, देवघन सौदागर, प्रेम अंकुश,किरण गायकवाड, सिद्धार्थ माने, अजय गायकवाड व पदाधिकारी उपस्थित होते.

## ▶▶ महत्वाचे...

### पैशाच्या व्यवहारातून महावीर चौकात एकास मारहाण

**सोलापूर, दि. ३ एप्रिल -**
पैशाच्या व्यवहारातून शकिल बालेसाब होटगीकर (वय ४२, रा. भूषण नगर, लिमयेवाडी) यांना बुधवारी रात्री ११.३० वाजता महावीर चौकात मारहाण करण्यात आली.शकिल आणि दत्तात्रय सुरेश कट्टीमणी यांच्यात पैशांचा व्यवहार आहे. याच व्यवहारातून बुधवारी रात्री ११.३० च्या सुमारास शकिल आणि दत्तात्रय यांच्यात वाद झाला. या वादातून दत्तात्रय याने शकिल यांना लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात सर्वांगास मुकामार लागल्याने गुरुवारी दुपारी १ वाजता स्वत: शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### विडी कामगार महिलेचे गंठण धूम स्टाईलने लंपास

**सोलापूर, दि. ३ एप्रिल -**
विडी कामगार महिलेच्या गळ्यातील साडे तीन तोळ्याचे गंठण दुचाकीवरून आलेल्यां दोघांनी हिसका मारून लंपास केले. यावरून अज्ञात चोरट्यांविरुध्द एमआयडीसी पोलिसांत बुधवारी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याबाबत अंबिका श्रीनिवास चिलवेरी (वय ४२



रा. ३९६ बी ग्रुप विडी घरकुल सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. ही घटना बुधवार सकाळी सव्वा अकरा च्या सुमारास विडी घरकुल परिसरात घडली आहे. फिर्यादी या विडी काम गार महिला आहेत.त्या विड्या बनवण्यासाठी लागणारा कच्चा माल घेण्यासाठी किरण ठाकुर विडी कारखान्यात गेल्या होत्या. कच्चा माल घेवून बुधवारी सकाळी सव्वा ते साडे अकराच्या सुमारास निघाल्या होत्या. घराकडे जात असताना यशोधरा हॉस्पिटल,माढा विहीर चौक येथे आल्या. अचानक दुचाकीवरून दोघेजण आले. त्यांनी काही कळणाच्या आत महिलेच्या जवळ येवून गळ्यातील दोन लाख १० हजार रुपये किम तीचे साडे तीन तोळे सोन्याचा गंठण जबरदस्तीने हिसका मारून घेत, दुचाकीवरून धूम ठोकली अशी नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. सहायक पोलिस निरीक्षक चंदनशिव पुढील तपास करीत आहेत.

### तरूणाच्या खिशातून २५ हजारांचा मोबाईल लंपास

**सोलापूर, दि. ३ एप्रिल -**
तरूणाच्या खिशातून २५ हजार ९९० रुपयांचा मोबाईल चोरून नेणाऱ्या चोरट्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत प्रसन्नजीत गिरीष सोनकांबळे (वय २३, रा. पद्मावती नगर, शिवाजी नगर, बाळे, सोलापूर) यांनी फिर्याद दाखल केली आहे. २५ मार्च रोजी सायंकाळी प्रसन्नजीत सोनकांबळे हा विजय सेल्स येथे असताना त्याच्या उजव्या खिशातून चोरट्याने २५ हजार ९९० रुपयांचा मोबाईल चोरून नेला. याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार मुलाणी पुढील तपास करीत आहेत.



### मेव्हुण्याकडून भावजीची लाकडी दांडक्याने धुलाई

**सोलापूर, दि. ३ एप्रिल -**
बहिणीला का फसविले असे म्हणत मेव्हुण्याने भावजीला लाकडी दांडक्यांचा प्रसाद देत चांगलीच धुलाई केली. याबाबत विरेश सिद्रामय्या राठीमणी (रा. ६८, कमला नगर, विजापूर रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अवि पवार, राकेश पवार (दोघे रा. कमला नगर, विजापूर रोड, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ एप्रिल रोजी सायंकाळी कमला नगर येथे विरेश राठीमणी हे त्यांच्या पत्नीकडून मोबाईल आणण्यासाठी गेले होते. त्यावेळी तु सोनाली पाठील हिच्यासोबत का राहतो, आमच्या बहिणीला का फसवले असे म्हणून अवि पवार व राकेश पवार या दोन्ही मेव्हुण्यांनी विरेश यांना लाकडी दांडक्याने डोक्यात मारून जखमी केले. तसेच शिवीगाळ करून खल्लास करण्याची धम की दिली. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार सोनार पुढील तपास करीत आहेत.

# पालकमंत्री जयाभाऊंच्या एंट्रीने बाजार समिती निवडणुकीत ट्विस्ट?

## ● फॉर्मुला जुना की नवा रंगली चर्चा; दोन्ही देशमुख, कल्याणशेट्टी, माने, हसापुरेंच्या भूमिकेकडे लक्ष!

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि.३ एप्रिल-**
विक्रमी उलाढालीसाठी राज्यात दुसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीवर एकहाती वर्चस्व राखण्यासाठी जिल्ह्यातील नेते मंडळींनी निवडणुकीची व्यूव्हरचना आखण्यास सुरुवात केली आहे. यंदाच्या निवडणुकीत जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या एन्ट्रीने सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची पंचवार्षिक निवडणूक अधिक रंगतदार होणार आहे. माजी पालकमंत्री तथा बाजार समितीचे माजी सभापती आ. विजयकुमार देशमुख, माजी सहकारमंत्री आ. सुभाष देशमुख, आ. सचिन कल्याणशेट्टी, माजी सभापती दिलीप माने, काँग्रेसचे नेते सुरेश हसापुरे, राजशेखर शिवदारे, बाळासाहेब शेळके या नेत्यांनी मोर्चेबांधणी सुरु केली आहे.

सहकारी संस्थांमधील निवडणुकांमध्ये राजकीय पक्षाच्या चिन्हाऐवजी स्थानिक युती-आघाड्या करून नेते मंडळी मैदानात उतरतात. बाजार समितीवरील प्रशासक राज आता संपणार असून बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीचे बिगुल वाजल्यानंतर आता खऱ्या अर्थाने राजकीय सारीपाटास वेगाने सुरुवात झाली आहे. संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून राहिलेल्या सोलापूर बाजार समिती निवडणुकीची अर्ज छाननी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. आता राजकीय घडमोडीला मोठ्या प्रमाणात वेग येणार आहे. बाजार समितीच्या निवडणुकीपासून अलिप्त राहण्याचे संकेत देतानाच आ. सुभाष देशेमुख यांनी भाजपाच्या कार्यकर्त्यांना घेवून निवडणुकीच्या मैदानात उतरण्याचे सूतोवाच केले आहे. तर आ. विजयकुमार देशमुख देखील लवकरच या मैदानात दिसण्याची शक्यता आहे. बाजार समितीचे माजी सभापती दिलीप माने यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांना आपल्या निवासस्थानी आमंत्रित करून भोजनाचा आस्वाद घेत निवडणूक रंगतदार होणार असे संकेत दिले आहेत.

वर्षेनुवर्षे सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीवर काँग्रेसचे एकहाती वर्चस्व होते. परंतु गेल्या काही वर्षात भाजपाने केंद्र, राज्यासह सहकारी संस्थांवर देखील वर्चस्व राखायला सुरुवात केली आहे. पक्षचिन्ह बाजूला ठेवून जिल्हा व तालुका पातळीवरील राजकीय वर्चस्व जपण्यासाठी लोकप्रतिनिधी स्थानिक नेतेमंडळींना घेवून बाजार समितीच्या निवडणुकीत मोर्चेबांधणी करीत असले तरी या निवडणुकीला पक्षीय राजकारणाचा वास येतोच. बाजार समितीच्या गत निवडणुकीवेळी जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री आ. विजयकुमार देशमुख आणि राज्याचे तत्कालीन सहकारमंत्री आ. सुभाष देशमुख यांच्या पॅनलमध्ये ही निवडणूक रंगली आणि पालकमंत्र्यांनी बाजार समितीवर वर्चस्व राखले होते. यंदा मात्र जिल्ह्याला उपरा पालकमंत्री असल्याने जिल्ह्यातील राजकारणाबाबत त्यांची भूमिका काय असणार हे औत्सुक्याचे ठरणार आहे. भाजपाच्या आमदारांमधील बेकीवर तोडगा काढत पालकमंत्री त्यांच्यात एकी घडवून काही चमत्कार करतात का? हे महत्वाचे आहे. तर दोन्ही देशमुख या निवडणुकीत एकत्र दिसणार का? आ. कल्याणशेट्टी यांना सोबत घेत भाजपाच्या आमदारांनी एकीची मोट बांधल्यास बाजार समितीवर भाजपाचे कमळ फुलू शकते. परंतु हा चमत्कार घडण्यासाठी सर्व नेत्यांनी एकत्र येणे गरजेचे आहे.

आता सोलापूर शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे यांचीही भूमिका महत्वाची ठरणार आहे. पालकमंत्र्यांच्या नेतृत्वात भाजपाचे आमदार एकत्र येत भाजपाच्या कार्यकर्त्यांना बाजार समितीवर सत्तेची संधी देणार का हे देखील पहावे लागणार आहे. आ. सुभाष देशमुख यांनी जाहीरपणे सांगितले की, भाजपासाठी सर्व काही आणि कार्यकर्त्यांसाठीच ताकतीने ही निवडणूक लढविणार आहे. हीच भूमिका पालकमंत्री आणि भाजपाचे इतरही आमदार घेणार का? याची देखील सर्वांना उत्सुकता आहे. असे न झाल्यास काँग्रेसच्या नेत्यांना सोबत घेवून भाजपाचा एक गट पुन्हा बाजार समिती ताब्यात घेण्यासाठी रणिनिती आखणार का हे देखील पहावे लागणार आहे. विधानसभा निवडणुकीपासून जिल्ह्यात काँग्रेसला उतरती लागली असून बाजार समिती जर का संपूर्ण भाजपाची झाली तर काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांना मोठा झटका बसणार आहे. जर का भाजपा विरुध्द काँग्रेस अशी लढत जर बाजार समितीमध्ये लागली तर काय होणार, याचीही चर्चा रंगली आहे. हे सर्व नेते एकत्र येत जागा वाटून घेत निवडणुका टाळून ही निवडणूक बिनविरोध करतील का ही देखील अपेक्षा राजकीय वर्तुळातून व्यक्त होत आहे. बाजार समिती निवडणुकीचे चित्र लवकरच स्पष्ट होणार आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीचा केंद्रबिंदू हा शेतकरी आहे. परंतु त्या शेतकऱ्याला बाजार समितीच्या माध्यमातून न्याय मिळतो का? हा मुद्दा यंदाच्या निवडणुकीत चर्चीला जाणे गरजेचे आहे. बाजार समितीवर सत्तेसाठी राजकारण करणे आणि निवडणुकीत साम-दाम-दंड वापरत सत्ता काबिज करणे आणि शेतकरी हिताकडे दुर्लक्ष करणे असे होणे दुर्दैवी ठरेल. बाजार समितीत शेतीमाल घेवून येणारे शेतकरी, व्यापारी, आडते, हमाल-मापाडी या सर्वांना योग्य न्याय देण्यासाठी बाजार समितीच्या सत्तेचा वापर होणे गरजेचे आहे.

### दिलीप मानेंनी मित्रासाठी केला आमरस-पुरीचा बेत!

आमरस छान झाला आहे, गोड आणि तेवढाच टेस्टी आहे...असे म्हणत राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी त्यांचे जुने सहकारी तथा माजी आमदार दिलीप माने यांच्या घरी भोजन केले. यावेळी माने यांनीही आमरस टेस्टी आहे तर... आणखीन घ्या की राव...असा आग्रह करीत सोलापूरकरांच्या वतीने पालकमंत्र्यांचे चांगलेच आदरातिथ्य केले. या स्नेहभोजनानंतर बाजार समिती निवडणूक आणि इतरही राजकीय घडामोंडींवर गप्पा रंगल्याची चर्चा दिवसभर राजकीय वर्तुळातून होती. राष्ट्रवादीचे मोहोळचे माजी आमदार राजन पाटील, बार्शीचे ठाकरे शिवसेनेचे आम दार दिलीप सोपल यांची उपस्थिती लक्षवेधक होती.

आमरसामुळे सर्वपक्षीय गोडवा पाहायला मिळाला.



जेवणानंतर पत्रकारांनी आमदार सोपल यांना आमरस गोड होता का? असे विचारले असता आमरस हा गोडच असतो परंतु हा आमरस अधिकच टेस्टी होता, देवगड हापूसचा होता ना? असे नेत्यांनी म्हणताच उपस्थितांमध्ये हशा पिकला.

# बनावट व्हॉटसॲप ग्रुपद्वारे ४२ लाखांची फसवणुक

● सायबर पोलीसांनी तपास करून मिळवून दिली रक्कम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल -**
बनावट व्हॉटसॲप ग्रुपच्या माध्यमातून ४२ लाख १० हजार रुपयांची फसवणुक प्रकरणी सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या सायबर पोलिस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी तपास करून फसवणुक झालेली पूर्ण रक्कम परत मिळवून दिली.



मंद्रुप पोलीस ठाण्यात १५ ऑक्टोबर२०२४ रोजी ऑनलाईन फसवणुकीबाबत गुन्हा दाखल झाला आहे. या गुन्हयातील तक्रारदार हे व्यवसायिक असुन त्यांना मोतीलाल ओस्वाल इन्वेस्ट क्लब या बनावट व्हॉटसअप ग्रुपच्या ॲडमिन यांनी संपर्क साधुन त्यांचा विश्वास संपादन केला होता. ८ सप्टेंबर २०२४ ते २१ सप्टेंबर २०२४ या कालावधीत तक्रारदार यांची अनोळखी व्यक्तीने सुमारे ४२ लाख १० हजार रुपयांची फसवणुक केली होती.

सदर गुन्हयाचा तपास करताना सायबर पोलिस ठाण्याच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यांनी सुसंगत व तांत्रिक तपास करुन, आरोपीच्या मोबाईल क्रमांकाची, व्हॉटसअप ग्रुपची, बँक खात्यांची माहिती मिळवुन तक्रारदार यांचे तब्बल ४१ लाख १० हजार रुपये इतकी रक्कम तक्रारदार यांना परत मिळवुन दिली. या गुन्ह्यातील आरोपी अद्याप फरार आहेत. या कामगिरीसाठी पोलिस अधिक्षकांनी सायबर पोलिस ठाण्याच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा बक्षिस देऊन गौरव केला. ही कामगिरी पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलिस अधिक्षक प्रितम यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाणेचे पोलिस निरीक्षक विकास दिंडुरे, सोलापूर तालुका पोलिस ठाण्याचे निरीक्षक राहुल देशपांडे, सहायक पोलिस निरीक्षक रोहिदास पवार यांच्या पर्यवेक्षणाखाली महिला पोलीस अंमलदार ज्योती फुलारी, हवालदार अभिजीत पेठे, जुबेर तांबोळी, युसुफ पठाण, व्यंकटेश मोरे, महिला पोलिस कर्मचारी अंबरकर, पोलिस शिपाई स्वप्नील सन्नके, अजित सुरवसे, महिला पोलिस शिपाई रतन जाधव, आशुतोष कुलकर्णी, जहीरान नाईकवाडी यांनी केली.

**ऑनलाईन फसवणुकीसंदर्भात टोल फ्री नंबर १९३० ला तात्काळ संपर्क साधा...**
ऑनलाईन फसवणुकी संदर्भात आपल्या कोणत्याही तक्रारी असल्यास आपण तत्काळ १९३० या टोल फ्री क्रमांकावर किंवा सायबर पोलीस ठाणे सोलापूर ग्रामीण येथे संपर्क साधुन त्यांच्या तक्रारी नोंदवाव्यात, असे आवाहन सोलापूर ग्रामीण पोलिसांच्यावतीने नागरीकांना करण्यात येत आहे.

# पाणी साठवणुकीसाठी नागरिकांनी वळविला ड्रम खरेदीकडे मोर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ एप्रिल-**
सोलापूर शहराचे तापमान दिवसेंदिवस ४१ अंशापलीकडे जात असताना सोलापूरवासियांना रखरखीत ऊन्हा सोबतच पाण्याचा प्रश्न भेडसावत आहे. अशातच शहरातील रंगभवन चौकातून रिक्षाच्या टपावर पाण्याचा ड्रम घेऊन जातानाचे बोलके चित्र दिसून आले.

दरम्यान, सोलापूर शहर जिल्ह्यासाठी वरदायिनी ठरलेल्या उजनी धरणातील पाणी पातळी खालावत असल्याने पाणीपुरवठ्याचा बोजवारा उडत आहे. अशा स्थितीत सहवासीय पिण्याच्या पाण्यासाठी वणवण फिरत असताना सोलापूरकरांनी आता ड्रम खरेदीकडे मोर्चा वळविला आहे. शहरातील विविध रस्त्यांवरून ड्रम घेऊन जाताना नागरिक पहावयास मिळत आहेत. पाण्याचे ड्रम घेऊन जाताना असेच एक बोलके चित्र रंगभवन चौकात दिसून आले. रिक्षाच्या टपावर ड्रम बांधून नागरिक आपल्या घरी ड्रम घेऊन जाताना दिसले. पाण्याचा टप्पा वाढत असल्याने पाणी साठवण्यासाठी नवीन ड्रम खरेदी कडे नागरिक वळालेले आहेत.




**सोलापूर : वाढत्या कडक उन्हाळ्यात सोलापूर शहर वासियांची तहान कशी मिटणार? रंगभवन चौकातून ड्रम रिक्षाच्या टपावर घेऊन जाताना टिपलेले हे छायाचित्र.**

शहराच्या कौतम चौकात खरेदी विक्री व्यवसाय केला जातो. येथे देखील लहान मोठ्या आकाराचे ड्रम विक्रीसाठी ठेवण्यात आले आहेत. यापूर्वी मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध होत होते. पाण्याची साठवणूक मोठ्या प्रमाणात करावे लागत नव्हती. परंतु जास्त उन्हाळा तीव्र होत आहे, तसतशी पाणीटंचाई मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. त्यामुळेच नागरिक जास्तीचे पाणी साठवण्यासाठी ड्रम खरेदी करत आहेत. ड्रमचे दर देखील यापूर्वी आटोक्यात होते. आता मागणी वाढल्याने दरामध्ये देखील थोड्याफार प्रमाणात वाढ झालेली दिसत आहे.

# घरावर दगड मारल्याच्या कारणावरून मारहाण

### १५ जणांवर परस्परविरूध्द गुन्हा

**सोलापूर, दि. ३ एप्रिल -**
घराच्या पत्र्यावर दगड मारल्याने दोन गटात मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी १५ जणांवर परस्पर विरोधी गुन्हे दाखल झाले आहेत. ही घटना ३० मार्चला सायंकाळी ३.४५च्या सुमारास भवानी पेठ, मड्डी वस्ती याठिकाणी घडली आहे.

शुभम अंबादास सरवदे (वय २१, रा. भवानी पेठ,मड्डी वस्ती) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अक्षय, आकाश, गणेश, ज्ञानेश्वर व यशाबाई तिकोटे (सर्व. रा.८३, भवानी पेठ) यांच्यावर गुन्हा नोंदविला आहे. अनिकेत ज्ञानेश्वर तिकोटे (वय २४ रा. घर नं ८३ मड्डी वस्ती) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून जगन्नाथ, विकी, लता व अंबादास बनसोडे, आदित्य सरवदे, गौतम मोरे, अभिषेक चंदनशिवे, प्रणय जाधव, सागर गायकवाड, निखिल थोरात, शुभम सरवदे (सर्व रा. मड्डी वस्ती)यांच्यावर गुन्हा नोंद झाला आहे. पहिल्या घटनेत शुभम सरवदे यास त्यास तु आम्हाला शिवीगाळ करतो का, असे म्हणून आरोपींनी मारहाण केली. आकाश तिकोटे याने फायटरने मारून जखमी केले. अक्षय याने फिर्यादीच्या पोट व डोक्यात मारहाण केली. दुसऱ्या घटनेत फिर्यादी अनिकेत व त्याचे वडील ज्ञानेश्वर, भाऊ आकाश यांनी पत्र्यावर दगड का मारला याचा जाब विचारण्यासाठी घराच्या पाठीमागे राहणाऱ्या निखिल थोरात, शुभम सरवदे यांच्याकडे गेले, आम्हाला जाब का विचारला असे म्हणत मारहाण तसेच फरशीचा तुकडा अनिकेत व आकाश यांच्या डोक्यात मारून जखमी केले आहे. तपास स.पोलिस निरीक्षक गायकवाड करीत आहेत.

# माजी सैनिकाचे घर फोडून १४ तोळ्यांचे सोन्याचे दागिने केले लंपास

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल -**
शहरातील सिव्हील लाईनमधील अनुराधा सोसायटीमधील माजी सैनिकाचे घर फोडून चोरट्याने १४ तोळ्याचे सोन्याच्या दागिने व मोबाईल असा ७ लाख ४० हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. ही घटना गुरुवारी सकाळी उघडकीस आली.

याबाबत मनोहर वसंत शेळके (वय ६२, रा. ए/३/२, अनुराधा सोसायटी, सिव्हील लाईन, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मनोहर शेळके हे माजी सैनिक असून २ एप्रिल रोजी रात्री बाराच्या सुमारास ते घराला आतून कडी लावून बेडरूममध्ये झोपी गेले होते. ३ एप्रिल रोजी पहाटे पाचच्या सुमारास शेळके झोपेतून उठले असता त्यांना घरात चोरी झाल्याचे दिसून आले. चोरट्याने शेळके यांच्या घराच्या बेडरूमचा ग्रिलचा दरवाजा उघडून त्यानंतर लाकडी दरवाजाच्या वर असलेल्या खिडकीतून हात घालून लाकडी दरवाजास आतुन लावलेले हुक काढून बेडरूममध्ये प्रवेश केला. बेडरूममधील टेबलवर असलेल्या चावीच्या सहाय्याने बेडरूममधील



कपाट उघडून त्यातील सोन्याचे दागिने व मोबाईल फोन चोरून नेला. चोरट्याने शेळके यांच्या घरातून ५० ग्रॅम वजनाच्या दोन सोन्याच्या पाटल्या, ४० ग्रॅम वजनाच्या चार सोन्याच्या बांगड्या, ५ ग्रॅम वजनाच्या दोन सोन्याच्या अंगठ्या, ३५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण, ५ ग्रॅमच्या कानातील एक जोड सोन्याच्या रिंगा, ५ ग्रॅम वजनाचे एक जोड कानातील झुमके आणि १५ हजार रुपये किंमतीचा मोबाईल असा ऐवज चोरून नेला.

या घरफोडीबाबत माहिती मिळताच सदर बझार पोलिस ठाण्याच्या तसेच शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली व चोरांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक शिंदे पुढील तपास करीत आहेत.

### वसंत विहार येथे २५ हजारांची घरफोडी

**सोलापूर :** शहरातील वसंत विहार परिसरातील वृध्दाचे बंद घर फोडून चोरट्याने २५ हजारांची रोकड चोरून नेली. ही घटना २ एप्रिल रोजी उघडकीस आली. याबाबत दत्तात्रय भिमराव सोमवंशी (वय




७३, रा. सर्व्हे नं. ४९८, प्लॉट नं. ९८/९९, वसंत विहार, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दत्तात्रय सोमवंशी यांच्या घराच्या बंद दरवाजाचा कडी कोयंडा चोरट्याने कशानेतरी तोडून घरात प्रवेश करून घरातून २५ हजार रुपयांची रोकड चोरून नेली. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार चुंगे पुढील तपास करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०७६

**मज हदयी सदगुरु । जेणे तारिलो हा संसारपुरु ।
म्हणऊनि विशेषे अत्यादरु । विवेकावरी ।।**

माऊलींनी गीतारुपी ज्ञानाचा अनमोल ठेवा मराठी भाषेत आणण्याचे जे कठीण कार्य हाती घेतले, ते कार्य पुर्णत्वाला नेण्यासाठी ऊँकाररुप गणेश तसेच शारदेचे स्तवन केले. अर्थात, कळत नकळत हे कठीण कार्य तडीस नेण्याची जबाबदारी गणेशावर, शारदेवर टाकली. नंतर माऊली सदगुरुकडे वळतात. माऊलींनी येथे गुरु ऐवजी सदगुरु शब्द वापरला आहे. गुरु या शब्दाचा अर्थ अंध:कारातून प्रकाशाकडे नेणारा असा होतो. गुरु हा कोणत्याही क्षेत्रात असावाच लागतो. एखादे अयोग्य कार्य करावयाचे म्हटले तरी ते कार्य सहज व सुलभतनेने कसे करावे हे शिकविण्यासाठी सुध्दा त्या क्षेत्रातील गुरु लागतो. अर्थात, गुरु हा चांगल्या वाईट क्षेत्रात असू शकतो असे म्हटले तर वावगे होणार नाही. पण माऊलींच्या दृष्टीकोनातील गुरुचा अर्थ चुकुनही चुकीच्या कार्यासाठी काढला जाऊ नये म्हणून माऊलींनी सदगुरु असा शब्द वापरला आहे. सदगुरुचे मार्गदर्शन चांगल्याच कार्यासाठी असते म्हणून सदगुरु असा शब्द वापरला असावा.



सद् या शब्दाचा अर्थ सत्य, चांगला, सदाचार ईत्यादी घेतला तरी चालेल. अर्थात, माऊलींचे गुरु हे सदगुरु आहेत. माऊलींनी आपल्या सदगुरुंना हदयात ठेवले आहे. डोक्यात ठेवण्यापेक्षा हदयात ठेवणे महत्वाचे असते. माऊलींचे सदगुरु हे त्यांचे मोठे बंधू निवृत्तीनाथ आहेत. आपल्या जेष्ठ बंधूला सदगुरुचे स्थान देऊन श्रीराम व भरताची आठवण माऊलींनी करुन दिली आहे. माऊलींच्या बंधूप्रेमाचे कौतूक श्रीराम-भरतापेक्षा निश्चितच कमी नाही. आज समाजात अनेक अशा घटना पाहायला मिळतात की सख्खी भावंडे नाशिवंत सत्ता, सपंत्तीसाठी एकमेकांचे खुण करतात. मोठया भावाने लहान भावास काही मार्गदर्शन करण्याचे ठरवले तर त्याला वेडयात काढतात आणि माऊलींकडे पाहिले तर माऊली मोठया भावाला सदगुरु मानतात. असा विरोधाभास माऊलींच्या, या ओवी आधारे मिटून ख-या बंधू प्रेमाची प्रचिती यावी ही अपेक्षा. झाडांच्या मुळांना पाणी घातले तर फांदया, पाने, फुलांना जशी टवटवी येते त्याप्रमाणे आपल्या सदगुरुंना नमन केले तर आपले आचार-विचार टवटवीत होतात. सर्वच नदनदयांचे तीर्थ घेण्यापेक्षा एकटया समुद्राचे तीर्थ घेतले म्हणजे आपोआप सर्व नदयांचे तिर्थ घेतल्या सारखे होते. याप्रमाणे आपल्या सदगुरुंचे नमन म्हणजे सर्व देव-देवतांचे नमन होय असे माऊलींना वाटते. आदिपूजा गुरुनाथा । चाले देवावरी सत्ता ।। हे संत वचन माऊलींनी आपल्या जीवनात प्रत्यक्षात उतरविले आहे. माऊलींच्या ओवीकडे पाहिल्यास असे वाटते की सर्व क्षेत्रातील गुरु हे सदगुरु व्हावेत व असे सदगुरु आपणा सर्वांना लाभावेत आणि अशा सदगुरुंना आपण माऊलींप्रमाणे आपल्या हदयात ठेवावे. सद्गुरुंचे अनन्य साधारण महत्त्व सदैव आपल्या लक्षात असावे.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| **वार : शुक्रवार** | **दिनविशेष - चांगला दिवस, श्री एकवीरादेवी पालखी नाईकबा यात्रा बनपुरी** |
| **दि. ४ एप्रिल २०२५** | |
| **विक्रम संवत् २०८१** | |
| **शके - १९४७** | **....राहू काल....** |
| **संवत्सर - क्रोधी नाम** | **रविवार : दु.४.३० ते ६.००** |
| **मास - चैत्र** | **सोमवार : स. ७.३० ते ९.००** |
| **शु. सप्तमी (२०.१२)** | **मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०** |
| **ऋतु - वसंत** | **बुधवार : दु. १२ ते १.३०** |
| **नक्षत्र - आर्द्रा (२९.१९)** | **गुरुवार : दु. १.३० ते ३.००** |
| **योग - शोभन (२१.४४)** | **शुक्रवार : स.१०.३० ते १२** |
| **करण - गर (०८.५१)** | **शनिवार : स. ९ ते १०.३०** |

### राशीभविष्य

**मेष :** व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही. शक्यतो प्रवास टाळा.

**वृषभ :** नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**मिथुन :** जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क :** आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह :** संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले. शक्यतो प्रवास टाळा.

**कन्या :** लोकांशी संपर्क वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ :** राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक :** उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु :** प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील.

**मकर :** व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

**कुंभ :** सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे.

**मीन :** कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल.

# गणवेशाचा रंग ठरविण्याचा अधिकार शाळा व्यवस्थापनाला



## एक राज्य एक गणवेशचा बोजवारा उडाल्याने निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६पासून मोफत गणवेशाची अंमलबजावणी पूर्वीप्रमाणेच शाळा व्यवस्थापन समितीमार्फत करण्याचा निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने घोषित केला आहे. त्याची रंगसंगती ठरविण्याचा अधिकार हा शालेय व्यवस्थापन समितीला देण्यात आला आहे.

माजी शालेय शिक्षणमंत्री दिपक केसरकर यांनी राज्यातील विद्यार्थ्यांसाठी एक राज्य एक गणवेश अंतर्गत एकाच रंगाचे गणवेश शासनाकडून पुरविण्यात येणार असल्याचे सांगत गणवेश पुरवठा करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु शैक्षणिक वर्ष व संपत आले तरी अद्याप अनेक विद्यार्थ्यांना गणवेश मिळाले नाही. ठेकेदाराच्या चुकीच्या नियोजनामुळे मुलांना गणवेश मिळताना अनेक अडचणी आले. त्यामुळे राज्य सरकारने २ एप्रिल रोजी गणवेश रंग व पुरवठा शासन निर्णयात बदल करून पूर्वीप्रमाणे शालेय व्यवस्थापन समित्यांना गणवेश खरेदीचा अधिकार घोषित केला आहे. केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा अभियानाच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये पहिली ते आठवीमध्ये शिक्षण घेत असलेल्या सर्व मुली, अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील मुले तसेच दारिद्र्य रेषेखालील पालकांची मुले यांना मोफत गणवेश योजनेचा लाभ देण्यात येतो. उर्वरित विद्यार्थ्यांना राज्य शासनाच्या वतीने गणवेश पुरविले जातात. माजी मंत्री केसरकर यांनी एक राज्य एक गणवेश या संकल्पनेनुसार एकसमान एक रंगाचा दर्जेदार गणवेश देण्याबाबत घोषणा केली होती. मात्र संबंधित पुरवठादाराकडून राज्यातील शाळांना कापड पुरविण्यात दिरंगाई झाली. त्यामुळे शिक्षण विभागाकडे मोठया प्रमाणात तक्रार करण्यात आले. शैक्षणिक वर्ष संपत आले तरी गणवेश मिळाले नसल्याने पालकांमधून शिक्षण विभागाबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आले होते.त्याबाबत लोकप्रतिनिधी, मुख्याद्यापक, शिक्षक संघटना व शालेय व्यवस्थापन समिती यांसह विविध क्षेत्रातून मोफत गणवेश योजनेचा लाभ पूर्वीप्रमाणेच विकेंद्रीकरण करून गणवेश खरेदीचा निर्णय शालेय व्यवस्थापन समितीकडे देण्यात यावे , अशी मागणी करण्यात आली. त्यानुसार राज्य शासनाने पूर्वीप्रमाणेच शालेय व्यवस्थापन समितीद्वारे गणवेश खरेदी योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

### चांगले व दर्जेदार गणवेश मिळणार

येत्या शैक्षणिक वर्षापासून पूर्वीप्रमाणे मोफत गणवेश अंमलबजावणीचे अधिकार शालेय व्यवस्थापन समितीला देण्यात आले आहेत. गणवेशाचा रंग ठरविण्याचा अधिकार शाळा व्यवस्थापन समितीला देण्यात आला आहे. हा निर्णय स्वागतार्ह आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना वेळेत चांगले व दर्जेदार गणवेश मिळणार आहे. **-राम गोसावी, अध्यक्ष, शालेय व्यवस्थापन समिती, जिल्हा परिषद शाळा मंद्रुप**

### शिक्षकांना पालकांच्या रोषाला सामोरे जावे लागले

मागील शैक्षणिक वर्षात गणवेश वेळेत मिळाले नाही. त्यामुळे शिक्षकांना पालकांच्या विनाकारण रोषाला सामोरे जावे लागले. येत्या शैक्षणिक वर्षापासून मात्र गणवेशाच्या रंगसंगतीसह कापड निवड व खरेदी करण्याचा अधिकार शालेय व्यवस्थापन समितीला देण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना वेळेत दर्जेदार गणवेश देणे शक्य होणार आहे. **-महेश केवटे, शिक्षक, सोलापूर**

### पालकांना स्वखर्चाने गणवेश विकत घ्यावे लागले

गतवर्षी शैक्षणिक वर्षात अनेक मुलांना गणवेश मिळाले नाही. अनेक मुलांना त्यांच्या शरीरमानानुसार गणवेश न मिळाल्याने गणवेश लवकर खराब झाले. शिवाय त्यामुळे कमी जास्त साईजचे कपडे मिळाले. त्यामुळे अनेक पालकांना स्वखर्चाने गणवेश विकत घ्यावे लागले. शालेय व्यवस्थापन समितीव्दारे गणवेश खरेदी केल्यास मुलांच्या शरीरमानानुसार चांगले कपडे मिळण्यास मदत होईल.
**-सकळेश्वर पुजारी, पालक, मंद्रुप**

# सोलापूर-अजमेर एक्स्प्रेस २८ जूनपर्यंत दर बुधवारी धावणार

## उन्हाळी सुटीच्या पार्श्वभूमीवर आणखी २४ फेऱ्या चालवण्याचा रेल्वे प्रशासनाचा निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ एप्रिल-**

उन्हाळी सुट्यांमध्ये प्रवाशांच्या सोयीसाठी सोलापूर आणि अजमेर दरम्यान अतिरिक्त २४ फेऱ्यांसाठी विशेष रेल्वेगाड्यांच्या सेवा सुरू ठेवण्यात येणार आहे. दर बुधवारी २९ जूनपर्यंत या मार्गांवर एक्स्प्रेस गाडी धावणार आहे.

२६ मार्चपर्यंत धावण्यासाठी सूचित केलेली ०९६२७ या क्रमांकाची अजमेर - सोलापूर साप्ताहिक विशेष आता ९ एप्रिल ते २५ जूनपर्यंत दर बुधवारी धावणार आहे. या गाडीच्या १२ फेऱ्या होतील. २७ मार्चपर्यंत पर्यंत सूचित केलेली ०९६२८ या क्रमांकाची सोलापूर-अजमेर साप्ताहिक विशेष आता १० एप्रिल ते २६ जूनपर्यंत दर गुरुवारी धावणार आहे. या गाडीच्या १२ फेऱ्या होतील.

०९६२७ या गाडीचा ९ एप्रिल ते ३० जून या कालावधीत तर ०९६२८ या गाडीचा १० ते २४ एप्रिल या कालावधीत मार्ग बदलण्यात येणार आहे. अजमेर-जयपूर-सवाई माधोपूर-रतलाम मार्ग ऐवजी अजमेर-चंन्देरीया- नीमच - रतलाम या मार्गे वळवल्या जातील आणि नव्याने वळवलेल्या मार्गावरील पर्यायी थांबे हे बिजयनगर, भीलवाडा, चित्तौडगढ, नीमच आणि मन्दसौर येथे असतील असतील.

# भारत विकास परिषदेच्या अध्यक्षपदी महादेव न्हावकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**



भारत विकास परिषदेच्या अध्यक्षपदी महादेव न्हावकर, सचिवपदी महेश देशपांडे व कोषाध्यक्षपदी लक्ष्मीकांत कुर्रा यांची निवड झाली.

परिषदेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सन २०२५ २६ साठी पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचे ज्येष्ठ सदस्य श्रीकांत कुलकर्णी, सुधीर देव, हेमाताई मोडक यांनी अभिनंदन करून त्यांचे स्वागत केले व त्यांना शुभेच्छा दिल्या.

या वार्षिक सभेस भारत विकास परिषद सदस्य रघुनाथ क्षीरसागर, नरहरी अघोर, गौरी आमडेकर, पद्मनाभ काटिकर, किशोरी भट आदी उपस्थित होते.

# सांगली अर्बन को-ऑप बँकेस १५ कोटीचा नफा

## चेअरमन गणेश गाडगीळ यांची माहिती

**सागंली, दि. ३ एप्रिल-**

सांगली अर्बन को-ऑप बँकेस २०२४-२५ या आर्थिक वर्षात १५ कोटी नफा झाला आहे अशी माहिती बँकचे अध्यक्ष गणेश गाडगीळ यांनी दिली.

बँकेच्या ठेवींमध्ये ९६ कोटीची वाढ होऊन एकूण ठेवी १२७७.१७ कोटी झाल्या आहेत तसेच कर्जामध्ये ७२ कोटी इतकी वाढ होऊन ७६६.८७ कोटी कर्जांचे वाटप झाले आहे. बँकेचा एकूण व्यवसायात वाढ होऊन तो २०४४ कोटींचा झाला आहे. बँकेच्या एन.पी.ए मध्ये लक्षणीय घट होऊन निव्वळ एन.पी.ए चे प्रमाण केवळ १.१० % इतके राहिले आहे. रिझर्व बँकेच्या निकषाप्रमाणे सी.आर.ए.आरचे प्रमाण किमान १२% आवश्यक आहे ते १४.७९ % इतके झाले आहे. यावरून बँकेची आर्थिक स्थिती अधिक भक्कम झाली आहे असेही श्री. गाडगीळ यांनी सांगितले.



गणेश गाडगीळ



श्रीपाद खिरे



उल्हास नायक

पी.एम कुसुम योजनेअंतर्गत ''सोलार फार्मिंग''साठी मराठवाड्यातील शाखेतर्फे बँकेने कर्जवाटप केले आहे. घरगुती रुफ टॉप सोलरसाठी विशेष कर्ज योजनेतून तसेच सोनेगहाण व वाहन खरेदीसाठी कर्ज वाटप केल्याने कर्ज व्यवहारामध्ये वाढ झाली आहे. फ्लॅट/घर खरेदी साठी गृह कर्ज, शेतकरी वर्गासाठी ''एस.यु.बी किसान'' विशेष कर्ज योजना, डॉक्टरांसाठी धन्वंतरी, छोट्या व्यावसायिकांसाठी पिग्मी कर्ज योजना चालू केल्याने कर्जात लक्षणीय वाढ झाली आहे.

आर्थिक वर्षात केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्या विविध सबसिडी स्कीम (योजनांचा) लाभ बँकेच्या कर्ज खातेदारांना झाला आहे. यामध्ये प्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजना, आवास योजना शहरी (२.०), सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना, कुसुम योजना, सूर्यघर, राष्ट्रीय पशुधन अभियान(एन.एल.एम), अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ आदी योजनांचा समावेश आहे. एन.पी.ए मधील कर्ज वसुलीसाठी कर्ज मॉनेटरिंग, वसुली विभागाने व सी.इ.ओ यांनी परिश्रम घेतले. बँकेने लाइफ, जनरल व हेल्थ इन्शुरन्स व्यवसाय चालू केले आहे.

विमा व्यवसाय विभागातील कर्मचारी यांनी यासाठी विशेष योगदान दिले आहे. व्यवसाय वाढीसाठी सी.इ.ओ, सरव्यवस्थापक, मार्केटिंग विभाग, अधिकारी आणि कर्मचारी वर्ग यांनी परिश्रम घेतले. या सर्वांमुळे बँकेची आर्थिक स्थिती अधिक भक्कम होण्यासाठी मदत झाली. बँकेच्या एकूण प्रगतीमध्ये उपाध्यक्ष व सर्व सहकारी संचालक, व्यवस्थापन मंडळ सदस्य यांची मोलाची मदत व सहकार्य मिळाले आहे. तसेच बँकेच्या वरील नमूद आर्थिक स्थितीमुळे पुढील काळात लाभांश देणे, शाखा विस्तार करणे आणि ग्राहकांसाठी नवीन अद्ययावत तंत्रज्ञानयुक्त सेवा देणे शक्य होणार आहे असेही अध्यक्ष गाडगीळ यांनी सांगितले. यावेळी उपाध्यक्ष सी.ए श्रीपाद खिरे, संचालक एच.वाय.पाटील, शैलेंद्र तेलंग, सतीश मालू, संजय धामणगावकर, संजय पाटील, सी.ए सागर फडके उपस्थित होते.

# संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघुकथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती,
मो. ९९६००५३५२१

### अलक:- (९७) भारतीय मजदूर संघ

भा.म.संघ हे भारताचे सर्वात मोठे केंद्रीय श्रमिक संघटन आहे. याची स्थापना भोपाळमध्ये महान विचारक श्री दत्तोपंत ठेंगडी द्वारा लोकमान्य टिळकांच्या जन्मदिवशी २३ जुलै १९५५ ला झाली. ही मजुरांची मजदूरांकरता मजदूरद्वारा संचलित स्वतंत्र संघटना आहे. इथे मजुरांनी श्रम कर्तव्य आणि श्रमशिस्त महत्त्वपूर्ण मानली आहे. अर्थातच सर्व समावेशक राष्ट्रकारण इथे महत्त्वाचे ठरते. म्हणजे राष्ट्राचे औद्योगीकरण, उद्योगाचे श्रमिकीकरण, श्रमांचे राष्ट्रीयीकरण या त्रिसूत्री वर ही संघटना काम करते. १७ सप्टेंबरला विश्वकर्मा जयंतीला राष्ट्रीय श्रम दिवस म्हणून साजरा करतात. आज काँग्रेस, कम्युनिस्ट आणि इतर पक्षांच्या पूर्ण प्रभावाखाली अनेक कामगार संघटना आहेत. परंतु भा.म. संघाने या संघटनांना मोडीत काढले आहे. आज हे संघटन शून्यातून शिखर पर्यंत पोहोचले आहे. भारत माता की जय हा उद्घोष फक्त उद् घोष भा.म. संघातच होतो. ही संघटना स्वतंत्र नारा देत असते. मजदूरो दुनिया को एक करो, बाकी अन्य कामगार संघटना चा नारा आहे दुनिया के मजदूर एक हो भा. म. संघाचा दुसरा नारा आहे देश के हित मे करेंगे काम, काम के लेंगे पुरे दाम बाकी अन्य संघटनांचा नारा असतो चाहे जो मजबूरी हो, मांग हमारी पुरी करो भा.म. संघाचे अजून काही नारे वाचा. नया जमाना आयेगा कमाने वाला खिलायेगा (२) बी. एम. एस. की क्या पहचान। त्याग-तपस्या और बलिदान ।। थोडक्यात भा.म. संघ राजकारण नाही तर *राष्ट्रकारणाचा पुरस्कार करतो १९६२ च्या भारत चीन युद्धकाळात श्रमिक दृष्टिकोन खूप महत्त्वाचा होता. यावेळी भा.म.संघाने आपली चालू असलेली आंदोलने स्थगित केली होती. व रक्षा उत्पादन, परिवहन, विद्युत उत्पादन , तसेच सामाजिक महत्त्वाच्या क्षेत्रात संपूर्ण सहाय्य केले होते. आणि त्यातूनच भारतीय प्रतिरक्षा मजदूर संघ उदयाला आला ही देशभक्ती सर्वांना अचंबित करणारी होती असो.

**।। भारत माता की जय।।** **क्रमशः**

# जनसंमोहिनी, जनप्रबोधिनी : सोलापूर आकाशवाणी

**आजही १९८४ साल लख्ख आठवतंय. ऑक्टोबरचा महिना. सायंकाळची वेळ. रेडिओ लावत असताना, रेडिओच्या केंद्रदर्शक पट्टीवर श्रवणबिंदू मागेपुढे करत असताना, अचानक त्या पट्टीवरील उजव्या बाजूला एका अज्ञात बिंदूवर अत्यंत सुस्पष्ट आवाजात सुंदर गाणी ऐकू आली. जीव मोहरून गेला. त्याआधी सोलापूर जिल्ह्यात आकाशवाणी पुणे व सांगली वगळता मोठ्या आणि स्पष्ट आवाजात कधीच कोणती केंद्रे लागायची नाहीत. मुंबई, विविध भारती, रेडिओ सिलोन, औरंगाबाद-परभणी, नागपूर ही रेडिओ केंद्रे वाऱ्यावर विहरतच धूसर ऐकू यायची. ही सारी केंद्रे महत्प्रयासाने संशोधित करून लावावी लागायची. त्यावेळी पुणे-सांगलीपेक्षाही स्पष्ट आणि मोठ्या आवाजात लागणारे हे रेडिओ स्टेशन कोणते बरे? असा प्रश्न पडला. चार-पाच गाणी ऐकल्यानंतर मधुर स्वरात उद्घोषणा ऐकू आली.**

आकाशवाणीच्या सोलापूर केंद्रावरून आपण चाचणी प्रक्षेपण ऐकत आहात; आपल्या हक्काचे आकाशवाणी केंद्र मिळाले; या भावनेने जीव सुखावला, परंतु त्यावेळी या चाचणी प्रक्षेपणाला ठराविक वेळ नसायची. मात्र तेव्हापासून सकाळी आणि सायंकाळी अधून-मधून रेडिओच्या केंद्रदर्शक पट्टीवर उजव्या बाजूला सोलापूर केंद्र शोधण्याचा जीवाला छंद लागला आणि आकाशवाणी सोलापूर ही जीवनाची उजवी बाजू होत गेली. त्यानंतर ४ एप्रिल १९८६ साली १०३.४ या प्रक्षेपणबिंदूवर आकाशवाणी सोलापूरचे अधिकृत प्रक्षेपण सुरू झाले.

आकाशवाणी सोलापूर ऐकत ऐकत तरुण वयातला तो संस्कारशील काळ आकाराला आला. खूप शिकवले सोलापूर आकाशवाणीने..! ग्रामीण भागात राहताना शब्दभांडार व शुद्धभाषेचे संस्कार शाळेतल्या शिक्षकांनी जितके केले तितकेच संस्कार सोलापूर आकाशवाणीने केले. तेव्हापासून आकाशवाणी सोलापूर माझ्यासाठी गुरुस्थानी झाली.

गेली ३९ वर्षे आकाशवाणी सोलापूरचा लळा संपूर्ण सोलापूर जिल्ह्याला व आसपासच्या जिल्ह्यांनासुद्धा लागला आहे. पुढे २०११ साली एफ.एम. बँड प्रक्षेपण यंत्रणेसहित आकाशवाणी सोलापूरने नवयुगात प्रवेश केला.

साधारण शंभर ते दीडशे किलोमीटर त्रिज्येच्या वर्तुळात सोलापूर आकाशवाणी सर्व कुटुंबात रुजली आणि रूळली आहे. सोलापूरच्या मातीत वटवृक्ष झाली आहे. चिरंतन, चिरतरुण अशी आकाशवाणी सोलापूरची श्रवणदिंडी आधुनिक तंत्रयुगात आपलेपणाची व माणुसकीची मुळे घट्ट रोवत पुढे चालली आहे.

आजच्या काळात दूरदर्शनची व रेडिओची अनेक सरकारी आणि खाजगी प्रक्षेपण केंद्रे, इंटरनेटच्या जमान्यात उगम पावलेले वेगवेगळे मनोरंजनाचे आणि प्रबोधनाचे स्त्रोत मुबलक प्रमाणात उपलब्ध असतानासुद्धा आकाशवाणी सोलापूरच्या श्रोत्यांची संख्या आज लाखांत आहे. याचे श्रेय सोलापूर आकाशवाणीचे प्रसारण अधिकारी, निवेदक, कार्यालयीन कर्मचारी आणि तंत्र विभागातील सर्व अभियंते या सर्वांना निश्चितपणे द्यावे लागेल. कौटुंबिक जिव्हाळ्याने सर्वजण एकत्र येऊन सादर करीत असलेल्या सर्व कार्यक्रमांचा एक सुंदर सामूहिक परिणाम ३९;श्रवणमंगलम ३९; या एकाच शब्दात व्यक्त करावसा वाटतो. विश्वसनीयतेच्या बाबतीत बोलायचं झालं तर आकाशवाणी हे माध्यम आजही बावन्नकशी सोनेच म्हणावे लागेल.

आकाशवाणी विषयक मनात असलेल्या विलक्षण जिव्हाळ्यातून केवळ दोन मिनिटात हे गीत सुचले आणि तितक्याच आंतरिक उमाळ्याने दोन मिनिटात धानी रागामध्ये चालही सुचली. अवघ्या आठ दिवसात, सोलापूरचा प्रथितयश वाद्यवृंद शिवरंजनी व मधुरध्वनीच्या सहयोगाने या गीताचे ध्वनिमुद्रण करून आकाशवाणी सोलापूरच्या रौप्य महोत्सवाच्या कार्यक्रमात तत्कालीन केंद्रीय ऊर्जा मंत्री सुशीलकुमार शिंदे, जिल्हाधिकारी जगदीश पाटील आणि तत्कालीन केंद्र निदेशक सुनील शिनखेडे यांच्या हस्ते हे गीत आकाशवाणीला समर्पित करण्यात आले..

गोव्यातील पणजी येथे नुकत्याच झालेल्या पश्चिम क्षेत्राच्या बैठकीत सोलापूर आकाशवाणीच्या कार्यक्रम निर्मितीबद्दल आणि उत्कृष्ट महसुलाबाबत आकाशवाणी सोलापूरला गौरवण्यात आलेले आहे.

मनोरंजन आणि प्रबोधन विश्वातील नकारात्मकता टाळून जनप्रबोधन करणे हे सोलापूर आकाशवाणीचे वेगळे वैशिष्ट्य होय. सकारात्मक दृष्टीने कार्यक्रम सादर करणारे सोलापूर आकाशवाणी केंद्र येथील जीवन ऊर्जेचे अमृत आहे, असेच गौरवाने म्हणावे लागेल.

वर्तमानपत्रे घराच्या उंबऱ्यात येण्याच्या आधीच झुंजुर्क्या वेळेत सादर होणारे, दैनंदिन जीवनातील घडामोडींचे, सकाळचे सोलापूर दिनांक हे वार्तापत्र हे एक सोलापूर आकाशवाणीचे वेगळे वैशिष्ट्य येथील पत्रकारांनी कष्टाने जपले आहे. आकाशवाणीत पहाटे पाचला पोहोचून, बातम्या निवडून सांगणा-या, वृत्तपत्रे व दृश्य माध्यमातील पत्रकार बांधवांनी सोलापूर आकाशवाणीच्या प्रसारात बहुमोल योगदान दिले आहे, हेसुद्धा नितांतसुंदर सत्यच होय.

बदलत्या काळात टिकून राहण्यासाठी अद्ययावत प्रक्षेपण तंत्रज्ञान, ध्वनिमुद्रणाचे संगणकीय तंत्रज्ञान, जगात कुठेही ऐकण्यासाठी न्यूज ऑन ए आय आर हे ॲप, मध्यम लहरी ते एफ. एम बँडपर्यंत आकाशवाणीने केलेले बदल कौतुकास्पद आहेत. सध्या सोलापूर आकाशवाणीचा अभियांत्रिकी विभाग, सहाय्यक संचालक, अर्चिता ढेरे यांच्या मार्गदर्शनात कार्य करत आहे.

वेगाने बदलणाऱ्या जागतिक आणि स्थानिक जीवनशैलीला पूरक आशय मनोरंजनाच्या आणि प्रबोधनाच्या माध्यमातून पुरवणे, हे आव्हानात्मक काम सोलापूर आकाशवाणी सातत्याने करत आहे. ३९ व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या सोलापूर आकाशवाणीच्या या लोकाभिमुख कार्याबद्दल खूप खूप शुभेच्छा आणि आकाशवाणीच्या अधिकारी व सर्व कर्मचाऱ्यांना कृतज्ञतापूर्वक मनोमन वंदन...

**- दीपक कलढोणे**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त

### भंगारकिणी येथे शनिवारपासून रामनवमी उत्सव



**अणदूर, दि.३ एप्रिल-**

अक्कलकोट तालुक्यातील भंगारकिणी येथे श्रीराम चरण स्पर्शाने पावन झालेल्या राम मंदिरात प्रतिवर्षा प्रमाणे यंदाही रामनवमीचा उत्सव शनिवार दि. ५ एप्रिलपासून सुरू होत आहे. यामध्ये कीर्तन, भजन, अभिषेक, दिंडी मिरवणूक असे कार्यक्रम होणार आहेत. परिसरातील भाविकांनी लाभ घेण्याचे आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे. येथील मंदीरात शनिवारी दि.५ एप्रिल रोजी रात्री ९ वाजता ह.भ.प. शिवाजीराव जाधव बावकरवाडी याचे कीर्तन होणार आहे. चुंगी, सुलतानपूर, काजीकणबस , दहीटना, गुळहळी, किणी येथील मंडळाचे भजन होणार आहे. रविवारी ६ एप्रिल रोजी सकाळी ६ वाजता महाअभिषेक, ८ वाजता काजीकणबस महिला मंडळांचा भजनाचा कार्यक्रम होणार आहे. सकाळी १० वाजता वसंतराव रामदासी यांचे रामजन्मानिमित्त गुलालाचे कीर्तन होणार आहे. त्यानंतर महाआरती, महाप्रसाद व श्री रामचरण पादुका पूजन व नदीच्या पात्रात भव्य दिंडीचे आयोजन करण्यात आले असून त्याचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन रामतीर्थ मठाचे मठाधिपती महाराज वसंतराव रामदासी यांनी केले आहे . कार्यक्रम यशस्वीतेसाठी शरदराव किणीकर, भैय्या गुरुजी किणीकर, मृगेद्र स्वामी, संजु बिराजदार, भोसले सर, विजयकुमार कुलकर्णी, विजयकुमार खुबा, मधुकर कुलकर्णी, दिनकर कुलकर्णी, शशांक किणीकर, अभिजीत रामदासी, अजित रामदासी व किणीचे सरपंच, उपसरपंच व समस्त गावकरी, भजनी मंडळ चुंगी, सुलतानपूर, काजीकणबस , दहीटना, गुळहळी, किणी , यांचे सहकार्य लाभणार आहे.



### महाबोधी महाविहार बौद्ध समाजाच्या ताब्यात द्या

**आरपीआय आठवले गटाची मागणी**

**मोडनिंब, दि.३ एप्रिल -**

बुद्धगया येथील महाबोधी महाविहार बौद्ध समाजाच्या ताब्यात देण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्या वतीने कुर्डुवाडीचे उपविभागीय अधिकारी यांना निवेदनाद्वारे केली आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदासजी आठवले व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष लोकनेते राजाभाऊ सरवदे व सोलापूर जिल्हा कार्यकारिणी यांच्या आदेशानुसार व महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष बापुसाहेब जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत माढा तालुक्याच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. १९४९ चा महाबोधी टेम्पल मॅनेजमेंट कायदा रद्द करण्याची मागणी करण्यात निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी आरपीआयचे पश्चिम महाराष्ट्र सचिव चंद्रकांत वाघमारे, पश्चिम महाराष्ट्र संघटक नागनाथ ओहोळ, सोलापूर जिल्हा संघटक पोपट लोंढे, माढा तालुका युवक अध्यक्ष आकाश जगताप, जिल्हा युवक कार्याध्यक्ष दादा बनसोडे, बिभीषण कांबळे, संतोष साळवे, वैभव ओहोळ, सचिन शेंडगे, अशोक माने, शेखर मोरे, शहाजी खंदारे, सर्जेराव भिसे, दयानंद शेंडगे, यासह पक्षाचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते. निवेदन माढा तालुका अध्यक्ष मारुती वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली देण्यात आले.



### जेऊरच्या इरा पब्लिक स्कूलचे आयटीएसई परीक्षेत यश

**करमाळा, दि.३ एप्रिल-**

जेऊर (ता.करमाळा) येथील इरा पब्लिक स्कूलमधील पाच विद्यार्थी आयटीएसइ (इंडियन टॅलेंट सर्च एक्झाम) या राज्यस्तरीय परीक्षेत बसले होते, यामध्ये श्लोक बाळू मत्रे(जिल्ह्यात प्रथम), सम्यक विनोद अवसरे (जिल्ह्यात द्वितीय), श्लोक बाबुराव तोडकर (केंद्रात प्रथम) तसेच श्रेयस संदीप तोडकर व तेजस राहुल आतकर हे विद्यार्थी उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. यावेळी शाळेच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या घाडगे मॅडम यांना ही सन्मानित करण्यात आले. सर्व विद्यार्थी व शिक्षक यांचे संस्थेचे सचिव सुनिल अवसरे सर, प्रिन्सिपल अपेक्षा अवसरे तसेच इतर सर्व शिक्षक यांनी अभिनंदन केले.

### दहिटणेत डॉ. आंबेडकर जयंतीच्या अध्यक्षपदी विकीबाबा चौधरी



**अक्कलकोट दि .३ एप्रिल..**

दहिटणे (ता.अक्कलकोट) येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती अध्य्क्षपदी विकीबाबा चौधरी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. येथे समाजाची नुकतीच बैठक येण्यात आली. यामध्ये प्रत्येक घरातील एक व्यक्ती उपस्थित होता. नागरिकांच्या वतीने सर्व निवडी बिनविरोध करण्यात आल्या. उपाध्यक्ष सुधीर सोनकांबळे, सहउपाध्यक्ष अजित सोनकांबळे, कार्याध्यक्ष लक्ष्मण चौधरी, सचिव मोहन रसनभैरे, खजिनदार अमोल चौधरी, मिरवणूक प्रमुख अण्णासाहेब गायकवाड या सर्वांची निवड समाजाच्या वतीने करण्यात आली. यावेळी ज्येष्ठ नागरिक, तरुण कार्यकर्ते, भीमशक्ती तरुण मंडळचे संपूर्ण पदाधिकारी उपस्थित होते

# पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पाण्याचा शब्द पाळला : केदार सावंत

## सांगोला तालुक्यासाठी राजेवाडी तलावातून पाण्याचे आवर्तन केले सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.३ एप्रिल-**

सांगोला तालुक्यात दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली असल्याने तालुक्यासाठी राजेवाडी तलावातून पाणी सोडण्याची मागणी भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती. या मागणीची दखल घेत ना.जयकुमार गोरे यांनी पाण्याचा शब्द पाळला असून सांगोल्यातील नागरी सत्कार स्वीकारण्याआधी सांगोला तालुक्यासाठी राजेवाडी तलावातून पाण्याचे आवर्तन



सुरू केल्याची माहिती चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली.

> माझ्या मागणीची ना.जयकुमार गोरे यांनी दखल घेतली असून राजेवाडी तलावातून सांगोला तालुक्यासाठी पाण्याचे आवर्तन सुरू करण्यासाठी सकारात्मकता दाखवली. गुरुवार दि.३ एप्रिल रोजी सांगोल्यात ना.जयकुमार गोरे यांच्या नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. सत्कार स्वीकारण्याआधी त्यांनी राजेवाडी तलावातून सांगोला तालुक्यासाठी पाण्याचे आवर्तन सुरू केले आहे. यामुळे सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.
>
> **-चेतनसिंह केदार सावंत, जिल्हाध्यक्ष, भाजपा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे शनिवारी पंढरपूर दौऱ्यावर आले होते. यावेळी चेतनसिंह केदार सावंत यांनी त्यांची भेट घेऊन सांगोला तालुक्यातील भीषण पाणी टंचाईची परिस्थिती सांगितली. तालुक्यातील खवासापूर, लक्ष्मीनगर, चिकमहुद, नराळेवाडी, व वाकी गावांना राजेवाडी तलावातून प्रत्येक वर्षी पाच आवर्तने सोडण्यात येतात.

परंतु चालू वर्षी उन्हाळी आवर्तने प्रकरण प्रसिद्ध केले नाही. सदर गावातील शेतकऱ्यांच्या शेतामध्ये ऊस, डाळींब, केळी अशी पिके आहेत. सध्या दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली असल्याने राजेवाडी तलावातून उन्हाळी आवर्तने प्रसिद्ध करून वरील गावांना पाणी सोडण्याची मागणी चेतनसिंह केदार सावंत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ना.जयकुमार गोरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती.

# धर्म, संस्कृतीच्या रुढी परंपरा जपण्यात वटवृक्ष देवस्थान अग्रेसर

**पालकमंत्री जयकुमार गोरे; दर्शनानंतर व्यक्त केले मनोगत**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि ३ एप्रिल-**

धर्म, संस्कृती आणि रुढी परंपरा जपण्यात श्री. वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे योगदान राज्यात अग्रेसर असल्याचे मत राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी व्यक्त केले.

येथील श्री वटवृक्ष स्वामी समर्थांच्या दर्शनाकरीता सपत्निक ते येथे आले होते. याप्रसंगी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत वटवृक्ष मंदिर समितीच्या वतीने चेअरमन महेश इंगळे यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे व त्यांच्या पत्नी सोनिया गोरे यांचा श्रींचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सत्कार केला.

यावेळी श्री. इंगळे यांनी श्री.स्वामी समर्थांच्या १४७ व्या पुण्यतिथी महोत्सवाची निमंत्रण पत्रिका देवून श्री.स्वामी पुण्यतिथी रोजी पुन्हा एकदा स्वामी दर्शनास येऊन स्वामी समर्थांचे आशिर्वाद



घेण्याचीही विनंती केली. पालकमंत्री श्री. गोरे यांनी मी व माझे कुटूंब श्री स्वामी समर्थांचे निस्सिम भक्त आहोत आज प्रथमच स्वामींच्या दर्शनाने आनंद झाल्याचे सागितले.

येथे स्वामींचा सहवास साक्षात अनुभवता आल्याचे सांगून भविष्यातही वटवृक्ष देवस्थान समितीने स्वामी भक्ती प्रचार प्रसार कार्यासोबतच धर्म, संस्कृतीच्या रुढी परंपरा नियमितपणे जपावे असे बहूमुल्य सुचक विधान केले.

यावेळी प्रथमेश इंगळे, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष अमोलबापू शिंदे, भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य शहाजी पवार, आनंदराव तानवडे, शिवशरण जोजन, वहिदपाशा शेख, महेश हिंडोळे, मल्लिनाथ स्वामी, शिवराज स्वामी, ननु कोरबू, बसवंतराव कलशेट्टी, लखन झंपले, संतोष पाटील, राहूल शिंदे, खाजप्पा झंपले, श्रीकांत मलवे, विपूल जाधव, आ.कल्याणशेट्टी यांचे स्वीय सहायक धनंजय गाढवे, प्रा.शिवशरण अचलेर, दीपक जरिपटके, प्रसाद सोनार, अविनाश क्षीरसागर, सागर गोंडाळ, श्रीशैल गवंडी, स्वामीनाथ लोणारी, गिरीश पवार, महादेव तेली आदि उपस्थित होते.



## पीएमश्री शाळेतील मुलींनी केले विविध क्षेत्रांचे परिभ्रमण

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.३ एप्रिल-**

येथील मोडनिंब (ता.माढा) येथील पीएमश्री जिल्हा परिषद प्राथमिक मुलींच्या शाळेतील मुलींना पीएमश्री योजनेतून मोफत शैक्षणिक क्षेत्रभेट सहल आयोजित करण्यात आली. यावेळी विद्यार्थिनींना भिमानगर येथील उजनी धरण, नरसिंहपूर, अकलूज येथील अकलाई देवीचं मंदिर, शिवसृष्टी किल्ला, आनंदी गणेश मंदिर, या प्रेक्षणीय स्थळांना भेटी दिल्या.

या सहलीसाठी परिवहन महामंडळाच्या सात बसेस मधून विद्यार्थिनींच्या प्रवासाची सोय करण्यात आली होती. तसेच विद्यार्थिनींसाठी पाणी, नाष्टा, जेवणाची उत्तम सोय करण्यात आली होती. सहल प्रस्थानावेळी एसटी बसचे पूजन औदुंबर मोहीते व उपस्थित पालकांच्या हस्ते करण्यात आले. सहल नियोजन व्यवस्थित पार पाडल्याबद्दल सर्व बस चालकांचा सत्कार तात्यासाहेब मोहीते, महादेव ओहोळ यांच्या हस्ते करण्यात आला. या क्षेत्रभेटीसाठी अध्यक्षा मोहीते, उपाध्यक्षा ओहोळ व सर्व सदस्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच शिक्षक ढोबळे यांनीही सहकार्य केले. ही शैक्षणिक क्षेत्रभेट सहल व्यवस्थित पार पाडण्यासाठी मुख्याध्यापक हरिदास जाधव, शिक्षक वृंद अनिल मनाळे, साळवे, लोंढे, लादे, खांडके, क्षीरसागर, गायकवाड, जगदाळे, ढगे, काळे, काझी यांनी परिश्रम घेतले.

## डॉ. संजीवनी केळकर यांचा स्नेहालय परिवारातर्फे सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३ एप्रिल-**

येथील माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठानच्या संस्थापिका डॉ. संजीवनी केळकर यांचा समाजसेवेतील अतुलनीय योगदानाबद्दल अहिल्यानगरच्या स्नेहालय परिवारातर्फे मानपत्र देऊन सन्मान करण्यात आले.

> डॉ.संजीवनी केळकर यांचा सन्मान करणारी स्नेहालय ही संस्था १९८९ मध्ये डॉ.गिरीश कुलकर्णी यांनी स्थापन केलेली आहे. ही संस्था एचआयव्ही बाधित, लैंगिक शोषणग्रस्त, तस्करीच्या बळी ठरलेले आणि एलजीबीटी समुदायासाठी कार्य करते. दरवर्षी १५ हजार हून अधिक लोकांना मदत करणारी ही संस्था समाजसेवेतील एक आदर्श आहे.



डॉ.संजीवनी केळकर यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरण कार्यक्रमाअंतर्गत महिलांचे आरोग्य, शिक्षण, आर्थिक स्वावलंबन याबाबत संस्थेच्या माध्यमातून खूप कामे झाली आहेत. तसेच महिलांबरोबरच ग्रामीण विद्यार्थ्यांनाही दर्जेदार शिक्षण मिळावे म्हणून बालवाडी ते इ.१२ वी पर्यंत वर्ग सुरू केले. सांगोला व पंढरपूर तालुक्यात जलसंधारणाची कामेही त्यांच्या नेतृत्वाखाली झाली. बचतगट, आरोग्य शिबिरे, साक्षरता वर्ग आणि लघुउद्योगांना प्रोत्साहन याद्वारे त्यांनी अनेक महिलांना स्वावलंबी बनवले आहे.

त्यांच्या नेतृत्वाखाली विविध आरोग्य तपासणी आणि मोफत व स्वस्त उपचार शिबिरे आणि इतर आरोग्य उपक्रम राबवले जातात. मागील वर्षी त्यांना नागपूर येथे अत्यंत प्रतिष्ठेचा केंद्र शासनाचा राष्ट्रीय शिक्षा भूषण पुरस्कारही मिळाला आहे. त्यांच्या कार्याची राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरदेखील दखल घेतली गेली आहे.

## ग्रामपंचायत युनियन माढा तालुका उपाध्यक्षपदी विठ्ठल मोरे

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.३ एप्रिल-**



महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत, नगरपंचायत, जिल्हा परिषद कर्मचारी युनियनच्या माढा तालुका उपाध्यक्षपदी जाधववाडी येथील विठ्ठल मोरे यांची एकमताने निवड करण्यात आली.

ग्रामपंचायत कर्मचारी युनियनच्या वतीने कुर्डूवाडी येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राज्याध्यक्ष मोहन लामकाने यांनी मोरे यांच्या निवडीची घोषणा केली. सोलापूर जिल्हाध्यक्ष दिलीप जाधव, कार्याध्यक्ष अरुण सुर्वे यांच्या हस्ते निवडीचे पत्र देण्यात आले. यावेळी नागराज लोंढे, सचिव दिलीप वाघमोडे, आप्पा कोळी, विक्रम नाळे, शैलजा पाटील, पुष्पा ताबे, आशोक, कदम, जयराम भिसे, नवनाथ साळवी, नवनाथ येळे, बालाजी पवार, वैभव वीर, रोहीदास वाघमारे यासह कर्मचारी उपस्थित होते.

## बुलढाण्याचा बंब्या खांडसकरांनी पटकाविला प्रथम पुरस्कार

**पालकमंत्री गोरे, आमदार कल्याणशेट्टी यांच्या हस्ते झाले वितरण**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि. ३ एप्रिल**

हन्नूर (ता.अक्कलकोट) येथे सलग चौथ्या वर्षी संयोजक सागर कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनात राज्यस्तरीय बैलगाडा शर्यती झाल्या. यामध्ये १२४ स्पर्धकांनी बैलजोडीसह सहभाग घेतला. यामध्ये बुलढाण्याचा बंब्या खांडसकर याने अत्यंत प्रतिष्ठेचा असलेला २ लाख ११ हजार रुपयाचा हन्नुर केसरी पुरस्कार पटकाविला.

पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. यावेळी सिध्देश्वर कल्याणशेट्टी, संयोजक सागर कल्याणशेट्टी, मिलन कल्याणशेट्टी, तहसिलदार विनायक मगर, गटविकास अधिकारी शंकर कवितके, शिवसेनेचे अमोल शिंदे, संतोष पाटील, महेश हिंडोळे, विलास गव्हाणे, प्रदिप पाटील , आनंद तानवडे, सुशिल क्षिरसागर, सुधिर मचाले, आणप्पा बाराचारी, सिद्धाराम हेले, प्रदिप जगताप आदी मान्यवर उपस्थित





> हन्नुरच्या कलप्पा येगप्पा पुजारी यांनी द्वितीय १ लाख ११ हजार व चप्पळगावचे मल्लीनाथ सोनार यांनी ५१ हजाराचे तृतीय, संतोष घोडके ३५ हजाराचे चतुर्थ, बाबा प्रसन्न बागडे ३० हजाराचे पाचवे व हन्नुरचे अमोल मणुरे यांनी २५ हजाराचे सहावे बक्षिस पटाकविले.

होते. स्पर्धा चित्तथरारक लक्षवेधी व डोळयाचे पारणे फेडणारी उत्कंठावर्धक ठरली. अंत्यत प्रतिष्ठेची बनलेली व कृषी पर्यटनास चालना देणाऱ्या या स्पर्धेत तालुक्यातील ८४ स्पर्धक व इतर ४२ असे एकूण १२४ स्पर्धकांनी सहभाग घेतला. यामध्ये पंढरपुर, फलटण, खटाव, सातारा, पुणे, बीड, उस्मानाबाद ,लातुर, खुदावाडी, तुळजापुर, उमरगा, माळशिरस, बारामती आदि ठिकाणच्या स्पर्धक शेतकरी प्रेक्षकांचा सहभाग होता. या स्पर्धेमुळे हन्नुर गावात जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. यानिमित्ताने उच्च दर्जाचे रुबाबदार बैलजोडी पाहण्याची तालुकावासीयाना संधी मिळाली. यावेळी अनेक गावातील शेतकरी उपस्थित होते.

# बेवारस मृतदेहावर मुस्लिम तरुणांकडून अंत्यसंस्कार

**मंद्रुपच्या तरूणांचे होतेय कौतुक**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ एप्रिल,**

सध्या सर्वत्र विविध कारणाने जातीजातीत वाद निर्माण होत आहेत. त्यामुळे समाजात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन दोन जातीत तंटे वाढत आहेत. समाजातील या विचारांना फाटा देत मंद्रुपमधील मुस्लीम तरूणांनी समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे.

टाकळी येथे सापडलेल्या ७५ वर्षे वयाच्या अज्ञात वृद्धाच्या मृतदेहावर मंद्रूप येथील मुस्लिम तरुणांनी हिंदू पद्धतीने अंतिम संस्कार केले. मंद्रुप पोलीस ठाण्याच्या हद्दीत सापडलेल्या बेवारस मृतदेहावर उस्मान नदाफ व त्यांच्या सहकार्यांनी अंतिमसंस्कार केला आहे .

टाकळी येथील बोदलप्पा दिवटे यांच्या शेतात २९ मार्च रोजी चार वाजता अज्ञात वृद्धाचा मृतदेह आढळला होता. सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार यांनी ग्रेड पीएसआय संदीप काशीद यांनी पंचनामा केला. तेव्हा या वृद्धाचे मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले. अंगातील शर्ट व धोतरावरून मृतदेहाची ओळख पटली नाही . त्यामुळे याची मंद्रुप पोलीस ठाण्यात अकस्मात बेवारस मयत म्हणून नोंद करण्यात आली.

मंद्रुप पोलिसांनी सदर मयताच्या नातेवाईकांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. उष्माघात व भूकबळीने मृत्यू झाल्याचा अंदाज पोलिसांना व्यक्त केला. पोलिसांनी शोध घेवूनही त्याची ओळख पटली नाही. त्यामुळे पाचव्या दिवशी सदरच्या मृतदेहावर पोलीसांनी अंतिमसंस्कार करण्याचा निर्णय घेऊन उस्मान नदाफ यांच्याशी संपर्क साधला. तेव्हा नदाफ मित्र परीवारांने हिंदु समाजातील परंपरेनुसार मृतदेहावर अंतिमसंस्कार केले.



**या तरुणांनी केले अंत्यसंस्कार**

उस्मान नदाफ, आसिफ शेख, सैफन नदाफ, आरिफ नदाफ यांनी तिरडी बांधली. त्यांना अनिल टेळे, सिद्धाराम कुंभार, मल्लिकार्जुन जोडमोटे , बबलू शेख, शिवराज मुगळे यांनी मदत केली. त्यानंतर मंद्रूप-निंबर्गी रस्त्यावरील स्मशानभूमीत दफनविधी करण्यात आले . यावेळी हिंदू पद्धतीने सर्व धार्मिक विधी करण्यात आले.

> **मुस्लीम तरूणांचे कौतुकास्पद कार्य**
>
> उस्मान नदाफ मित्रपरिवारांनी मंद्रुप पोलीस ठाणे हद्दीतील बेवारस मृतदेहांवर तिसऱ्यांदा अंतिमसंस्कार केले. मुस्लिम तरुणांनी सामाजिक जाणिवेतून केलेले कार्य कौतुकास्पद आहे. तरूणांनी सामाजिक बांधिलकी जपत असताना समाजातील अंधश्रध्दा व रूढी परंपरेला दूर करून स्तुत्य कार्य केल्यास समाजासमोर आदर्श निर्माण होईल
>
> **- मनोज पवार, सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे मंद्रुप**

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## 'न्यु इरा'च्या चिमुकल्यांनी सुरू केली चिऊताईसाठी पाणपोई

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.३ एप्रिल**

चिखलठाण (ता.करमाळा) येथील न्यु इरा पब्लिक स्कूलच्या प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी चिऊताई, कावळेदादा व इतर पक्षांचे पाणी व खाऊविना हाल होऊ नयते म्हणून शाळेच्या पटांगणातील झाडाला टाकाऊ प्लॅस्टिकच्या रिकाम्या बाटल्यांचा वापर पाणी पिण्यासाठी, प्लॅस्टिक प्लेटचा वापर करून खाऊचीही सोय केली असल्याने झाडावर विविध पक्षांचा वावर वाढला आहे.

या झाडांच्या फांद्याला प्लॅस्टिकच्या बाटल्या कट करून बांधण्यात आल्या आहेत. त्याच्या जवळच्या प्लॅस्टिक प्लेट मध्ये गहू, तांदूळ व इतर कडधान्य व दुपारच्या जेवणात उरलेले खाद्यीं या मध्ये ठेवण्यात येत आहे. सध्या उन्हाळ्याचा पारा ४२ अंशापर्यंत गेला आहे . पाणवठे, विहिरी, तलाव व परिसरातील पाण्याची पातळी कमी होत असल्याने पशू पक्षांचे अस्तित्व धोक्यात येत आहे . पशू पक्षी उष्माघाताचे बळी ठरत असून प्रत्येक घरासमोर पशू पक्षांसाठी पाणी व थोडे धान्य ठेवून निसर्गातील विविध पक्षी व पशूंना जीवदान द्यावे असे आवाहन केले आहे.



## संक्षिप्त वृत्त...



**सांगोला : नगरपरिषदेच्या डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अभ्यासिकेत अभ्यास केलेले मारुती बंडगर यांची पोलिस उपनिरीक्षक पदी निवड झाल्याबद्दल नगरपरिषदेच्या वतीने प्रशासकीय अधिकारी सचिन पाडे यांनी त्यांचा सपत्नीक सत्कार केला.**



### एनएमएमएस परीक्षेत न्यू इंग्लिश स्कूलचे सुयश

**करकंब, दि.३ एप्रिल -**

केंद्र सरकारच्या मनुष्यबळ विकास खातेअंतर्गत व महाराष्ट्र परीक्षा परिषदेच्यावतीने इयत्ता आठवीमध्ये शिक्षण घेत असलेल्या आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते.त्यासाठी घेण्यात आलेल्या एनएमएमएस परीक्षेत न्यू.इंग्लिश स्कूल करकंब ता.पंढरपूर येथील ६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर वैष्णवी महादेव घोडके,ओम संतोष माने,पुनम नितीन खाडे हे ३विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले.या ३ विद्यार्थ्यांना एकूण १लाख ४४हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार आहे. या विद्यार्थ्यांच्या यशासाठी मार्गदर्शक शिक्षक योगेश गायकवाड,रवींद्र जमखंडे,महादेव भिसे,ओंकार दुधाणे यांनी परिश्रम घेतले.विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल त्यांचा संस्थेच्यावतीने सत्कार करण्यातआला.याप्रसंगी संबंधित विद्यार्थ्यांचे पालकही उपस्थित होते.त्यांच्या या यशाबद्दल व पुढील वाटचालीसाठी संस्था अध्यक्ष संजीवकुमार म्हेत्रे सर,सचिव अनिवाश देवकते,मुख्यध्यापिका संगीता करमाळकर,पर्यवेक्षिका लक्ष्मी शिंदे,शिक्षक व शिक्षेकेतर कर्मचाऱ्यानी शुभेच्छा दिल्या.

### पंढरपूर शहरात मांस, मटण विक्रीस मनाई

**पंढरपूर, दि. ३ एप्रिल -**

चैत्र शुध्द एकादशी ८ एप्रिल २०२५ रोजी असून, यात्रा कालावधी दि. २ ते १२ एप्रिल असा आहे. या यात्रा कालावधीत शहरात श्री विठ्ठल- रुक्मिणी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. या वारी कालावधीमध्ये दि.७ ते ९ एप्रिल २०२५ या कालावधीत पंढरपूर शहरातील मांस, मटण, मासे विक्री व प्राणी कत्तल तसेच मांसजन्य पदार्थ विक्री यावर बंदी घालण्यात आल्याचे आदेश उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी निर्गमित केले आहेत. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन उपविभागीय दंडाधिकारी श्री.इथापे यांनी सदर आदेश निर्गमित केले आहेत.

**मंदीर परिसरात नारळ फोडण्यास व विक्रीस मनाई**
चैत्र यात्रेनिमित्त पंढरपूर शहरात श्री विठ्ठल- रुक्मिणी दर्शनासाठी येणाऱ्या वारकरी व भाविकांकडून नामदेव पायरी व मंदीर परिसरात नारळ फोडण्याने नारळाचे पाणी रस्त्यावर येवून चिखल व घसरंती होण्याची शक्यता आहे. तसेच विक्रेते नारळाची साल काढून मंदिर व मंदिर परिसराच्या बाजूस टाकल्याने केसरास आग लागण्याची शक्यता असल्याने.श्री विठ्ठल -रुक्मिणी मंदिर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये दि. ७ ते ९ एप्रिल २०२५ या कालावधीत नारळ फोडण्यास व विक्री करण्यास मनाई करण्यात आल्याचे आदेश उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी निर्गमित केले आहेत.



### शिष्यवृत्ती परीक्षेत 'अर्णव'चे तीन विद्यार्थी यशस्वी

**जवळगाव, दि ३ एप्रिल**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेतल्या गेलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत अर्णव शैक्षणिक संकुल सासुरे फाटा वैराग (ता. बार्शी) येथील तीन विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. आर्या मोटे १२७,आदर्श आवारे ११८, श्रावणी सोलनकर १०४ गुण मिळवून यशस्वी ठरले. तर यशस्वी जाधव,शर्वरी क्षीरसागर,आदर्श मोरे,कृष्णा जाधव,आदित्य काटे या विद्यार्थ्यांची सारथी शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे. पांडुरंग गवळी, निलोफर पठाण, सुहास ढेकणे, हर्षा काकडे, विजय नेटके, सोमनाथ घायतिडक, अविनाश गोरे यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे सचिव रविंद्र कापसे, मुख्याध्यापिका अर्चना डिसले, स्पर्धा परीक्षा प्रमुख अमोल हावळे यांनी मार्गदर्शक शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# चैत्री यात्रेसाठी मंदीर प्रशासन सज्ज

## बाराशे कर्मचारी व स्वयंसेवकांची नियुक्ती : गहिनीनाथ महाराज औसेकर

### भाविकांच्या सुविधेसाठी चार अतिरिक्त पत्राशेड तयार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३ एप्रिल -**

दरवर्षी चैत्र शुध्द ११ कामदा एकादशीदिवशी भरणारी चैत्री यात्रा यंदा दि. ८ एप्रिल रोजी असून यासाठी सुमारे दोन ते तीन लाख भविक श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी येण्याचा अंदाज आहे. यात्रा कालावधीत येणाऱ्या भाविकांना सुलभ व जलद दर्शनाबरोबरच आवश्यक सोयी-सुविधा मंदिर समितीच्या वतीने उपलब्ध करून देण्यात येणार असून त्यासाठी सुमारे बाराशे कर्मचारी व स्वयंसेवकांची नियुक्ती केली असल्याची माहिती मंदीर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

या यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिराशी संबंधित असलेल्या परंपरांचे कटाक्षाने पालन करण्यात येणार असून त्याबाबतचे आवश्यक नियोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये नवमीला श्रीरामनवमी जन्मोत्सवा निमित्त श्री विठ्ठल महाराज देहूकर फड (बिद्रीकर मंडळी) ह.भ.प.श्रीकांत महाराज पातकर, पंढरपूर यांचे कीर्तन, ह.भ.प.आजरेकर महाराज पंढरपूर यांचा व्दादशीला नैवेद्य, त्रयोदशीला ह.भ.प.गुरू बाबासाहेब आजरेकर महाराज, पंढरपूर यांचे किर्तनाची परंपरा असून, एकादशीला पहाटे श्री विठ्ठल रूक्मिणी मातेची नित्यपूजा अनुक्रमे सदस्य ह.भ.प.शिवाजीराव मोरे व व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते सपत्नीक संपन्न होत आहे. आपत्कालिन व्यवस्थेच्या दृष्टीने सोलापूर महानगरपालिका यांचेकडील रेस्क्यू व्हॅन प्रशिक्षित कर्मचा-यासह, सिझफायर यंत्रणा, अत्याधुनिक शंभर नग सीसीटीव्ही कॅमेरे व त्यासाठी कंट्रोल रूम, वायरलेस यंत्रणा, जनरेटर, मेटल डिटेक्टर, मोबाईल लॉकर, चप्पल स्टँड, सार्वजनिक प्रसारण सुचना प्रणाली, चौकशी कक्ष, बँग स्कॅनर मशिन, अपघात विमा पॉलीसी इ. व्यवस्था करण्यात आली आहे.



आरोग्य व्यवस्थेसाठी पत्राशेड येथे तालुका आरोग्य विभागाचा वैद्यकीय कक्ष, उपजिल्हा रूग्णालया मार्फत दर्शनमंडप येथे आयसीयू तसेच वैष्णव चॅरीटेबल ट्रस्ट, मुंबई यांच्याकडून मोफत वैद्यकीय सेवा व मंदिर परिसरात वैद्यकीय पथकासह दोन अद्यावत रूग्णवाहिका सज्ज ठेवण्यात येत आहेत.

स्वच्छतेसाठी मंदिर, दर्शनमंडप, तुकाराम भवन येथील स्वच्छता मंदिर कर्मचा-यांमार्फत व नगरप्रदक्षिणा, दर्शनरांग, मंदिर प्रदक्षिणा आदी ठिकाणची स्वच्छता आउट सोर्सिंग पद्धतीने करण्यात येत आहेत. या कामी स्वकाम सेवा आळंदी व संत ज्ञानेश्वर सेवा मंडळ आळंदी या स्वयंसेवी संस्थाची मदत घेण्यात येत असून, स्वच्छतेसाठी विशेष लक्ष देण्यात येत आहे. तसेच अन्नछत्रामध्ये दु.१२.00 ते २.00 व रा.७.00 ते ९.00 या वेळेत अन्नदान सुरू राहणार असून, दर्शनरांगेत दशमी, एकादशी, द्वादशीला लिंबू सरबत, मठ्ठा व तांदळाची अथवा शाबुदाणाची खिचडी वाटप करण्यात येणार आहे असे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगीतले.

दर्शनरांग व्यवस्थापनाच्या दृष्टीने स्कायवॉक पासून पत्राशेड पर्यंत बॅरीकेटींग करून त्यावर ताडपत्री टाकणे व कायम स्वरूपी चार पत्राशेड येथे तात्पुरते चार असे एकूण आठ पत्राशेड उभारण्यात येत आहेत. या दर्शनरांगेत मॅट, बसण्याची सुविधा, थंड पिण्याचे पाणी, तात्पुरते उड्डाणपुल, शौचालये, विश्रांती कक्ष, बाथरूम, लाईव्ह दर्शन इ. सुविधा उपलब्ध आहेत. तसेच वाढती उन्हाची दाहकता लक्षात घेऊन, पत्राशेडमध्ये कुलर व फॅन बसविण्यात येत आहेत. याशिवाय, महिला भाविकांच्या सोईसाठी सॅनिटरी नॅपकीन, हिरकणी कक्ष तसेच श्रींचा प्रसाद म्हणून बुंदी व राजगिरा लाडूप्रसादाची उपलब्धी तसेच वेदांता, व्हीडीओकॉन व श्री विठ्ठल रूक्मिणी या ३ भक्तनिवासामधील ३६१ रूममध्ये सुमारे १ हजार ६00 भाविकांची निवास व्यवस्था करण्यात येत आहे. श्रीची दर्शन रांग सुलभ व जलद गतीने चालवण्यासाठी अनुभवी कमांडोजची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच भाविकांच्या हस्ते होणाऱ्या पूजेची संख्या कमी करून, व्हीआयपी दर्शनावर निर्बंध व दर्शनाची वेळ वाढवून सकाळी ६.00 ते रात्री १२.00 करण्यात आली आहे.

सदर यात्रा निर्विघ्नपणे - सुरळीत पार पाडण्यासाठी व भाविकांना केंद्रबिंदू मानून त्यांना अधिकाधिक सोई सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मंदिर समितीचे सदस्य आमदार रामचंद्र कदम, शकुंतलाताई नडगिरे, डॉ.दिनेशकुमार कदम, भास्करगिरी बाबा, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख (जळगांवकर), ड.माधवीताई निगडे, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, अतुलशास्त्री भगरे गुरूजी, ह.भ.प.शिवाजीराव मोरे, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखाधिकारी मुकेश अनेचा व सर्व विभाग प्रमुख परिश्रम घेत असून, १ हजार २00 कर्मचारी व स्वयंसेवक सेवा पार पाडणार असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

### १२ एप्रिलला बार्शीत आमसभेचे आयोजन

**बार्शी, दि.३ एप्रिल**

बार्शी तालुक्याची आमसभा शनिवार दि. १२ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता यशवंतराव चव्हाण सभागृहात होणार आहे. आमदार दिलीप सोपल यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा होणार आहे. यावेळी खासदार ओमप्रकाश निंबाळकर यांची प्रमुख उपस्थिती आहे. सदर आमसभेसाठी सर्व विभागाचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत, तरी आमसभेमध्ये चर्चा करावयाच्या सुचना व प्रश्न दि. ९ एप्रिल पर्यंत पंचायत समितीकडे सादर करावेत, असे आवाहन गटविकास अधिकारी , महेश सुळे यांनी केले आहे.

## अन्नछत्र न्यास हे धार्मिक संस्कृतीचा अक्षय वटवृक्ष : पालकमंत्री गोरे

### अन्नछत्र मंडळाकडून पालकमंत्र्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि . ३ एप्रिल**

अन्नछत्र न्यास हे धार्मिक संस्कृतीचा अक्षय वटवृक्ष असून समाजाला उर्जावान बनवित श्रद्धा, संस्कार आणि समाजसेवेचा दीपस्तंभ आहे. धार्मिकतेबरोबरच सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा या विविध क्षेत्रातील कार्याने देशभरात अन्नछत्र मंडळाचे कार्य पोहचले असल्याचे मत सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी व्यक्त केले. येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात पालकमंत्री



गोरे सहपरिवार आले असता श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सोनिया गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष अमोलबापू शिंदे, भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य शहाजी पवार, आनंदराव तानवडे, शिवशरण जोजन, वहिदपाशा शेख, महेश हिंडोळे, मल्लिनाथ स्वामी, शिवराज स्वामी, ननु कोरबू, बसवंतराव कलशेट्टी, लखन झंपले, संतोष पाटील, स्वीय सहायक धनंजय गाढवे उपस्थित होते. पालकमंत्री गोरे म्हणाले, तालुक्यातील ७७ कुस्तीगीरांना प्रसादरुपी खुराक या योजनेसह दिव्यांग, निराधार यांना प्रसाद सेवा दिली जाते.ही बाब राज्यातील अन्य धर्मादाय संस्थेत नाही. अन्नछत्र मंडळाच्या माध्यमातून भक्त सेवेतून समाजसेवा घडत आहे. राज्यातील अन्य धर्मादाय संस्थाना अन्नछत्राचे कार्य अनुकरणीय असल्याचे पालकमंत्री गोरे यांनी सांगितले.यावेळी न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, सनी सोनटक्के, वैभव मोरे, निखील पाटील, अतिश पवार, प्रवीण घाडगे, गोटू माने, विशाल कलबुर्गी, भरत राजेगावकर, सुमित कल्याणी, विनायक भोसले, सुरज सावंत, सतीश महिंद्रकर, शहाजी यादव, स्वामिनाथ बाबर, बाळासाहेब घाडगे, नामा भोसले, संभाजीराव पवार, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, महेश भोसले, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, एस के स्वामी, महांतेश स्वामी, सिद्धाराम कल्याणी, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुरे, महादेव अनगले, अनिल गवळी, धानप्पा उमदी, कल्याण देशमुख, धनंजय निंबाळकर, विशाल घाडगे, रोहित कदम, खंडेराया होटकर, मल्लिकार्जुन गवळी, विठ्ठल रेड्डी, समर्थ चव्हाण यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

## अरणच्या विकासाचे श्रेय विरोधकांनी घेऊ नये : पाटील

### जनतेची दिशाभूल थांबविण्याचा दिला इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.३ एप्रिल-**

श्री संत सावता महाराजांची संजीवन समाधी असलेल्या अरण (ता.माढा) येथे 'अ' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्याचे काम महायुती सरकारने केले आहे. सोबतच तीर्थक्षेत्र विकासासाठी शंभर कोटींची तरतूदही महायुती सरकारनेच केली आहे. विरोधकांनी या कामाचे श्रेय घेण्याचा केविलवाणा प्रयत्न करू नये, महायुती सरकारच्या माध्यमातून मंजूर झालेल्या कामाचे श्रेय घेण्याऐवजी स्वतःच्या प्रयत्नातून कामे मंजूर करण्यासाठी विरोधकांनी प्रयत्न करावेत, अशी टीका भाजपचे तालुकाध्यक्ष योगेश पाटील यांनी केली.

पाटील यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, यापूर्वीच्या महायुती सरकारने सहा महिन्यांपूर्वी अरण येथील कार्यक्रमात यासंबंधीची घोषणा केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कार्यक्रमांमध्ये संत सावता माळी संजीवन समाधी स्थळ अरणला 'अ' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा घोषित केला होता. त्याचवेळी श्रीक्षेत्र अरणच्या विकास कामासाठी १०० कोटी रुपये देण्याचे आश्वासन दिले. त्या संदर्भात ग्रामविकास व पंचायत मंत्री जयकुमार गोरे, मंत्री अतुल सावे, माजी मंत्री छगन भुजबळ, विधानपरिषद सभापती राम शिंदे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार योगेश टिळेकर, माजी आमदार राम सातपुते, महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी या विषयासंदर्भात पाठपुरावा केला. त्यानंतर सावता महाराज यांचे वंशज वसेकर महाराज यांनी वारंवार पाठपुरावा केल्यामुळे हा निधी उपलब्ध झाला आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी अरण तीर्थक्षेत्र विकासासाठी भारतीय जनता पार्टी व महायुती सरकारच्या माध्यमातून १०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेतला.माढा विधानसभा मतदारसंघात विद्यमान आमदारांकडून महायुती सरकारने केलेल्या विकासकामांचे श्रेय घेण्याचा प्रयत्न होत आहे. आमदार समाज माध्यमातून कामाचा विकासनिधी स्वतःच्या प्रयत्नातून आला आहे, असे भासवण्याचा केविलवाणा प्रयत्न करून जनतेची दिशाभूल करत आहेत. ते अत्यंत दुर्दैवी आहे. भविष्यात असे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत असे पाटील यांनी सांगितले.

## हभप डॉ जयवंत महाराज बोधले यांना किर्तनसेवा पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी,दि.३ एप्रिल-**

पुणे येथील संत विचार प्रबोधनीच्या वतीने देण्यात येणारा वै. डॉ रामचंद्र देखणे स्मृती कीर्तन सेवा पुरस्कार श्रीक्षेत्र पंढरपूर येथील व धामणगावच्या (ता. बार्शी) श्री संत माणकोजी बोधले यांचे वंशज हभप. डॉ. जयवंत महाराज बोधले यांना जाहीर झाला. या पुरस्काराचे वितरण रविवारी दि. १३ एप्रिल रोजी सायंकाळी साडेपाच वाजता पुणे येथे टिळक स्मारक मंदीरात होणार आहे. श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्राचे कोषाध्यक्ष स्वामी गोंविददेव गिरीजी महाराज यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात येणार आहे. यावेळी उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार श्रीकांत भारतीय, साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. अरुणा ढेरे यांची प्रमुख उपस्थिती आहत. यावेळी वासकर फडाचे हभप राणा महाराज वासकर, श्री संत ज्ञानेश्वर देवस्थान समितिचे विश्वस्त योगी निरंजनाथ यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.



## वडकबाळच्या आदर्श कामधेनू संशोधन संस्थेला अडीच लाख रूपये अनुदान

### मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ऑनलाईन वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ३ एप्रिल -**

राज्यातील ५६0 गोशाळांच्या खात्यात देशी गोवंश परिपोषण योजनेचे २५ कोटी ४४ लाख रुपयांचे अनुदान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने जमा करण्यात आले. जानेवारी, फेब्रुवारी व मार्च असे ३ महिन्यांचे अनुदान जमा करण्यात आले आहे. गोशाळांमध्ये ठेवण्यात येणाऱ्या देशी गाईंच्या पालनपोषणा साठी प्रती दिन प्रती गाय ५0/- रूपये अनुदान योजनेअंतर्गत राज्यातील ५६0 गोशाळांमधील ५६ हजार ५६९ गायीसाठी पहिल्या टप्प्यात २५ कोटी ४५ लाख ६0 हजार ५00 रुपये इतके अनुदान महाराष्ट्र गोसेवा आयोगामार्फत लाभार्थी गोशाळांना वितरीत करण्यात आले.दक्षिण सोलापूर तालुक्यामधून गोशाळा अनुदानासाठी चार प्रस्ताव गेले होते . त्यापैकी श्री आदर्श कामधेनु संशोधन संस्था वडकबाळ तालुका दक्षिण सोलापूर यांचे प्रस्ताव मान्य होऊन एकूण ५१ गोमातेसाठी दोन लाख २९ हजार पाचशे रुपये बँकेत जमा करण्यात आले आहे. त्यामुळे गोशाळा चालकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा सोलापूरला आल्यानंतर वडकबाळच्या गोशाळा पदाधिकार्यांनी त्यांची भेट घेऊन गोशाळांना अनुदान देण्याची मागणी करण्यात आली होती . त्यानुसार अनुदान मिळाल्याने गोभक्तांना पेढे वाटून व गोमातांना गोड खाऊ घालून आनंद व्यक्त करण्यात आले. महाराष्ट्र शासनाकडे महाराष्ट्र गो सेवा आयोगाकडून नोंदणीकृत गोशाळेकडील गो वंशाच्या परिपोषण आहारासाठी एकूण ८६६ प्रस्ताव पाठवण्यात आले होते. त्यापैकी ५६१ प्रस्ताव मंजूर होऊन गोशाळांना २७ मार्च रोजी २५ कोटी ४४ लाख अनुदान रक्कम वितरित करण्यात आले आहे. उर्वरित तीनशे पाच गोशाळांना दोन वेळा मुदत वाढ देऊनही पात्र झाल्या नसतील तर त्यांना पण एप्रिलमध्ये पुन्हा ऑनलाइन अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे .



### देशी गोवंश बचावास हातभार

गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा व राज्य सरकार यांच्याकडे गोशाळांना अनुदान मिळण्यासाठी पाठपुरावा केला होता. अखेर राज्य सरकारने देशी गोवंश सांभाळणार्या गोशाळांना तीन महिन्याचे प्रलंबित अनुदान दिले आहे. त्यामुळे गोशाळा चालकांना देशी गोवंशाचे सांभाळ करताना आर्थिक सहाय मिळणार आहे. राज्य शासन व गोसेवा आयोग यांचे गोवंशावरील श्रध्देमुळे अनुदान मिळाले आहे.

**- उमा बिराजदार, अध्यक्ष,**
**आदर्श कामधेनू संशोधन संस्था, वडकबाळ**